मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी



छायाचित्र–चंद्रकांत पांडे

: संपादक :

पां. कृ. सावळापूरकर

संपादक मंडळ :

कृ. व्यं. पेशकार
मा. ल. व्यवहारे
ब. कृ. वऱ्हाडपांडे
प्र. दे. कोलते
रा. ना. घाटोळे
भा. श्री. परांजपे
तु. ना. काटकर

कार्यकारी संपादक :

मा. ल. व्यवहारे

वर्ष ११ वें : अंक १२ वा

मार्च १९५७

साहित्य लेणीं

या शिवाय ऐतिहासिक ललितकथा, किंचित काव्यें, लोकगीत इ. इ.

संपादकीय



'युगवाणी'चा प्रस्तुत 'ललित साहित्य विशेषांक' सादर करतांना मला अतिशय समाधान व आनंद होत आहे.

या अंकाची मूळ कल्पना काढण्यापासून तो तत्संबंधीं सहेतुक व्यवस्थित योजना आखून ती मूर्त स्वरूपांत आणण्यापर्यंत करावे लागणारे सर्व प्रकारचे परिश्रम प्रा. मा. ल. व्यवहारे यांनी निरलसपणे केले आहेत हें त्यांना फार भूषणावह आहे. प्रस्तुत अंकाच्या संपादनाची कठीण जबाबदारी स्वीकारून ती त्यांनी उत्कृष्ट रीतीने पार पाडली हे त्यांचे 'युगवाणी'वर व विशेषत: व्यक्तिश: मजवर अनंत उपकार आहेत. या महत्कार्याबद्दल प्रा. व्यवहारे व त्यांचे साहायक श्री. शरच्चंद्र सिंह व श्री. माणिकचंद्र क्रानेड, आणि या अंकांतील लेखक व कवि या सर्वांचा मी आभारी आहे. या अंकाचें सर्व श्रेय त्यांचें आहे. माझा त्यांत कांहीहि वांटा नाही हें येथे मोकळ्या मनाने लिहिल्यावाचून मला राहवत नाही.

पुढील अंक 'संस्कृति विशेषांक' म्हणून निघणार असून त्याचें संपादन श्री. प्र. दे. कोलते करीत आहेत.

पां. कृ. सावळापूरकर

हृदय - संवाद

रसिक वाचकांनो !

'युगवाणी'चा हा ललित-साहित्य-विशेषांक आपल्या हातीं देतांना मला अतिशय आनंद होत आहे. प्रस्तुत अंकाच्या संपादनाची संपूर्ण जबाबदारी माझ्यासारख्या अगदी अननुभवी व्यक्तीवर सोपवून 'युगवाणी'चे प्रमुख संपादक गुरुवर्य प्रा. सावळापूरकर यांनी ज्ञानदेवांप्रमाणे 'रेड्यामुखीं वेद वदविण्याचें' महान् कार्य माझ्याकडून करवून घेतलें आहे असें मला वाटतें. या कामीं प्रा. सावळापूरकरांचें अमोल मार्गदर्शन व जिव्हाळ्याचें प्रोत्साहन मला लाभलें आहे. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे माझ्या प्रत्येक सूचनेचा अत्यंत सहानुभूतिपूर्वक विचार करून त्यांनी मला प्रत्येक गोष्टीस संमति दिली आहे. त्यांच्याविषयी मला वाटणारी कृतज्ञता कोणत्या शब्दांत व्यक्त करावी हेंच मला कळत नाही.

युगवाणींतून ललित साहित्याला फारच थोडें स्थान दिल्या जातें अशी अनेकांची तक्रार आहे. अशा वाचकांचें अंशतः तरी समाधान प्रस्तुत अंकाने होईल असा विश्वास वाटतो.

निरनिराळ्या भागांतून आमच्या अपेक्षेपेक्षा कितीतरी विपुल व सर्व प्रकारचें ललित-साहित्य आमच्या हातीं आलें. आलेल्या साहित्याची संगतवार जुळणी करून त्याची निवड करणें आवश्यक होतें. कारण 'युगवाणी'च्या मर्यादित पृष्टसंख्येंत सर्वच साहित्याचा समावेश करणें अशक्य होतें. म्हणून साहित्याची निवड करतांना जुन्यांचा मान राखून नव्यांना प्रोत्साहनासाठी रास्त स्थान देतां येईल ही काळजी प्रामुख्याने घेतली गेली. साहित्य पाठविणाऱ्या सर्वच लेखकांचा मी अत्यंत आभारी आहे.

प्रस्तुत अंकांतील साहित्यासंबंधीं मी काय मत द्यावें? "परीक्षावंतापुढे ठेविलें रत्न। तरी होय समाधान ॥" महाराष्ट्रांतील रसिक वाचकच या अंकाबद्दल आपला प्रांजल अभिप्राय व्यक्त करून आम्हाला मार्गदर्शन करतील असा मला विश्वास वाटतो.

प्रस्तुत अंकाच्या संपादनाच्या कामांत माझे सहकारी मित्र श्री. माणिकचंद्र कानेड, श्री. शरच्चंद्र सिंह व श्री. दे. गो. उदापुरे या त्रीमूर्तींचें मला संपूर्ण व अमोल साहाय्य झालें आहे.

या अंकांत जें कांही चांगलें व वाखाणण्यासारखें असेल तें सर्व माझ्या सहकाऱ्यांच्या कृतीचें फळ आहे. या अंकांत कांही उणीवा असतीलहि-- कांही दोषहि चोखंदळ वाचकास आढळतील. त्या सर्व दोषांची वारसदारी माझी आहे हें मी प्रांजलपणें येथे नमूद करतों.

अगदी अपरिहार्य कारणामुळे हा अंक वाचकांच्या हातीं थोडा उशीरा पडत आहे, त्याबद्दल सर्व वाचक मला उदारपणें क्षमा करतील अशी आशा आहे.

आपला विनीत

मा. ल. व्यवहारे

कार्यकारी संपादक, ललित साहित्य विशेषांक

अनुक्रमणिका

आमचे शिल्पी

१. कै. ना. कृ. दिवाणजी (अमरावती) : विदर्भ साहित्य संघाच्या' विकासासाठी यांनी घेतलेले परीश्रमहि विदर्भाचा मराठी माणूस कधी विसरणें शक्य नाही; पार्थीव दृष्टींतून गेलेले असले तरी त्यांची पुण्यस्मृती चिरंजीव आहे! ...

२. 'आकाशानंद' कॉटेज इंडस्ट्रीज : गोंदिया, (एस्. ई. रेल्वे).
३. श्री. उद्धव ज. शेळके : राजापेठ, अमरावती.
४. ,, गंगाधर पानतावणे : नागपूर.
५. ,, दत्तु गोरे : बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेज, पुणें ४.
६. ,, ना. ना. हूड : यवतमाळ.
७. ,, नाना जोग : गोखले व्हिला, धन्तोली, नागपूर.
८. प्रा. पद्माकर डावरे : खामगांव.
९. श्री. पद्माकर निमदेव : दंडे प्लॉट्स्, अमरावती.
१०. ,, प्रभाकर ऊर्ध्वरेषे : सायन्स कॉलेज, खामगांव.
११. सौ. प्रभावती सगदेव : जेल रोड, नागपूर १.
१२. कविभूषण व. ग. खापर्डे : अमरावती.
१३. श्री. वा. के. वन्नोरे : अकाउन्टन्ट जनलरचें कार्यालय, नागपूर.
१४. प्रा. भवानीशंकर पंडित : श्रीधर सदन, श्रद्धानंद नगर, नागपूर.
१५. प्रा. भ. प्र. मोहरीर : विदर्भ महाविद्यालय, अमरावती.
१६. श्री. भाऊ मांडवकर : रामदास पेठ, नागपूर १.
१७. सौ. भानूमती सिंह : अमरावती कॅम्प.
१८. श्री. भास्कर कविमंडन : चितळे बंगला, गिरीपेठ, नागपूर.
१९. श्री. भास्कर चौधरी : प्रधान बोळ, गुजरी, कोल्हापूर.
२०. श्री. भा. य. लांबे : नागपूर.
२१. श्री. मधुकर केचे : महाजनपुरा गेट, अमरावती.
२२. श्री. मनोहर तल्हार : जवाहर रोड, अमरावती.
२३. श्री. माणिकचंद्र कानेड : 'इंद्रभुवन' जवळ, अमरावती (शहर).
२४. श्री. या. मु. पाठक : धरमपेठ एक्स्टेन्शन, नागपूर.
२५. श्री. राजा महाजन : एम्. जे. कॉलेज, जळगांव.
२६. श्री. रामकुमार :
२७. श्री. राम वैद्य : सिव्हिल लाइन्स, दर्यापूर.
२८. श्री. वसंत पेंढरकर : मुधोळकर पेठ, अमरावती.
२९. श्री. वसंत निनावे :
३०. श्री. वसंत वऱ्हाडपांडे :
३१. वसु भगत :
३२. श्री. विनायक पाठक : बी. १७/२३४, राजावाडी, घाटकोपर, मुंबई–३९.
३३. सौ. सुनंदा पांडे : बालाजी प्लॉट्स्, अमरावती.
३४. प्रा. सुरेश डोळके : नागपूर महाविद्यालय, नागपूर.
३५. श्री. सुरेश भट : येवदा (ता. दर्यापूर).
३६. स्मृति सागर : नांदेड (हैद्राबाद).
३७. श्री. श्याम सोनारे : देशमुखपुरा, वरूड (जि. अमरावती).
३८. श्री. शंकर बा. कुळकर्णी : १९४, बळिराम पेठ, जळगांव.
३९. श्री. शरच्चंद्र सेन : अमरावती कॅम्प.
४०. श्री. राम पाथरकर : बी. टी. कॉलेज, अकोला.

युगवाणी

ललित साहित्य - विशेषांक

मार्च १९५७



मी कां हसतों ? —कै. ना. कृ. दिवाणजी

जरि भडकोनि हृदय जळे अन्तरिं ज्वाला
हसतों तरि मी या जगतीं व्यर्थ कशाला ? धृ.

मज दुःखातें दूर कुठे शोधणें नको;
जगिं दारिद्र्या घोर कुठे धुंडणें नको;
फुटकी जीवन- नौका ही जात तळाला
हसतों तरि मी या जगतीं व्यर्थ कशाला ? १

जलमय झाले नेत्र जरी अश्रु येउनी
मज अश्रु-बिन्दु साठविणें हृदय कोरुनी
जरि अश्रूंच्या प्रलयाचा समय पातला
हसतों तरि मी या जगतीं व्यर्थ कशाला ? २

जिव सारे परमेशाचे; विषमता परी
करि भेद, कोणि दुःखी कुणि चढति सुखगिरी
समतेविण हा जीव जरी व्याकुळ झाला
हसतों तरि मी या जगतीं व्यर्थ कशाला ? ३

* *

अनुक्रमणिका

मुरतो आहे !

—वसंत पेंढारकर

दगडाच्याही छाताडावर
हिरवा अंकुर फुटतो आहे
आकाशाचा ताठा आता
खाली खाली झुकतो आहे

एकच पक्षी आकाशाला
पंखाखाली घेतो आहे
वेलीवरच्या कळींत एका
गंध उद्याचा फुलतो आहे

चरक उराचा लाख स्मृतींना
एकसारखा पिळतो आहे
ठिबकत ठिबकत थेंब जलाचा
मातीमध्ये मुरतो आहे

* *

दर्शन

मधुकर केचे

ती क्षितिजावर दिसली होती,

मुक्त केशसंभार निशेचा
आवरीत ती कसल्या तंद्रित
वेणी गुंफत बसली होती.

सजला होता तिच्या शिरावर
रंगित मेघमुमांचा गजरा
ओठीं तांबुस गीतें होतीं,
ती क्षितिजावर दिसली होती,

दवबिंदूचा डोळा होउन
मुग्ध कळीचीं अस्फुट स्वप्नें
उत्सुकतेने निरखित होती.
ती क्षितिजावर दिसली होती.

क्षणभर मजला देउन ओळख
आकाशाच्या निळाईत ती
शिरतां शिरतां हसली होती.
ती क्षितिजावर दिसली होती.

* *

अण्डें

—शंकर कुळकर्णी

अंधाराचें टाकुन अंडें
दूर पळाली संध्या जेव्हा
निळ्या नभाचें चंदेरीपण
मिचकुन डोळे चुकचुकलें बन
पाहुनिया ती काल स्तब्धता
जलीं स्थलीं पाषाणीं काष्ठीं

परन्तु जेव्हा फटफटतांना
टिचलें अंधाराचें अंडें
किनार काळी कापत सुटलीं
पदथंत्रांचीं आणिक पातीं
फुटलें जणुं अननीला पाऊल
नव्या जगाची येतां चाहुल !!

* *

फुंक

—वसु भगत

लक्ष लक्ष स्वप्नांचा
जागर रोज अिथे
अश्रूंनी भिजलेलीं
नित्य नवीं निश्वसितें

प्रेमाच्या जळणाऱ्या
सरणाची राख अडे
रात्रीच्या काळोखीं
पायांतील वाट चुके

वाटेवर तेवतात
काजळले लाल दिवे
श्रद्धेची मंद ज्योत
अंधारांत विरे

लक्ष लक्ष स्वप्नांचा
जागर रोज अिथे
अश्रूंनी भिजलेलीं
नित्य नवीं निश्वसितें

नित्य नवें आक्रन्दन
नित्य नवा स्वप्नसेक
दुखणाऱ्या हृदयावर
तेवढीच फुंक अेक

* *

अनुक्रमणिका

स्वातींतील मोती !

—स्मृति सागर

नीलिम्यांत नवमीच्या रातीं—
दवांत भिजलीं हिरवीं पातीं,
विचल सरोवर कुशींत स्वप्निल
मी तूं विलग, विकल अन आकुल !

अधरि सुधा, गालीं सुमधू अन
सुमुखीं मुकुलित मृदुल सुभावन,
नयन-पाकळी झांकशि कां ते
पंकज जलबिंदू, थरथरते !

"आधिच ह्यांचें जागृत वेदन
उदयिक असतिल दूर, त्यांत अन
ओतुं कशी मी अमित स्फुंदन !"
समजतेसना हेंच मनोमन !

"उगिच आपलं उगीच बाई
मला…किनी…हें कळतच नाही !"
—उद्गारीं शालिनता न्हाली,
असु हलके अन् सरले गालीं !

'दे तें कोमल तेज अमोलिक
उन्मीलित अंजुलीं शिंपलिक,
झरता गर्भी त्या, होतिल तीं,
साकारित स्वातींतिल मोती !

मोती सखि हे लोभस नीलिम
ऊब स्पर्शित हिमबिंदूसम
विरतिल चुंबन आवेगीं ते—
नवतम निर्मित सान्त्वन-गीतें !!'

* *

रोजचेंच हें !

—रामकुमार

वातावरणीं उडवित धुरळा
वेगांतच हो गेली मोटर
कडेकडेच्या झुडुप-तृणावर
चढला ताम्बुस मातीचा थर !

जरा बाजुला··उरीं शहारुन
जलसंचय एकटा सानुला
हळूच घेई अङ्गावरती
लाल धुळीचा ओढुन शेला !

माळ पलिकडे-अडवा डोङ्गर
चमचमणारें फसवें मृगजळ
सावलींतलीं निवान्त ढोरें
प्रतिबिम्बांची थरथरती कळ

उंच उंच की निरभ्र गगनीं
घार एकटी तरङ्गते वर
कढत उन्हाचा गळतो पारा
आणिक खाली पळती मोटर !

परन्तु येतां झुळुक वायुची
भकासतेला कोम्ब कोवळे
पान-फुलांशीं हळवें हितगुज
'रोजचेंच हें आहे सगळें'

'रोजचेंच हें···रोजचेंच हें'
हसून डुललें पान, फुल, तरु
अजुनि परन्तु फान्दीवरचें
व्रवे भेदरुन एक पाखरूं !

*

पंखा

—वसंत निनावे

नियत अशा कक्षेंतच
फिरतों मी मजभवतीं
पंखांवर सुप्त फिरे
माझ्यासह मम नियती··

मी बघतों मूढपणें
सुख तुमचें आणि व्यथा
शब्द - स्पर्श - डोळयांच्या
चंचल संकेत कथा…

पण माझा भोग असा
बघणें हें नित नुसतें
तुमच्यास्तव तुमचें जग
हें विराट झगमगतें··

पंखांना तडफडत्या
उडण्याचें भाग्य नसे
पंखांत न मिटणारा
खोल एक डंख असे !

* *

अनुक्रमणिका

प्रकाश पक्षी

—वसंत वऱ्हाडपांडे

त्या दूर ...... डोंगरामागे
फडफडतो प्रकाश-पक्षी
भयचकित मिरविती अंगीं
ढग सुवर्ण रेशिम-नक्षी

उच्छ्‌वास सुगंधित त्याचे
ये फूल – पापणीवरती
अन् तृप्त उघडितां डोळे
गंधांचीं जुळतीं नातीं

हळू उघडुनि अपुली चोंच
शेतांत नभाच्या उतरे
तमकणिस निसवलें खुडतो
मुरगाळुनि रक्षक तारे !

मग सदय पांखरुन पंख
तो जपुन उतरतो खाली
ब्रम्हांड काल व्यालेलें
उबवीत बघे भवतालीं !

क्षण असेंच वत्सल सरतां
सावरून पंख पसारा
चैतन्यपुरुषमणिबंधीं
तो बसुन खातसे चारा !

रितें चिमेपण

—गंगाधर पानतावणे

तळहातांवर थोपटलेल्या
कुशीकुशीशीं बिलगविलेल्या
अधरावरती अधर टेकल्या
कसें विरावें त्या स्वप्नांचें । खुळें चिमेपण
डोळ्यांमधलें निरें मुकेपण
पापणींतलें हसरें रिंगण
सहज विरावा गात्रांचा शिण
असेंच विलसे त्या स्वप्नांचें । खुळें चिमेपण
गोल बोबडे फिसकटलेले
'ये बाबा' 'ये आई' वदले
अन् जिवनाचें सर्व निमालें
परंतु उरलें स्वप्नांचें तें । रितें चिमेपण

ललाटीची भाग्यरेखा

—सौ. सुनंदा पांडे

ललाटीची भाग्यरेखा
प्रकाशली आज माझ्या
नव्या नवलाचा सखा
घरीं आला बाळ-राजा

पावलांची लाल कांती
लाजवील अरुणतेजा
मुखप्रभा लाडक्याची
फिके पाडील नीरजा

गुलाबा रे डौल तुझा
उतरील बाळ माझा
कांती गालींची पाहुनी
वरिशील पांडुरता

आकाशींच्या शुभ्र ताऱ्या
नको मिरवूं दिमाख
सोनियाची मुखप्रभा
लाजवील ज्योती लाख

बाळ दुडदुडे अंगणीं
वाजे कोमल घागऱ्या
उण्या त्याच्यापुढे आहे
संगीताच्या रागदाऱ्या

आज नवल घडलें
बाळ खुदूखुदू हासे
त्याच्या गोड हास्याने
नभीं चांदणें लाजलें

सकाळच्या स्निग्ध वेळीं
बाळ रांगतो अंगणीं
त्याच्या स्पर्शाला आतुर
भोवतीच्या लतावेली

माझ्या बाळाचे कुंतल
किती कोवळे कोवळे
त्याच्या बघून लीलांस
नभीं चांदोबाही खिळे

काफिला

—सुरेश भट

चालला काफिला चालला काफिला
मार्ग शोधीत हा चालला आपुला !

ओसरे चांदणें पांखरें कूजती
एकएकेक या तारका लोपती
चुंबितो स्वप्नपुष्पें अुषा पावलां !

हा प्रकाशाकडे चाललेला दुरी
तेज प्राचींतुनी धांव घेई वरी
रंगत्या या अनंतामध्ये चालला !

वाढत्या वैभवें आणिली दीनता
ये प्रकाशासवे अंतरीं म्लानता
बांग देतां मुअज्जीन आक्रोशला !

जाहली प्रीत गे एकदा पाहतां
वंदि झालों पुन्हा हांसतां हांसतां
हासतां हासतां काळ तो संपला !

आंसवें हांसती आज डोळयांतुनी
कोण गेले गडे जीव वेडावुनी ?
साद द्याया असा मी उभा एकला !

• •

भवितव्य

—दत्तु गोरे

रात्रीला भवितव्य म्हणालें,
'झोंप घेऊं का जरा यामिनी ?—
चिरनिद्रेच्या क्षणिक सुखाने—
चालु लागतों प्राक्तन कामीं !'

'तुझीच च्छा !' म्हणुन रात्रहि
गाउं लागली विश्वा गाइ
परि क्षितिजांतुन शुक्र म्हणाला,
'चल दोस्तारे' कालप्रवाहीं !

भवितव्याने भालीं आठी
पुशित् झटकिलें सारें अंग
पूर्वेला रवि लाल होउनी
म्हणतो, 'चल बा कामा लाग !'

• •

शून्यातुन निघतीं ब्रह्मांडें-

—यादव मुकुंद पाठक

शून्यांतुन निघतीं ब्रह्मांडें
शून्य मनांतुन माझ्या कविता
आकारांतच एकच केवळ
अखेर भरली निराकारता

व्यर्यामधुनी अर्थ निघाला
व्यर्थी सारा पूर्ण निमाला
शब्दांच्या वलयावलयांतच
नि:शब्दांच्या केवळ लीला

वरवरच्या लहरीवर लहरी
तळ कोणा का कधी लागला ?
'ट' ला 'ट' करतांना कां तर
व्यर्थच माझा जीव भागला ?

• •

सारंगी लहरी स्वरांत*

—नारायण नागोराव हूड

सारंगी लहरी स्वरांत कुठ ती छेडी पहा रागिणी
वीणा आणिक दिल्रुबा मधुरवें झंकार ते काढिती
कोठे ती सनई, सतार, ललना आलाप त्या छेडिती
रेडीओ कुठ तो; तसाच तबला ताला घरी गायनीं
सारे ऐकुन शब्द सूर तसले आलाप आलापिका
डोकें तें उठलें, नि कर्ण फुटले वाटे असें तत्त्वत:
त्यामाजीं नच लक्ष; तथ्य न मुळी ऐकोत मी ते फुका
भूतें भेसुर नाद काय करिती येऊन तेथे स्वत: ?

जेव्हा मी स्वर तो तुझा मधुरसा ऐकोयला जीवनीं
आली तों मजला श्रुती नविनची मी यक्क झालों पहा
तुझा तो स्वर आजुनीहि सखये ! झंकारतो मन्मनीं
गेली ती युगमालिका कितितरी ताजाच वाटे अहा !
माझ्या त्या श्रुति, शब्द आणिक तुझे ते गोड मंजुस्वर
होता एकच की पुढेच प्रकटे प्रत्यक्ष तो ईश्वर ! !...

• •

* आदिशक्तीस उद्देशून

हुरहूर

–भाऊ मांडवकर

क्षितिजाच्या जाळींतून
डोकावते चांदकोर
थरथरे मंद, कुंद
निळ्या नभाची किनार

काळोखाच्या कोषांतून
वेल झेपावे कातर
शहारतो, बहरतो
स्पंदनांत धुंद ऊर

लवलेला पारिजात
सोडी श्वास ओलसर
धरा ओवतसे माळ
मुग्ध, बावरी, आतुर

चांदव्याचा कवडसा
पडे मधून धूसर
उसाशांत वर्षतसे
दवारली संथ सर

मौनांतला झुरणारा
झाला बोलका हुंकार
सरूनीया उरलेली
भारावली हुरहूर

● ●

कळस, पाया आणि गाभारा

–भवानीशंकर पंडित

कळस म्हणाला, "मी उंचावर
कांचनकाया माझी सुंदर
अविरत झळके मी झळ झळ झळ
तेजोभास्कर करि मज उज्ज्वल
मूल्यवान मम एक एक कण
मी न थोडका ! मी सव्वामण !
सरळ निमुळतें उन्नत मम शिर
सुचवी जणु,–'वर मी, परमेश्वर'–
सदाकदा मम मान ताठ वर
प्रभाव माझा लोकांवर चिर;
पण, पाया ! तूं पायाखालीं
कुणि पाहीना तुज कधिकाळीं"

तेव्हा पाया विनम्र वदला,–
"खरें खरें रे ! महत्त्व मजला,
धरेंत गाडुन शरीर माझें
मी डोक्यावर उचली ओझें,
देवालय हें उभें मजवरी
मी अवलंबन त्यास खरोखरि,
चिरा-चिरा मम गच्च सांधला
सहकाराने पूर्ण बांधला,
स्वयें होउनी मीच अधोगत
दर्शनीय तुज केलें उन्नत
पडेल निखळुन चिरा–चिरा जर
खालीं येशिल कोलमडुन तर,
स्थिर रे ! मजवर तव डोलारा
डामडौल तव फुकटच सारा !"

गाभाऱ्यांतिल मूर्ती तेव्हा
हसुन बोलली,–"वा: वा: वा: वा:
महती माझी तुमच्यापेक्षा
विचार करुनी बघा, तर कसा;
दो टोकांना तुम्ही वेगळे
येतां सन्निध परी मजमुळें;
मी तुम्हांतिल तोल साधतें
वेळोवेळीं तुम्हां बोधतें;
तुमच्यांतिल जे सद्गुण अवघे
सदा राहती ते मजसंगें
जनता मजला म्हणुनी मानी
भक्ति, श्रद्धा, भाव ठेवुनी
तिघेंहि आपण आहों एकट
म्हणुनच देउळ हें धडधाकट !"

● ●

स्मृति-गंध

–भास्कर चौधरी

आर्त धुक्याच्या वलयामागुन
उठलीं वलयें दो नाजुकशीं
गोलाकारी घुमुनी कैशी
विसावली तो अन् मागाहुन

हृदयांमधला काळिज–कापुर
जळून उरली राख सुगंधी
सौगंधोच्या स्मृतींत बंदी
–तसे निमाले मानस आतुर

● ●

खांवाला कोंब
—वळवंत गणेश खापर्डे

हास्याची छटा तुझ्या मुखि उमटली
आनंदाची लहर विश्वांत उसळली !
हृदयामध्ये आज दिवाळीच सजली !

अवसेची रात्र पौर्णिमेची झाली !
विझलेल्या वातींतून प्रभा पसरली !
फुटलेल्या वीणेंतून रागदारी बहरली !

विजेची तळमळ चंद्र बनून उगवली !
संध्येची लाज उषेचं हसुं झाली !
वैशाखाची रखरख शरन्निशा सजली !

सुकलेली बाग सुगंधानं बहरली !
कोमेजलेली कळी उमलून विकसली !
रुसलेली प्रिया खुद्कन् हसली !

हास्याची छटा तुझ्या मुखि उमटली
आनंदाची लहर विश्वांत उसळली
हृदयाच्या अंगणांत आज दिवाळीच सजली !

● ●

नितळ नभाची
—राजा महाजन

नितळ नभाची ओंजळी भरून
तारका फुलांनी

चालत आली मंथर शर्वरी
पांढरा गुलाब चंद्राचा हुंगीत
भारून टाकीत अवघें जीवन !
वारुणी स्रवते तिच्या ओष्ठांतून

गळला विश्वाचा क्षुद्र अहंकार
विरल धुक्याच्या जलाशयांत
झालें बेभान कुशींत शिरून—

बाभूळ वनांत
हिरव्या क्षणांत
काजळी पाण्यांत
मौनांच्या गाण्यांत !

शीतल वारा चुंबी किनारा
अंगींप्रत्यंगीं उठे शहारा
नेत्रांत नाचते तेजाळ नर्तन
शोधित आकाशीं गळलें पैंजण !

बहरल्या वृत्ति उचंबळे चित्तीं
स्मृतीच्या शुक्तींत प्रीतीचे मोती
त्याच मोत्यांची गुंफुनी माळ

माझ्याच मस्तींत मोजितों दाणे
गात जीवनाचें शाहिरी गाणें !

● ●

हवं-नको
—विनायक पाठक

हवें असते जेव्हां जें
तेव्हां तें मिळत नाही
नको असते नेमके तेंच
मिळायाचें टळत नाही !

मोहोळांतून जेव्हां मधू
हवा तेव्हां गळत नाही
डोळयांमधला आसूं तो
नको तेव्हां झरत राही !

हवें असतें तेव्हां मन
मुक्तपणें हंसत नाही
नको असतें नेमके तेव्हां
आंतल्या आंत झुरत राही !

फळली धरती-हंसते आकाश
नेहमीच कांही असत नाही
काळोखाची किनार माझ्या
मनाखाली लोंबत राही !

हवें नको याचा विचार
सदाच होतो असें नाही
घडायाचें घडत असतें
विरायाचें विरत राही !

● ●

' अनित्यहृदयाः स्त्रियः '

—नाना जोग

[शेक्स्पिअरच्या हॅम्लेट नाटकाच्या रूपांतरांतील एक स्वगत].

हॅम्लेट : (स्वगत) अरे ! हें जड कठोर शरीर
वितळून कां नाही जात आपोआप !
परमेश्वरा ! काय बिघडलं असतं—
तूं आत्महत्या हें पाप ठरवलं नसतंस तर !
काय उपयोगाची तुझी ही सृष्टि—
इथलं हें कष्टी, जीर्ण, निःसत्त्व, नीरस
अस्तित्व !
निबिड रानच घालतं आहे जिथं थैमान
असं हें दूषित उद्यान !
धिक्कार ! धिक्कार असो या जीवनाला !
केवढी दुर्घटना ही—
फक्त दोन—छे छे, दोन तरी कुठले !—
दोन महिनेहि झाले नाहीत ज्याला मरून
असा गुणसंपन्न पतिराज—
आईवर प्रेम तरी किती त्याचं !
—जरासा सुटला सोसाटयाचा वारा
तरी बिचारीला वाटेल भीति म्हणून
झटला तो
सदैव तिला निवारा देत !
पण माझी आई—
जणूं एका महावृक्षाच्या जीवनसत्त्वावर
फोफावत गेलेली वेल ही
उन्मळून पडल्यावर तिचा एक आधार
केवळ एका महिन्याच्या आंत
करूं लागली सुरवात दुसरा संसार !
अरेरे ! नष्ट कां नाही होत माझी
स्मरणशक्ति !
शिवशिव !—अनित्यहृदयाः स्त्रियः !
—केवळ एका महिन्याच्या आंत अं !—
अरे, ज्याला मिळाला नाही बुद्धीचा वर
असं एखादं जनावर
तें सुद्धा—तें सुद्धा बसलं असतं थोडा
अधिक काळ
अश्रू ढाळ ढाळ ढाळत !
पण एका महिन्याच्या आंतला हा दुसरा
संसार
—तो सुद्धां कुणाशीं ?—सख्ख्या दिराशीं !
अन् तो दीर तरी कसला !
हूंः ! कुठे तो गजेन्द्र न् कुठे हा उंदीर !
अरेरे आई ! कोण पापी घाई ही—
ही बरी नाही—हिचा परिणाम बरा
होणार नाही !
(कुणाची तरी चाहूल लागून)—हृदया !
कशाला आता या आठवणी !
जीभ आवर नि तोंड दाबून सहन कर !

• •

कदाचित—

मी मेल्यावर
माझ्या प्रेतावर
अश्रू ढाळूं नका,
कदाचित—
मी करुण रसाची
कविता करण्यास
पुन्हा जिवन्त होईन

—वसन्त

दोन प्रतीक कथा

—शरच्चंद्र सेन

१ भोग नी त्याग

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे.

या विशाल वसुधेच्या हृदयांत वनदेवाचं एक अत्यंत सुंदर – अत्यंत संपन्न असं रान होतं म्हणतात की त्यांतील सारं अमर, सौंदर्यपूर्ण होतं. त्याचं वैशिष्ट्य हें की कुणीहि त्यांत प्रवेश करूं शकत असे. पण तेथील कांहीहि वास्तविक स्वरूपांत पावायला मनांतील सूक्ष्मतम इच्छाशक्तीहि प्रामाणिक असावी लागे त्याची! –एरवी, त्या वस्तूचं मूळ अतुल मनोहारी स्वरूप नाहीसं होऊन जाई.

एका सकाळीं, स्वच्छ व गार पाणी वायूच्या लहरींवर आनंदाने स्फटिकनृत्य करीत असलेल्या त्या वनांतील निनान्तरम्य सरोवराच्या कांठी एक महान पराक्रमी युवक आणि एक सहृदय सौंदर्यसंपन्न युवती बसली होती. तो तिचा प्रियकर होता. ती त्याची प्रेयसी होती. तो तिच्यासाठी प्राणहि समर्पित करण्याची तयारी बोलत होता, आणि ती, त्याला आपलं सर्वस्व अर्पण करण्याचा मुग्ध संकल्प केव्हाच करून चुकली होती.

इतक्यांत, सूर्याच्या खुलत्या किरणांबरोबर त्या सरोवरांतील अत्यंत कोमल सुवर्णकमलं विकसलीं. त्याच वेळीं त्या सरोवराजवळील मंदिराच्या प्रचंड वृक्षछायेंतील रत्नराशी आपल्या अलौकिक तेजाने चमकूं लागली.

त्याचं लक्ष त्या कमलांवर पडतांच त्यांच्या आरक्त सौंदर्यानें त्याचे नेत्र दिपून गेले. तीं कमलं तोडून आणण्याचा निश्चय केला त्याने–आपल्या प्रेयसीसाठी!–आणि तो उठला.

तिथें आल्यापासूनच तिचे नेत्र त्या रत्नराशीच्या उज्ज्वलतेनं उजळून गेले होते आणि त्यांतील एकच तेजस्वी रत्न आपल्या प्रियकराच्या बलिष्ठ बाहूबंधासाठी आणण्याचा निश्चयहि ती केव्हाच करून चुकली होती–त्यामुळे आपल्या प्रियकराचं तेज खूपच खुलून उठावं म्हणून!–म्हणून तो उठतांच तीहि उठली....

त्याने अनेक सुवर्णकमलांना हळूवार स्पर्शून..कांही खुडलीं, गुच्छ बनविला त्यांचा... पण त्यांकडे अनिमिष लोलुपतेनें कांही क्षण पाहत राहिल्यानंतर तो आपल्या प्रेयसीकडे यायला निघतांच, तीं सुरेख–टवटवीत कोमल कमलं कोमेजून गेलीं, त्यांचं आल्हादक सौंदर्य नाहीसं झालं, उल्हासित परिमल विरून गेला.

तिने रत्नराशींतून एक तेजस्वी रत्न चटकन् आपल्या हातांत घेतलं न प्रियकराकडे धांव घेतली ...तोंच त्या रत्नाचं तेज आणखी प्रदीप्त झालं, इतकं की तिच्या हाताला चटके बसूं लागले–तीव्र-असह्य! तरी तिने तें आपल्या ओंजळींतून खाली सांडलें नाही!

ते चटके ती हंसत आनंदाने सहन करीत होती. इतकंच काय पण त्या वेदनांनी डोळ्यांतील निघणारीं आंसवं त्यावर पडून त्यांचं तेज कमी होऊं नये या कल्पनेनं ती त्यांना जपत होती, आपल्या प्रियकराकडे धांवत असतांना––

अनुक्रमणिका

तर तो युवक, प्रेयसीशीं सामोरा होण्याआधी त्या कमलांच्या कोमेजून कोळ झालेल्या पाकळ्या प्रफुल्लित करण्याच्या प्रयत्नांत आपले प्राण पणाला लावून फुंकीत, तिच्यापासून दूर–दूर जात होता.

परंतु ती, अनंत काळपर्यंत प्रियकरामागे मागे धांवतच होती–धांवतच होती...

आणि––

कमलांच्या नष्ट झालेल्या सौंदर्याबरोबर तो काळा ठिक्कर पडत चालला होता. तिचं सौंदर्य न् तारुण्य मात्र दिवसेंदिवस अक्षय उजळतच चाललं आहे !

दैदिप्यमान होत चाललेलं आहे ! !

––––

२ मेणाची मूर्ति

स्वर्ग आणि पृथ्वी यांच्या मधील महाद्वारावर थबकलेल्या एका मानवाला देवदूतानं विचारलं, "महामानवा, असा दाराबाहेरच उभा कां ?"

"जगांतील सारे सुखोपभोग घेऊन नंतरच मुक्त व्हावं, अशी इच्छा झाली आहे श्रेष्ठ !" विलोभनीय पृथ्वीकडे दृष्टिक्षेप टाकून मधुर वाणींत उत्तरला तो.

देवदूत अत्यंत गंभीर झालान् म्हणाला, "तें तुला झेपेल का ?"

"आपली जर कृपा झाली...."

"ठीक आहे." आणि देवदूतानें त्याच्या हातीं एक अत्यंत सुंदर पांढरी शुभ्र मेणाची मूर्ति दिली, "हें संचित, ही मूर्ति नीट सांभाळ ! रोज प्रात:कालीं हिची यज्ञपूजा केल्यानंतर, ही, तूं सांगशील ती एक इच्छा रोज पूर्ण करील. तुझ्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या की ह्या मूर्तीसमावेत तूं या महाद्वारावर ये, म्हणजे तुला या शांतीभूमींत पुन्हा प्रवेश मिळेल."

मानव खूप आनंदित झाला व परत पृथ्वीवर आला.

यज्ञकुंडावर त्या मुर्तीची पूजा केल्यानंतर रोज त्याला जगांतील पाहिजे तें सुख, ऐश्वर्य उपभोगायला मिळूं लागलं.

नित्य तो बेहोशपणें कांही तरी नवीन मागायचा.

अन् रोज त्याला तें मूर्तीच्या यज्ञपूजेनंतर मिळे.

सर्व तऱ्हेच्या विलासांत अशा तऱ्हेने लोळत पडला असतांना एके दिवशीं त्याला देवदूताच्या वचनांची आठवण झाली, आणि या सुखांचा कंटाळा आल्यास स्वर्गांत जातां यावें म्हणून मूर्ति शाबूत ठेवावी या विचाराने तो यज्ञकुंडावर आला.

पण यज्ञकुंडाच्या चौथऱ्यासमीप वितळलेल्या मेणाचा शिल्लक अवशेष तेवढा त्याच्या दृष्टीस पडला.

आणि मग संतापाने कातावून चिडून जाऊन तो उरलासुरला अवशेषहि त्याने धगधगत्या यज्ञकुंडांत झोकून दिला !

––––

नाटयछटा

"इथंच चुकतं बरं तुमचं"

सौ. प्रभावती सगदेव

" . . .कालपासून म्हणतेंय की माझं कपाळ उठलंय. पण इकडची काडी तिकडे होईल तर शपथ. संसार जणूं कांही माझ्या एकटीचाच आहे. . .बरं असो, नसो. मी केलं तर होईल घरांत. नाही तर कुण्णी कुण्णी पाह्यचं नाही. . .म्हटलंऽऽ इथंच चुकतं बरं तुमचं ! . . .

. . .एऱ्हवीचं मला नाही वाटत कांही. मी माझं काम असतेंच करीत. पण एखाद दिवस बरं नसलं म्हणजे नको का माणसांनी सोय पाहायला ? त्या छबूचा नवरा किती घरांत करतो तें पाहा जरा ! ! मोलकरीण आली नव्हती म्हणून परवा छबूची साडी देखील धुतली हो त्यांनी. म्हणतात ना—सोय जाणेल तो सोयरा. पण आमच्या इथं रामाचं नांव ! . . .

. . .बरं नाही म्हटलं तर काय म्हणतात ?— स्वयंपाक करूं नकोस. मी जातों तसाच ऑफिसांत—तुम्ही जाल हो. तुमचं ठीक आहे. बाहेर सोयहि आहे अन् खिशांत पैसाहि आहे. पण मला मेलीला पटत नाही त्याचं काय ? त्या तुमच्या ऑफिसांतल्या बेबीताईंचं पाहाना ! त्यांचा नवरा घरांत सगळं पाहतो म्हणे. त्या मला एकदा म्हणाल्या—-शिकवलंय माझ्या मिस्टरना मी सगळं कांही. अडायला नको कुठं. अन् बोलाफुलाची गांठ म्हणतात तसंच झालं. त्याची नोकरी सुटली. अन् तो आता घरांतलं पाहतो सगळं. त्या दोन वर्षांच्या कुंदाचं सुद्धा करतो सारं कांही बरं ! ह्याला म्हणावं नवरा ! ! . . .

परवा मी म्हटलं जातें ताईकडे चार दिवस सुमाला इथंच ठेवून. हो, शाळा नको बुडायला तिची. तर म्हणतात काय ?—-तिचं कोण करणार इथं ! जा तिला घेऊन बरोबर. मी आपलं पाहीन माझं. . .

·-शेवटी कपाळाला हात लावावा लागतो. दुर्दैव आमचंऽ...इथंच चुकतं बरं तुमचंऽऽ—.."

अनुक्रमणिका

~" आमची जम्मत "~

--पद्माकर निमदेव

त्या दिवशीं नेहमीप्रमाणे शाळा सुटल्यावर मीं घरीं आलों. घड्याळांत साडेपांच होत आले होते. मी कपडे काढून ठेवले. पाण्याने चूळ भरली आणि पत्नीने केलेला चहा घेतला. बैठकींतल्या आरामखुर्चीवर पडलों. दुपारीं आलेलें वर्तमानपत्र हातांत धरलें. वर्तमानपत्र वाचण्याचा माझा शौक फार जुना आहे. वर्तमानपत्र वाचीत असतांना पंधरावीस मिनिटें कुणी आपल्याला त्रास देऊं नये असें माझ्या मनाला सारखें वाटत असतें.

त्या दिवशीं मी वर्तमानपत्राचें पहिलें पान उघडलें आणि छोटी सुनंदा आपल्या चिमुकल्या हातांत एक बाहुली घेऊन माझ्या खुर्चीपाशी येऊन उभी राहिली. तिने मला हांक मारली—" बाबा, बाबा ".

वर्तमानपत्रावरची दृष्टी न हलवतांच मीं नुसतें "हूं" केलें. आपलें लक्ष तिच्याकडे नाही असें पाहतांच तिने आपल्या हाताचीं इवलीशीं बोटें माझ्या गालांवर फिरवीत पुन्हा हांक मारली-- " बाबा, बाबा ". तिच्याकडे तोंड वळवून मी विचारलें, "काय म्हणतेस?"

" तुम्हांला एक जम्मत सांगायची आहे ", ती म्हणाली.

मी तिला सांगितलें, " तुझ्या त्या बाहुलीला सांग आधी ".

" वरं "-- असें म्हणून ती कोपऱ्यांत गेली व बाहुलीच्या तोंडाशीं आपलें तोंड नेऊन तिने बडबड सुरू केली--माझें लक्ष अर्थातच तिच्या त्या बडबडीकडे नव्हतें.

दोनच मिनिटांत ती मघाप्रमाणे माझ्या कानाशीं येऊन म्हणाली, " बाबा, सांगितली मी ती जम्मत बाहुलीला; आता सांगूं का तुम्हाला ".

" वा ! त्या आपल्या मिनी मांजरीला सांगना "--

" वरं ", म्हणून ती माजघरांत गेली.

पुन्हा दोन मिनिटांत ती परतली व माझ्या कानाशीं येऊन म्हणाली " बाबा, सांगितली हो मिनीला. आता सांगूं तुम्हाला "

" त्या तुझ्या शेजारच्या मैत्रिणीला, बालीला सांगना ".

" वरं ", म्हणून ती शेजारच्या बालीकडे गेली.

पुन्हा दोनच मिनिटांत ती परतली व माझ्या कानाशीं येऊन म्हणाली--"सांगितली बालीला, आता सांगूं कां तुम्हाला ".

वर्तमानपत्र मी नजरेसमोरून दूर केलें. आणि तिच्याकडे फारसें लक्ष न देतांच उत्तरलों--" हूं, सांग ".

सुनंदेला कमालीचा आनंद झालेला दिसला. आपल्या पायाचे पंजे उंचावीत तिने आपले इवलेसे हात माझ्या कानांशीं लावलें. मी किंचित् मान वांकविली, सुनंदा आपल्या बोबड्या शब्दांत सांगूं लागली--"किनी बाबा, एक आमची जम्मत आहे. कुण्णाला सांगूं नका. मला माझे बाबा आवडतात. खूप खूप आवडतात. झाली आमची जम्मत ".

" झाली आमची जम्मत ", असें म्हणून ती नाचूं लागली. हाताने टाळ्या पिटूं लागली; नी मोठमोठ्याने हसूं लागली.

मी पटकन खुर्चीवरून उठलों. वर्तमानपत्र दूर फेकून दिलें. सुनंदेला उचलून धरलें. तिचे पटापट पापे घेतले. तिच्या त्या टवटवीत चेहऱ्यावरून हात फिरवितांना माझ्या मनांत आलें— सुनंदेसारखें चालतें--बोलतें वर्तमानपत्र असतांना या कागदाच्या वर्तमानपत्राची काय आवश्यकता !

सुनंदेने आपल्याला काय आवडतें याचा शोध लावला नसला तरीपण मला मात्र एका गोष्टीचा शोध नक्कीच लागला होता. सुनंदेला आपण आवडतों. तिची जम्मत मला कळली होती. पण ती कुण्णालाच कळूं द्यावयाची नाही असें मात्र मीं ठरविलें.

आमची दोघांची ही जम्मत सौभाग्यवती दारांतच उभी राहून पाहत होती.

[इंग्रजी गोष्टीच्या आधारें]

कथा —

सुनवापरी

—उद्धव ज. शेळके

फार झालं, तर वाजले असतील अडीचेक. डोक्यावरचा सूर्य किंचित्सा पश्चिमेस झुकला होता. तरी किरणें तिरकीं झाल्यागत् वाटत नव्हतं. तीं सरळच मला सुकवीत होतीं. नाही म्हणायला मध्येच एकादं लप्पेदार झाड माझी कीव करी अन् माझ्यावरचीं उन्हें स्वतांच्या शिरावर झेली. त्यांतलींहि कांही माझ्यावर सांडतच–तरी क्षणिक वरं वाटे, पण तें अत्यंत अल्पकाल सावलीचं सुख जाणवायच्या आत ती टाकून माझी सायकल पुढं गेलेली असे. झाडांच्या दाटींत कुठं तरी नाहीशा होणाऱ्या डामरी रस्त्याचं टोक–अगदी माझ्या गावापर्यंत न संपणारं टोक मी बघण्याचा दुबळा प्रयत्न करीत असें. पॅडल फिरवतां फिरवतां अन् घाम गाळतां गाळतां मी रस्ता कापीत होतों. तसा सकाळच्या दहापासून कापीत आलों होतों. श्वशुरांकडून निरोप घेऊन निघण्यापूर्वीं त्यांनी मला सांगितलं होतं, की उन्हं कलल्यावर निघा–किंवा मी छकडं अन् गडी सोबत देतों–त्याला घेऊन जा. पण त्यांचा हा प्रेमाग्रह मी कांहीसा बुद्धिपुरस्परच हेटाळला होता. अन् सायकल उचलून गावच्या वाटेनं लागलों होतों. आता माझे डोळे गावीं गेले होते. शरीर सायकलवर होतं अन् मन...

तें मध्ये लागणाऱ्या भूपगावांत–कलावंतीकडे रेंगाळत होतं. ही कलावंती म्हणजे आमच्या पांचसात माडेकरूंपैकी एकाची मुलगी होती. आम्हीं दोघं कळू लागेपर्यंत एकांत खेळलों होतों. तिला कळू लागल्यावर वडिलांनी बोहल्यावर चढवलं होतं अन् मी नोकरीला लागल्यावर चारचौघांसारखा लग्नास तयार झालों होतों. तसा मी तर अत्यंत सुखी होतों. नुकत्याच झालेल्या पहिल्या मुलास बघण्याच्या अतिउत्सुकतेमुळं, ऑफिसनं रजा नामंजूर केल्यावरहि अन् लग्नसराईच्या दिवसांत मोटारी मिळणं कठीण जातं, याची जाणीव ठेवून, सायकलनं जाण्यायेण्याचा त्रास सहन करून माझ्या पहिल्या मुलास बघण्याची उत्कंठा मी नुकतीच पूर्ण केली होती–इतपत माझा संसार सुखी–समृद्ध होता. शनिवारचं ऑफिस आटोपून मी श्वशुरग्रामीं गेलों होतों अन् उद्या वेळेवर हजर राहण्यासाठीं पुन्हा उमरावतीला परतत होतों. मीं माझ्या सुखी–संसाराची ग्वाही देण्यासाठी एवढं लिहायला नको होतं. यावरून कलावंतीचा संसार दुःखी आहे की कायशी शंका डोकावते. पण तसं कांही नाही. चारचौघींसारखी तीहि आपल्या संसारांतून सुख शोधते आहे. माहेरीं आली म्हणजे सहजच आमच्याकडेहि येऊन जाते. पात्रतेप्रमाणं तीहि सुखी असल्याचं बोलते, ऐकवते. नाही म्हणायला मध्यंतरीं एकदां तिच्यावर साडेसाती कोसळली होती. काय झालं देव जाणे–पण एकदा ती सतत चार महिने माहेर भोगत होती. आईबाबांकडून मला उडत उडत कळलं होतं की तिचा बाप तिला सासरीं पाठवूं इच्छित नाही. कारणादाखल ते म्हणायचे की पोरीला खूप त्रास देतात. अति सासुरवास सहन करावा लागतो. असे चार महिने गेल्यावर माझ्या आईबाबांनी कलावंतीच्या माय–बापाची समजूत काढली व स्वतां मध्यस्थी पत्करून उसवूं पाहणाऱ्या नात्याला टाके भरले. त्यावेळीं कलावंतीची सासूच तिला न्यायला आली होती. जेवणखाण आमच्याचकडे होतं. जातांना तिची मुद्रा माझ्या बाबांची कृतज्ञता व्यक्त करीत होती, अन् कधी मला, कधी आईला तर कधी बाबांना तीनतीनदां म्हणत होती की एकदा तरी आमच्याकडे येऊन जा.

पण आमच्यांतल्या कुणालाच तिकडे फिरकण्याची गरज भासली नाही अन् त्यावाचून आपचं कधी अडलंहि नाही. तसं तें कलावंतीच्या सासूचंहि

अडल्यागत दिसलं नाही. एकदा सुनेला घेऊन गेल्या-नंतर तिनं आमच्या दारांत पाय ठेवला नाही की कांही निरोप पाठविला नाही. जणुं तिचा आमचा मुळीच परिचय नाही, कांही संबंध नाही.

नाही म्हणायला–कलावंती जेव्हा केव्हा माहेरीं यायची तेव्हा तेव्हा कधी माझ्या वडिलांना, "काकाजी, एखांद्या डाव यानं माह्या घरीं,–" कधीं आईला, "मावशी येनंओ एखांद्या दिवशीं माह्या इथं...पाय तं माहं घरं–" तर कधी मला, "प्रभाकर–तू तरी येनं एखांद्या वक्ती माहं घर पायाले–आमासा फिरत फिरत आला तरी होते–पण तुह्या मनांत असन तई का नाई"–म्हणायची. अन् त्यावर आम्ही आपलीं उत्तरें द्यायचीं, "कधी तरी येईन ओ कलावंत्ये तुझ्या घरीं"...बस. याउपर आमची कधी मजल जायची नाही. अन् ती माहेरीं आल्यावर आपलं एकच एक पालुपद आळवल्याखेरीज आमच्या घरून हटायची नाही.

माझं लग्न झाल्यावर तर कलावंतीच्या पालु-पदांतून आशा ठिबकूं लागे. कारण माझ्या श्वशुरग्रामीं जातांना तिचं सासर ओलांडावं लागे. जातां येतां कधी तरी मी तिथं उतरावं अन् तिचं घर बघावं असं ती किती तरी वेळां बोलन गेली होती अन् प्रत्येक वेळीं मी म्हणालों होतों, "आता जेव्हा केव्हा तुझ्या भाव-जयेला आणण्यासाठी मी माहुलीला जाईल तेव्हा नक्कीच उतरेन तुझ्याकडे !" अन् तें मला शक्य होत नव्हतं. कधी उतरणं जीवावर आल्यानं–कधी मधून उमरावतीचं तिकीट न देण्याच्या भयानं–तर कधी कलावंतीविषयीच्या अनास्थेनं मी तें टाळत–टाळत आणलं होतं–आलं होतं. आता आताशा तर ती तसं म्हणतहि नव्हती. अन् मीच कधी विनोदानं माझ्या सौ. ला उद्देशून म्हटलं, "वरं का, यावेळीं माहुलीला जातांना आपण भूपगावांत उतरूं !" तर कलावंती नापसंतीनं मानेला झटका देऊन म्हणायची, "तूं कायले येतं बापा माझ्या गरीबीनच्या घरीं !" मग उसन्या रागानं तणतणायची, "मी तुई सग्गी बहीन थोडीच आवो त माह्यासाठी साती कामं टाकून भेटाले येशीन !"

असं दोनचारदां ऐकल्यावर मी मनाशीं निश्चय बांधला की आता काय वाटेल तें झालं तरी चालेल–पण या वेळीं माहुलीला जातांना कलावंतीच्या घरीं जाऊन येईनच.

आणि आताहि माझे विचार त्या निश्चयास चिकटून आहेत. वास्तविक काल जातांनाच मी इथं थांबणार होतों–पण पुढं रात्र होण्याच्या भयास्तव आजवर लोटलं. तें आता पूर्ण करणार. अशा विचारां-तच मी रस्त्याकडें, मधूनच येऊन जाणाऱ्या मैलाच्या–फर्लांगाच्या दगडांकडे बघत आहे. स्वतांशीं विचार करतों आता फक्त दीड मैल, आता एक...आता पांच फर्लांग—

पण तेवढ्यांत मला ओळखीची मुद्रा दिसली. मी स्मृति चाळली. ही कोण? कुठे तरी पाहिल्यासारखं वाटतं–पण भूतांत धडपडण्याची गरज नाही. अस्पष्ट ओळखीच्या मुद्रेमागचा चिरपरिचित वर्तमानकाळ–कलावंतीच्या रूपानं माझ्याशीं बोलतो आहे. कला-वंतीच्या एकाएकी तेजाळलेल्या तोंडावळ्यांतील उत्सुक शब्द बाहेर पडले,

"पर्भाकर !"—

मी सायकलवरून उतरलों. तिच्या सोबतची तिची सासू असल्याचा मला उलगडा झाला. माझ्या आधी तीच म्हणाली,

"बाप्पा ! तुमी कुठं इकडे !"

"तुमच्याकडेच येणार होतों आता !"

कलावंतीकडून नाही राहवलं,

"हो ! पाहाना लबाड काय खरं बोलून राह्यला !"—

"खरंच बुवा ! त्यासाठी तर लवकर निघालों माहुलीहून !" मी योग्य तें सांगितलं, "म्हटलं, जातां जातां एकदा जावं तुझ्याकडे !"

कलावंतीची मुद्रा खूपच उजळली,

"खरंच ?"

"तर ?"

मी म्हटलं अन् तिच्या सासूकडे बघूं लागलों. दोघींच्या हातीं नारळाच्या दोऱ्यांचीं वेटोळीं होती–

तशी चुंभळेसाठी घेतलेलीं लुगडयाचीं फडकींहि होतीं. हें सारं पाहिस्तोवर सासू कांहीच बोलली नाही. ती एकदा सडकेकडे लांब कुठं तरी बघत होती. हें जाणून मी म्हणालों,

"कुठं चालल्या होत्या ?"

सासू म्हणाली,

"जात होती बाऱ्याच्या खळयावर-त्यानं दोन भारे कडबा देऊं केला त घो आनाले !"

मला सुटल्यासारखं झालं,

"मग जाना !"—

कलावंती घाईनं म्हणाली,

"आनूं उद्यागिद्या ! तूं का पुनां याले वसला !'

आणि ती सासूची मुद्रा हेरूं लागली. उत्तरादाखल तीहि उतरली, "थेई खरं आये !–चाला !"

कां कुणास माहीत–मला तिचा स्वर थोडा जड–रुक्ष वाटला. मी म्हणालों,

"किती वेळ लागेल ?"

सासू घाईनं—

"कुत्याजी येथ–आता गेलों का आतां चकून येतों!"

कलावंतीनं एकदा सासूकडे अन् दुसऱ्यांदा माझ्याकडे पाहिलं. तें जाणून मी म्हणालों,

"तरी ?–लागेल एखादा तास ?"

कलावंती म्हणाली,

"एका घंटयानं काय होते !"

तेव्हा सासूनं तिच्याकडे पाहिल्यासारखं केलं. मला मऊपणे म्हणाली,

"वस लयच झालं त एक घंटा."

"तसं असेल तर मी थांबतों."

एकाएकी सासूच्या अंगांत अवसान दाटलं–पण त्याच वेळीं कलावंतीचं गळालं. ती नुसती आपल्या पायाकडे बघत होती. सासू घाईनं म्हणाली,

"कुठं थांबतां —"

"थांबेन कुठं तरी–पण एका तासाच्या वर मात्र नाही थांबणार हं—"

"आमाले जास्त येर लागतच नाही–पन समजा अधीक घंटा लागला त जाऊं मोका !"

> किंचित्—काव्य
>
> अस्ताला मग कां
> उगा भिवजणें !
> गर्भात ती माऊली;
> उद्याचा जर जन्म
> निश्चित असे,
> कल्पान्तीं, दावानलीं !
>
> —भास्कर लांबे

आता विचारांत पडण्याची माझी पाळी होती.

कलावंती म्हणालीच,

"कायचा थांवते थो !"

सासू, "होजी ?"

मी भानावर आलों,

"हो–हो. बहुतेक थांबेन. तुम्ही जा !"

"जान त नाही ?"

कलावंती, उपरोधानं—"रायते थो आता—"

सासू, "होजी ? जान कां ?"

"नाही."

"येच मंतो. तशी मी गेलीई नस्ती–पन आज ढोराईले चारा नाई–मून जातो. आन् ग्या बाऱ्यानं फुकट देऊं केल्या दोन पेंडया...आज नाई गेली त उद्या देते का नाई !—"

तिचं समर्थन लांब वाटल्यानं मी म्हणालों,

"जाना तुम्ही–मी थांबतों—"

"आमी गेईठावरक जावूं नोका वरं..."

मला म्हटल्यानंतर ती कलावंतीला म्हणाली,

"चालओ, वातकन् जाऊन येऊं."

अन् चालूं लागली. सहज मी मागं पाहिलं तेव्हा कलावंती वळून माझ्याकडे बघत होती. दृष्टादृष्ट झाली तेव्हा तिनं लुगडयाचा पदर ओठयाला लावला.

[एका नर्तकीची भावविव्हळ आत्मकथा]

अञ्जलि

सौ. भानुमती सिंह

मी एक नर्तकी होतें. विलास हें माझें जीवन होतें. माझें सौंदर्य अप्सरेला सुद्धा लाजवील इतकें अप्रतिम होतें. आकाशाची नीलिमा, अरुणाची अरुणिमा, अग्नीची रक्तिमा आणि चंद्रिकेची पौर्णिमा अशा अनेक नैसर्गिक छटांनी माझ्या सौंदर्याला रंग चढविला होता. वायूचा स्वैरपणा, सलिलाची चंचलता आणि विजेची चमक हीं माझ्या स्वभावाचीं वैशिष्टयें होती. श्रृंगार आणि साज ह्यांत माझे दिवसांचे चोवीस तास कसे निघून जात हें माझ्या कधीहि लक्षांत आलें नाही. माझ्या रूपाचा मला अतिशय गर्व होता. सौंदर्य आणि कला ह्या दोन्हींचा एक सुंदर मिलाफ माझ्या ठिकाणीं झाला होता. कोणी म्हणतात सौंदर्यांत कलेचा विकास होतो, तर कोणाच्या मतें कला आणि सौंदर्य हीं जुळीं भावंडें असून त्यांचा जन्म आणि विकास हा बरोबरच होत असावा, असें प्रत्यक्ष माझ्या अनुभवानें मला पटलें होतें.

जग माझ्या सौंदर्यानें मोहित झालें होतें की, माझ्या कलेनें आकर्षित झालें होतें या प्रश्नाचें उत्तर मला कधीहि मिळालें नाही. माझ्या जीवनांत सौंदर्य आणि कला ह्यांत कोणालाच प्राधान्य नव्हतें आणि म्हणूनच माझें जीवन म्हणजे मला आणि साऱ्या जगाला न सुटणारें कोडें होतें.

स्त्री जातीनें तर मी जणुं त्यांच्यापैकी कोणीच नाही म्हणून मला वेगळें काढलें होतें. त्यांच्या मतें माझें सारें "और" होतें. माझा विलास, माझा श्रृंगार, माझें सौंदर्य आणि माझी कला ह्या साऱ्या गोष्टी सर्व-सामान्य स्त्रीला न शोभणाऱ्या अशा होत्या. त्यांच्या दृष्टीनें मी एक असामान्य स्त्री होतें. पण त्यांनी माझ्याकडे कधीहि अभिमानानें पाहिलें नाही. अगर माझा कधीहि आदर केला नाही. उलट त्या माझा तिरस्कार करीत. अनेकवेळां मला प्रश्न पडे, काय, स्त्री जात इतकी अरसिक, भावनाहीन, निर्दय आणि दुष्ट आहे का, की, तिला अप्रतिम सौंदर्याचें आणि उच्च कलेचें कौतुक तर दूरच राहिलें पण तिरस्कार वाटावा! छे—कवींनी स्त्रीजातीची केवढी थोरवी वर्णन केली आहे. रसिक, भावनाशील, सहृदय, आणि प्रेमळ म्हणून तिचे गोडवे गायिले आहेत. मग मलाच असा अनुभव कां यावा? पण लवकरच मला माझ्या प्रश्नाचें उत्तर मिळालें. स्त्री जातीच्या सर्व गुणांना खाली पहावयास लावणारा एक फार मोठा दुर्गुण तिच्यांत निसर्गानें ठेवलेला आहे आणि तो म्हणजे "मत्सर!" ह्या स्त्री-जातीच्या मत्सरी स्वभावांत मला माझ्या प्रश्नाचें उत्तर मिळालें आणि मी माझ्या मनाचें समाधान केलें.

पुरुष जातीची मात्र मी देवता होतें. आजपर्यंत अनेक पुरुषांनी माझ्या पायावर अक्षरशः लोटांगणें घातलीं होतीं. सौंदर्याचे उपासक आणि कलेचे पुजारी म्हणून स्वतःला म्हणवून घेण्यांत त्यांना अभिमान वाटत असे. माझ्या कलेचा आस्वाद घेत असतांना ते देहभान विसरून जात. आणि माझ्या सौन्दर्यानें मोहित झालेली त्यांची दृष्टि, एक क्षणभरहि माझ्या तरल दृष्टीशीं सामना देवूं न शकल्यामुळे दुसऱ्याच क्षणाला खाली वळत असे. आणि अशा तऱ्हेनें भांबावलेलीं त्यांचीं हृदयें-दुबळीं हृदयें-माझे पाय धरण्यापलीकडे कांहीही करूं शकत नसत. पुरुषजातीनें माझ्या सौन्दर्य आणि कलेवर गायिलेले स्तुतिपाठ ऐकून मला वीट आला. माझ्या कलेचें प्रतीक म्हणजें माझीं पाउलें. ह्या माझ्या दोन गोष्टींनी त्यांना वेडें बनविलें आणि त्यामुळे नर्तकीला हृदय असतें, तिला भावना असतात, ह्याची त्यांना कधीहि जाणीव झाली नाही. माझ्या हृदयाचा ठाव घेऊन माझ्या भावनांशीं समरस होण्याचा कधीच कोणी प्रयत्न केला नाही. केवळ बाह्य सौंदर्यानें आक-र्षित होणारी आणि वरवरच्या गोष्टींना भुलणारी ही पुरुषजात, मला तिचा तिरस्कार वाटूं लागला.

अनुक्रमणिका

स्त्रीजातीनें माझा तिरस्कार केला आणि पुरुष जातीचा मी तिरस्कार करूं लागलें. अशा एका विचित्र मनःस्थितींत आणि परिस्थितींत मी भांबावून गेलें. कारण मानवी जगांत मला स्थान उरलें नाही. माझा सारा गर्व आणि अभिमान नाहीसा झाला. माझें सौंदर्य, माझी कला, सर्व मला नकोसें वाटूं लागलें. माझ्या जीवनाचा मला कंटाळा आला. माझ्या आयुष्यांत मला हार्दिक प्रेम आणि त्यामुळे मिळणारी मानसिक शांति कधीच मिळाली नाही, ही गोष्ट मला आता तीव्रतेने जाणवूं लागली. मानवी जगांत ह्या गोष्टी मला मिळणें शक्य नाही ही माझी खात्री झाली. आणि म्हणूनच मानवी जगापासून दूर दूर जाण्याचा मी प्रयत्न करूं लागलें. विलासाच्या भरांत ज्या माझ्या हृदयाचा मला विसर पडला होता आणि श्रृंगाराच्या ऐन रंगात ज्या माझ्या मनाला मी दाबून टाकलें होतें त्या हृदयाचें आणि मनाचें अस्तित्व आता मला तीव्रतेने जाणवूं लागलें. हृदयांतील विविध भावनांनी मी भांबावून गेलें आणि मनांतील अनेक विचार मला भेडसावूं लागले.

अशा असहाय्य स्थितींत आंतरिक शांतीच्या शोधार्थ भटकत असतांना एक भव्य मन्दिर माझ्या दृष्टिपथांत आलें आणि कोणती तरी एक अदृश्य ओढ मला त्या मन्दिराकडे नेवूं लागली. एका विलक्षण आकर्षणाने मी आंत खेचलें गेलें. आणि तेथील पवित्र आणि शांत वातावरणांत प्रवेश करतांच जादूची कांडी फिरल्याप्रमाणे माझ्यांत कायाकल्प झाल्याचा मला भास झाला. हृदय शांत झालें. मन स्थिर झालें. एका अदृश्य शक्तीने मला कोठेतरी ओढल्यासारखें वाटूं लागलें. आणि दुसऱ्याच क्षणाला माझ्या हाताचा विळखा एका मूर्तीच्या पायाभोवतीं पडला. त्या मूर्तीचें मुखदर्शन करण्यापूर्वी माझें मस्तक त्या अद्वितीय चरणांवर नत झालें. आणि कोणत्यातरी दिव्य प्रकाशांत माझा आत्मा विलीन झाला. किती वेळ मी त्या स्थितीचा अनुभव घेत होतें हें मला आता सांगतां येत नाही. पण ज्या वेळीं मी भानावर आलें त्या वेळीं हरवलेली वस्तू अचानक सापडल्याचें मला समाधान वाटलें. आणि त्या दिवसापासून पुष्पाञ्जली हें माझ्या जीवनाचें प्रतीक बनलें. आणि लोक मला पुजारीण म्हणूं लागले.

इतिहासांतील ललितकथा–

दाढीच्या लांबीवर नियंत्रण

तीन भाऊ आणि प्रत्यक्ष स्वतःचा पिता यांची त्याने वाट लाविली. स्वतःला 'आलमगीर' ही पदवी चिकटवून तो वयाच्या चाळीसाव्या वर्षी इ. स. १६५८ त गादीवर बसला. त्या क्रूर माणसाचें नांव—

"बादशहा औरंगजेब"

खाजगी जीवनांत तो अगदी निरीच्छ होता. उदरनिर्वाहासाठी स्वतः टोप्या शिवून त्या विकून आलेल्या पैशांचा उपयोग करी. विवस्त्र भूमीवर निजे आणि व्याघ्रचर्म पांघरे. दारूला शिवतहि नसे. पण बादशहा म्हणून—

औरंगजेबाने काढलेलें एक विचित्र फर्मान वाचा—

"कोणत्याहि इसमाने चार बोटें लांबीपेक्षा जास्त लांबीची दाढी ठेवूं नये !"

या आज्ञेचें पालन करण्यासाठी त्याच्या प्रजाजनांना रोज सकाळीं दाढीची लांबी मोजून तिची काटछाट करावी लागे. आजकाल सायकलीचे बिल्ले तपासण्यासाठी जसे नगरपालिकेचे सेवक रस्तोरस्तीं उभे असतात तसे आलमगीर औरंगजेबाच्या राज्यांत लोकांच्या दाढ्या मोजण्यासाठी सेवक उभे असत. बाजवीपेक्षा जास्त लांबीच्या दाढीदीक्षितांना कैदखान्याची व प्रसंगीं वधस्तम्भाचीहि हवा खावी लागे.

—आकाशानंद

अव्हेर

—मनोहर तल्हार

तो आराम खुर्चीत बेफिकीरपणे सिगारेट ओढीत आहे. तो तसा बेफिकिरपणा दाखवत आहे, परंतु खरें म्हणजे तो आता तरी त्या 'मूड' नाही. तो खूप अस्वस्थ आहे. पण त्याला दाखवावयाची आहे बेफिकीरी ! ती निश्चल उभी आहे. तिने थाटलेला संसार तिचा पाय बाहेर ओढीत नाही. घरांतली टापटीप आणि सार्वें सौंदर्य तिने निर्माण केलें आहे. तें पाहून तिचे डोळे ओले होतात आणि हृदय ढवळून निघतं; पण तें लपविण्याचा ती प्रयत्न करीत आहे. शेवटचें अेक वेळां पाहून ती आपली सूटकेस उचलते.

"आपली तशी इच्छाच आहे तर मी निघून जातें. म्हणजे माझ्या जाण्याने जर आपण सुखी होत असलांत तर तुमच्या आयुष्यांतून मी निघूनच जातें." ती मनांतला कोलाहल व्यक्त करीत नाही. तो अस्वस्थ होतो. बेफिकिरीचें नाटक खुलें पडतें. त्या अस्वस्थ स्थितींतच तो विचारतो,

"कुठे निघून जातेस--?"

"अगदी दूर...कुठेहि..."

"निघून जायला तुला घर नाही कां ?"

"पण तें माझं नाही. माझ्या वडिलांचं आहे !"

"मग जें तुझं आहे, तिथं तरी तूं व्यवस्थित रहा."

"व्यवस्थितचा अर्थ हाच ना की, मी तुमच्या म्हणण्याप्रमाणें वागावें ?" तिच्या स्वरांत कठोरता आहे.

"अर्थात्‌च ! चार चौघी स्त्रिया जशा राहतात तशी—"

"पण मी राहूं इच्छित नाही."

"हा तुझा बेजबाबदारपणा आहे" तो कांहीसा चिडून म्हणतो.

"पतीच्या आज्ञेंत स्त्रियांनी राहावं हें मलाहि मान्य आहे."

"मग अडचण कोणत्या गोष्टीची आहे ?"

"मीं तुमच्याबरोबर हसतखिदळत हिंडावं; इतरांसमोर लचकावं, मुरडावं; वेडेवांकडे हेल काढून तुम्हांबरोबर इतरांनाहि—"

"त्यांत जर मला सुख मिळत असेल तर—"

"तुमच्या सुखाकरितां मी कोणतीहि गोष्ट करायला तयार आहें. पण तुमच्या सुखांतून त्याच गोष्टीचं इतरांना सुख मिळत असेल तर तें मला नको आहे."

"तूं थोडी विचित्रच. आहेस या बाबतींत आज मुंबईत जॉर्जेटची गोलसाडी; उंच टांचेची सँडल्‌स्‌, बॉब केलेले केस; तंग बाह्याचे आंखूड पोलकें अशा वेषांत; चेहऱ्यावर स्निग्ध गुलाबी हास्य आणून फिरणारी स्त्री ही पतिव्रता नसूं शकते काय ?"

"ती खरोखरी पतिव्रता असेलहि. तसं करण्यांत जर तिचा पति सुखी होत असेल तर ती किंवा तो यांच्यापैंकी कुणी तरी मूर्ख असावयास पाहिजें. कारण त्या तिच्या सौंदर्याने नुसता तिचा पतीच सुखी होत नाही, तर अनेक टवाळखोर तरुणहि सुखी होतात. नेत्रसुखहि सुखाचाच एक प्रकार आहे ना ?"

"तो पर्याय आहे. त्याला इलाज नाही."

"पतीला जर ती त्याच पोशाखांत आवडत असेल तर तिने आपला घरगुती पोशाख तोच ठेवायला कांहीच हरकत नाही." ती त्याच्या दृष्टीला दृष्टि भिडवून म्हणते.

"जशी तुझी आहे–?" तो कुत्सिततेने विचारतो.

"होय, मला तेंच म्हणायचं आहें. मी फक्त तुमच्याकरिता आहे. तुम्ही ध्यानांत ठेवायला हवं—"

"तें माझ्या पुरतं ध्यानांत आहे. प्रश्न हा आहे

की; तूं वधूपरीक्षेच्या वेळीं त्या नखरेल पोशाखांत कां आलीस ?"

"त्यावेळीं आपणां दोघांशिवाय कुणीच नव्हतं-"

"मी त्यावेळीं तुझा अव्हेर केला असता तर ? तर तुझ्या दुसऱ्या कुणी होणाऱ्या पतीच्या दृष्टीनें तूं दुसऱ्याकरिता केलेला तसला शृंगार नसता काय ?"

"अर्थात् ह्या गोष्टीची त्यांना जाणीव नसते."

"म्हणजे एकूण ही फसवणूकच !"

"एका नियोजित वरानें नकार दिला तर प्रत्येक तरुणीचा या बाबतींत हाच प्रकार होऊं शकतो."

"तें मलाहि पटतं, पर तिचा चार चौघां जोडप्यांसारखं जीवन जगण्याच्या बाबतींतच कां नकार असावा, हेंच मला पटत नाही."

"चार चौघांसारखं आणि चारचौघांसमोर असले थेर करणं निदान मला तरी आवडत नाही. मी तुमच्याकरिता आहे आणि तुमची तशी इच्छाच आहे तर केवळ तुमच्याकरिता मी तसले थेर घरांत करायला तयार आहें."

"तुझं हें तत्वज्ञान मला पटत नाही," तो निग्रहाने आणि कळकळीनें सांगतो— "असा भलताच हेका तूं करतेस म्हणूनच मला तुला तो निर्णय सांगणं भाग पडलं आहे. चारचौघांसारखं जगण्यांतच जीवनांतल्या खऱ्या आनंदाचा—"

"मला तुमचं म्हणणं बिलकुल पटत नाही."

"या गोष्टीला माझा नाईलाज आहे. पुन्हा विचार कर. पतीनें अमक्या कारणासाठी म्हणून तुझा अव्हेर केला असं जगानं म्हणतां कामा नये—"

"मी प्रथमपासूनच म्हणतें आहे की, जगासाठी मला कांही करायचं नाही. मला फक्त तुमच्याशीं कर्तव्य आहे. फक्त तुम्ही तसं म्हणूं नये अशी माझी इच्छा आहे."

इच्छा नसतांहि आलेला हुंदका ती आवरते, खोलींत चौफेर नजर टाकते आणि आपली सूटकेस उचलून निग्रहाने जिना उतरते.

तो नुसता पाहत राहतो. तो बेफिकीरपणा दाखवितो, पण तो अस्वस्थच झालेला आहे. तो खिडकींतून पाहतो. खिडकींतून दिसणाऱ्या एकान्त रस्त्यावरून मागे न पाहतां ती झपझप चाललेली असते. तो तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहतो आणि सिगारेट ओढीत बेफिकीरपणाचा आव आणतो.

इतिहासांतील ललितकथा—

आणि हा माशा मारणारा राक्षस ...

एक होता राक्षस.

हो, त्याला राक्षसच म्हणायचें. कारण त्याचा देह पाहून लहान मुलें भीतीनें बेशुद्ध होत. आणि स्त्रियांची बोबडी वळे. माणसें देवाचा धावा करून विनवीत, "देवा याला या जगांतून लवकर उठव कसा !..."

हाच आमचा माशा मारणारा राक्षस.

एवढा मोठा देह; अन् माशा मारण्याचें काम कसा करीत असे ?...थांबा. या प्रश्नाचें उत्तर शोधण्यापूर्वी आपण हा राक्षस कोण होता तें पाहुं या —

अहमदनगर हें सुंदर शहर वसविणारा अहमदशाह मरण पावल्यावर त्याच्या नातू महमूद बेगडा हा इ. स. १४५९ मध्ये गुजरातच्या गादीवर बसला. त्याने चंपानेर आणि जुनागड हे दोन बळकट किल्ले काबीज केल्यामुळे त्यास बेगडा असेंहि नांव पडले.

महमूदाची विशाल काया काळीकभिन्न होती. त्याचा आहार फारच मोठा होता. मादक, विषारी वस्तूंच्या सेवनामुळे त्याच्या शरीरांतील प्रत्येक रक्तबिंदूत विष भिनलें होतें. त्याचें शरीर जहरी झालें होतें तें इतकें की—

शरीराच्या कोणत्याहि भागावर साधी माशी जरी बसली तरी ती तत्क्षणीं मरून पडे.

याप्रमाणे माशा मारणाऱ्या या राक्षसाच्या क्रूर कृत्यांमुळे प्रजा इतकी त्रस्त झाली होती की महमूदाचा मृत्यु होतांच प्रजाजनांनी आनंदोत्सव साजरा केला.

—आकाशानंद

अनुक्रमणिका

रात्र

—भास्कर कविमंडन

त्याने मांड चाळविली...कळ लागली नव्हती पण लागण्याच्या बेताला आली होती.

तशी कळ लागली असती तर हवी होती, पण तरीहि त्याने मांड चाळविली.

सतारीच्या तारांवरील हलकीं बोटें त्याने जड-पणाने खालीं घेतलीं. मध्यरात्र उलटून गेली असावी.

तो बाहेर गच्चीवर आला. चंद्राचा मोहोर काळ्या आकाशाला देखील मिळाला होता. क्षण, दोन क्षण त्याने अंधाऱ्या वातावरणांत सहज भरारी घेतली. खोल पाण्यांत उगाच जशी जराशी सूर घ्यावी...मग तो स्वत:शीं बोलला, " किती छान आहे...आज अंधार आहे..चंद्र अद्याप आला ना–ही.." पण हे उद्‌गार काढतांना त्याची जीभ धीट राहिली नाही..कापली. त्याने खोलींतील उघडी पडलेली सतार पाहिली. वर काळ्या रात्रीची चमचमती लाज पाहिली. पण त्यांना पाहतांना त्याचे डोळे धीट राहिले नाहीत, लवलवले. गंभीर गिरकी त्याने घेतली. व झोपायच्या खोलीकडें वळला. दार बंद होतें. त्याने टिकटिक् केलें. थोडी वाट पाहिली. पण दार उघडल्या गेलें नाही. मग त्याने बोटांचा दाब वाढविला. व दार हळू हळू सरकूं लागलें.

तो दचकला. म्हणाला, "म्हणजे ! ती अजून जागीच असेल ?..."

तो आंत गेला. अंधार पुरेसा दाट होता. त्याची बावरली पापणी त्याने सावकाश सावरली. व मग दिवा लावला.

त्या मंद प्रकाशांत त्याने खोली पाहिली व पुन्हा त्याची नजर बावरली···चमकून त्याने विचारलें—

"तूं ?...तूं जागीच आहेस ?" त्याने डोळे घट्ट मिटले व प्रयत्नाने उघडले...व तिला पुन्हा पाहून म्हटलें—"श्याम !...तूं जागीच ?...मध्यरात्र झालीय···"

ती गडबडली नाही. म्हणाली—"नाही...मध्य-रात्र उलटून गेलीय्..."

"मग ? तूं आज अद्याप जागीच ?"

"कां ? मला नाही जागतां येत ?"

"छे! तसं कांही नाही...पण बराच उशीर झाला नाही का ?"

तिने या प्रश्नाचें उत्तर दिलें नाही. तांब्यांतील पाणी प्याल्यांत तिने ओतलें व त्याच्या समोर करून म्हणाली "घ्या..."

त्याने पाणी लगेच पिऊन टाकलें. त्याची घाई पाहून शाम हसली. तोच संकोचून म्हणाला, "हसतेस काय ? ठेऊन दे प्याला..."

तिने प्याला ठेऊन दिला. व लगतच्या खुर्चीवर ती बसली.

तिने बोटांचा आधार हनुवटीला दिला व पाव-लांचा मंद ठेका जमिनीला दिला...रेखीवपणे !

तो मात्र बिछान्यावर ऐसपैस पसरला !... अस्ताव्यस्त ! या उशीवरून त्या उशीवर तो गडबडून गेला. दोनहि उशांवर एकटाच फिरला. त्याच्या हें लक्षांत आलें. तो एकदम म्हणाला. "शाम निजायचं ग आता..."

ती शांत बसूनच राहिली.

तोच म्हणाला—"तूं आज कां इतकी जागत आहेस ?"

"कांही बिघडलं ?"

"नाही...पण अद्याप तूं इतकी कधी जागली नाहीस तें .."

"अद्याप ?"

"हो..."

"अद्याप म्हणजे काय ?"

अनुक्रमणिका

"म्हणजे आपलं लग्न झाल्यापासून..."

"हूं ! "...तिच्या या एकच उच्चाराने त्याला तिचा रोख कळला व त्याने सावरलें—

"तसं नाही ग, पण अशी कां जागतेस ? आणि तब्यत बिघडली तर...तर ? " तो कांही तरीच बोलला. सावरला नाही. त्यांचें लग्न एका महिन्यापूर्वी झालें होतें आणि तो विलक्षण तऱ्हेने घालविलेला महिना. ती विलक्षण तऱ्हा केवळ त्याचीच होती. त्याला ही आठवण शामने फक्त एकाच 'हूं ! ' या उच्चाराने करून दिली....

ती खुर्चीवरून उठली व त्याच्या जवळ गेली. त्याच्या खांद्यावर मान टेकवून तिने विचारलें— "माझ्याजवळ येऊन तुम्ही सतार कां नाही वाजवत ? " तिची खांद्यावरची स्नेहाळ दृष्टि...तिचा नवीन प्रश्न ...नवीन...प्रथमच...आणि तो विलक्षण दचकला. अशा प्रश्नाची अपेक्षा त्याने केली नव्हती. त्याला मागच्या महिन्यांतील भपकेदार बैठक आठवली—

समोर पसंतीसाठी शाम येऊन बसली होती. त्याच्या वडिलांनी त्याला मोठी सवलत दिली— " विचार की एखादा प्रश्न... "

त्याला तेंच हवें होतें. त्याने विचारलें " गाणं येतं तुम्हाला ? "

शामने अचानक त्याच्याकडे पाहिलें होतें. व घोगऱ्या आवाजांत सांगितलें होतें, "नाही."

त्याने विचारलें, "एखादं वाद्य ? " व यावर तिची मान जडपणाने हलली....

व मग प्रश्नोत्तरें संपलीं.

घरी वडिलांनी त्याला विचारलं—" कशी आहे रे मुलगी ? " तो साधा होता. खरें बोलला, " दिसायला सुंदर आहे···" मग वडील मिशांतच हसले व त्याच्या आईकडे वळून म्हणाले, "पोर हिरकणी आहे..."...नंतर सर्व पार पडलें.

आणि लग्नानंतरचा हा पहिलाच महिना. संभ्रमांत विलक्षण रीतीने गेलेला. शाम त्याची पत्नि झाली होती. पण एक महिना नुसता करकचून गेला होता...शब्द नाही, नक्की निर्णय नाही...नुसता संभ्रम...अशी रात्र प्रथमच आली, ज्या रात्रीने त्याला गोंधळवून टाकलें...ज्या रात्रीने एक महिन्याचा जाच 'पुरे' म्हणून नाकारला...आणि कांही तरी उत्तर मागण्यास जी रात्र समोर, शांत, आणि जागती बनून राहिली...त्याला काय बोलावें, सांगावें, सुचेना...

त्या मुकेपणाला शामनेच मग हिसका दिला— " मी आणूं का तुमची सतार, इथे ? मला ऐकायची आहे...ऐकावीशी वाटते."

" नको—" तिच्याजवळून तो उठून गेला. त्वरेनें गच्चीवर आला. वद्यांतील दशमीची चंद्रकोर वर येत होती...व तो सुन्नपणें बोलला, " उगाच या खोल अंधारांत हा नाचरा प्रकाश..."

त्याच्या मागे शाम बाहेर आली...तिने तें ऐकलें, म्हणाली " असूं दे...येऊं दे..." व त्याच्या

लोकगीत

लेण्यामंदीं लेणं

भरताराचं सुख सांगतों आंगणीं
सुकीर चांदणी तारा तुटला गंगनी
भरताराचं सुख सांगतो इहिरीवर
साखरेची पुडी इसरली धडीवर

शेजीचा भरतार आंगणीचा तारा
पिताजींनं पाहला वर गुल्लेरिचा खडा
आंगण झाड्यतो सासुबाई सारजाचं
हात कन्हाई, गोंधन मायबाई गिरजाचं

एवढा वनवास सासुबाई नाही केला
भांगांतला केस नाही आडवा पडुं दिला
अवघं लेणं लेली नाही लेली चंद्रहार
कपाळींच कुकू आभायची चंद्रकोर

अवघं लेणं लेली नाही लेली अंबरसा
कपाळच्या कुकवाचा पडला उजिड चहुदेसा
लेण्यामंदीं लेणं बाई डोरली साजाचं
तसं लेणं भरताराच्या फक्कड राजाचं

संग्रा०—श्याम सोनारे

कपाळावर तिने हात ठेवला. त्याने तो लगेच घट्टसा जवळ घेतला व तिला सांगितलें, " मध्यरात्र झालीय् ...जा, झोपून रहा..."

"नाही...मध्यरात्र उलटलीय्...आता कसची झोप येते ?"

"तुला जागरण सोसायचं नाही..."

"तुम्हाला सोसतं ना ?"

"हो."

"हो काय ? तुम्हाला कसं सोसतं ?"

तिचा राग आज त्याला किंचित लागला. त्याने विचारलें, "रागावलीस ?" तिने डोळे मिटले व मान नाही म्हणून हलविली. व मग तो हळूहळू उकलूं लागला.

"मला काय विचारते,...मला जागरण करण्याची सवय आहे. अशा रात्री उभ्याने काढण्याची सवय आहे. अशी चंद्रकोर उगवलेली पाहिली की मग शांत जाण्याची सवय आहे..."

...व तो असाच बोलत राहिला. खूप खूप सांगत राहिला. बराच वेळ गेला तो कांही तरी बोलतच होता. शाम डोळे मिटून स्वस्थ होती. व अखेर थांबून त्याने विचारलें, "शाम ? आळसावलीस ?"

"नाही..."

"बोलत नाही तें..."

"ऐकतेय् ना..."

"कंटाळा झाला ?"

"अं हूं ..."

"नाही आला ?

"नाही..."

"तीन वाजलेत."

"वाजूं द्या. तुम्ही बोलत रहा...तुम्हाला असं बोलण्याची सवय आहे. मला आज ही पहिली भेट आहे. मला तुमची सवय पाहू द्या. आणि...आणि इयेच माझी पण सवय या रात्रीला कळूं द्या..."

त्याने तिला ऐकलें...मनापासून ऐकलें...ते स्तब्ध डोळे...नि हलते बारीक ओठ...त्याने तिला ऐकलें ...व त्याला आठवलें—

एक महिना झाला लग्नाला. एक महिना केवळ रुक्ष एककल्लीपणांत निसटून जाऊं शकतो ? एक महिन्यांत अशी एकहि रात्र न यावी ? कां आणि कोणी अडविलें तिला...त्याला ती रूसता आठवली व निश्चयानें तो शामला म्हणाला, "आता पुरे ...फार वेळ झाला...शांत ये..."

"नको...तुम्ही बोलत रहा..."

"रात्र खूप झाली आहे...तुला आता झोप हवी ...चल"

"नको...नको..."

"शाम शांत ये !"

व इतका वेळ शांत डोळे मिटून पडलेल्या शामने ते उघडले...व त्याच्याकडे पाहतां पाहतां त्यांत अश्रू जमून आले.

कांपऱ्या ओठांनी ती म्हणाली—"तुम्ही बोलणार देखील नाही का माझ्याशीं ?"

त्याने तिचे गाल कुरवाळले व विचारलें "काय झालं तुला ? काय दुखतं ?"

मान फिरवून तिने उसासा सोडला. ती दूर जाऊं लागली. आणि खोलींत गेली.

त्या रात्रीचें पाऊल त्याला जाणवलें मात्र व तरतरुन तो तिच्या मागे गेला. त्याने तिला छातीशीं घेतलें व तिच्या भरल्या डोळ्यांवर फुंकर घातली.

आर्त स्वराने तिने विचारलें—"एक महिना झाला तुम्ही मजजवळ येऊन. असें यांवतां का ? मी तुम्हाला आवडली—नाही—का ?"

तिने कसेंबसें विचारलें व गप्प ओठ दाबून मग तिने अश्रूंना अगदी मोकळें सोडून दिलें....

पण तो आता तिच्या जवळ होता. ते अश्रू तसे वाहणार नव्हते....

शांत हसून ते अश्रू त्याने पुसले व सांद्र कण्हला —"शाम...!"

आणि त्या पहिल्या रात्रीच्या शांत गाभाऱ्यांत पहिलाच प्रतिध्वनी उमटला, जो उमटायलाच हवा होता...

अनुक्रमणिका

चिनी लघुकथा—

‘सुखी कुटुंब’

लेखक : लु शुन
अनुवादक : प्रभाकर ऊर्ध्वरेषे

"लेखनाची स्फूर्ति ही एक आंतरिक प्रेरणा असते. अशा प्रेरणेंतून निर्माण झालेलें वाङ्मय हें सूर्याप्रमाणे असतं; लोखंड किंवा दगडापासून पाडलेल्या गारगोटीच्या ठिगणीप्रमाणे नव्हे, तर अमर्याद व अनंत शक्तीच्या तेजोगोलापासून प्रक्षेपित होणाऱ्या प्रकाशा-प्रमाणे असं वाङ्मय सतत भोवतालचं वातावरण प्रकाशमय करून टाकतं...असं साहित्य निर्माण करील तोच खरा साहित्यिक!...या व्याख्येप्रमाणे पाहिलं तर मी...माझं स्थान कोणतं बरं?..."

साहित्याविषयी असे मूलभूत स्वरूपाचे विचार त्याच्या मनांत थैमान घालीत असतांच अचानक ती शृंखला तुटली व तो ताडकन् उठून बसला. त्याला एकदम आठवण झाली की प्रपंचाची अडचण निभाव-ण्यासाठी दोनचार तरी कथा तावडतोब पुऱ्या करणं आवश्यक होतं. ‘सुखी जीवन’ मासिकाचा मोबदला त्यांतल्या त्यांत बरा असल्यामुळे त्याच मासिकाकडे कथा पाठविण्याचा विचारहि त्याने पक्का करून टाकला होता.

काय लिहावं बरं? तो विचार करूं लागला. कथा म्हटली म्हणजे तिला योग्य पार्श्वभूमि, वातावरण पाहिजेच! कोणत्या वातावरणांत ही कथा घडवावी बरं? पण त्यासाठी आजच्या तरुण पिढीचे मुख्य प्रश्न, त्यांच्या जीवनांतील मुख्य समस्या पाहायला पाहिजेत, नाही?...काय बरं?...प्रेम, विवाह, संसार यांचे दोनचार नव्हे असंख्य प्रश्न नि समस्या असणार ...असणार काय, आहेतच! अनेक लोक प्रत्यहीं त्याची चर्चा करताहेच की! मग असंच करावं! कुटुंबाचा प्रश्नच घ्यावा! पण कुटुंबाविषयी लिहायचं तरी काय?...अन् तें नीट साधलं पाहिजे. नाही तर ‘साभार परत’ यायची की कथा!... नको पण, तो अशुभ विचार मनांत आणाच कशाला?

अन् मग तो पांघरुणाची ऊब सोडून निर्धाराने उठला व तडक टेबलापाशीं जाऊन त्याने खुर्चीवर आसन ठोकलं. खास लेखनासाठी आणून ठेवलेलं हिरव्या रेघांचं पॅड ओढून पहिल्या पानावर अगदी वरच्या कोपऱ्यावर कथेचं शीर्षक लिहून टाकलं. ‘सुखी कुटुंब.’

चला, शीर्षक तर झकास जमलं! पण पुढे काय? या सुखी कुटुंबाचा तपशील काय असावा? वातावरण कसं असावं? तो डोकं वर करून दोन्ही डोळे आढ्याकडे लावून विचार करूं लागला.

कुठलं गाव घ्यावं बरं? पेकिंग? छे छे! त्या शहरांत आता कांहीच राम उरला नाही. तिथल्या जीवनांत, वातावरणांत, जिवंतपणा कसा तो नाहीच! तिथे राहणाऱ्या या ‘सुखी कुटुंबा’भोवतीं उंच तट-बंदीचं कुंपण घातलं तरीसुद्धा बाहेरची हवा आंत शिरणारच! तेव्हा पेकिंग नकोच! मग किआंग्सु किंवा चेकिआंग घेतलं तर? पण तिथे तर लढाईची धुमश्चक्री केव्हा सुरू होईल याचा नेम नाही! फुकिएनबद्दल तर प्रश्नच नाही. झेचुआन, क्वांटुंग... छे! तिथे तर आजच तोफाबंदुकांचं धुडुमधाम् सुरू आहे!* बरं शांटुंग किंवा होनान निवडलं तर? पण

---

* लु शुनने ही कथा १९२४ सालीं लिहिली. त्या वेळीं चीनमध्ये अनेक सुभेदार व सरदार आपा-पल्या भागांत वरचढ होऊन एकमेकांवर हल्ले चढवीत होते. कुओमिंतांगचें मध्यवर्ति सरकार त्यांचा बीमोड करण्याइतकें प्रबळ झालेलें नव्हतें.

अनुक्रमणिका

नकोच, तिथे त्या सुखी जोडप्यांतल्या एकाला कुणी पळवून नेलं तर सुखी कुटुंब दुःखी होऊन सगळंच मुसळ केरांत जायचं!... बरं शांघाय नाही तर तिएन्त्सिन सारखं मोठं शहर घ्यावं कां?... बाप रे! तिथल्या युरोपियन वस्तींतलं घरभाडंच सगळी मिळकत खाऊन बसेल की! मग कसलं सुखी कुटुंब न् कसलं काय?...मग चीनच्या बाहेर, परदेशांतलंच कुठलं तरी शहर घेऊं या का? वा! असं कुठे झालंय! कथा चिनी कुटुंबाची, अन् गाव परदेशांतलं! मग युनान नाही तर क्वीचौ घेतलं तर? तीं गावं कशीं आहेत मला माहीत नाही, अन् तिथे जायचे रस्तेहि फारच वाईट आहेत...

बिचाऱ्या लेखकाने मेंदूला खूपच शीण दिला, पण आदर्श सुखी कुटुंबाला साजेसं आदर्श गाव कांही सापडेना! अखेर त्याने विचार केला, सध्या आपलं 'ए' गाव असंच धरून चालूं या! पण लगेच त्याला शंका आली, हल्ली लोक फारच चोखंदळ झाले आहेत. कथेंतलीं नांवगावं पाश्चिमात्य घेतलीं तर वाचकांना तें खपत नाही म्हणे! तेव्हा या नव्या कथेंत तरी अस्सल चिनी वातावरणच ठेवलं पाहिजे! मग कोणतं गाव घ्यावं? हुनान घेतलं तर तिथे लढाई चालू आहे अन् दैरेन घेतलं तर तिथे पुनः घराचीं भाडीं भरमसाट! चाहार, किरिन, हीलुंगकिआंग, इथे लुटारूंचा न् वाटमाऱ्यांचा फार सुळसुळाट आहे म्हणतात.

चीनमधल्या सगळ्या गावांचीं नांवें त्याने आठवून पाहिलीं, पण सुखी कुटुंबाला एकहि योग्य दिसेना. शेवटीं त्याने 'ए' हेंच गावाचं नांव निश्चित केलं.

त्याने स्वतःला समजावलं, "तें कांही नाही. या सुखी कुटुंबाला राहायला 'ए' गावच ठीक आहे. दुसरं असूंच शकत नाही! बरं चला पुढे! या सुखी कुटुंबांत माणसं कोण कोण घ्यावींत बरं! आधी नवराबायको तर हवेच! त्यांचा प्रेमविवाह झालेला असणार हेंहि ओघानंच आलं. त्यांच्या लग्नाच्या करारांत चांगलीं चाळीसच्या वर कलमं घालून त्यांनी परस्परांना संपूर्ण स्वातंत्र्य व समान हक्क दिल्याचंहि ठरवावं. तर्स तें असणारच! कारण दोघंहि आधुनिक, दोघंहि उच्चशिक्षाविभूषित, दोघंहि सुसंस्कृत...दोघंहि जपानमध्ये शिकून आलेले घ्यावे का? पण नकोच. जपानला शिकायला जाण्याची फॅशन आता मागे पडली आहे. तेव्हा ते पाश्चिमात्य देशांत शिकून आल्याचंच ठरवावं. त्या दोघांपैकी तो म्हणजे पति नेहमी अपटुडेट सूट घातलेला, पांढरी शुभ्र कडक इस्त्रीची कॉलर, असा दाखवावा. अन् ती—म्हणजे त्याची पत्नी—तिची केशभूषा आधुनिक पद्धतीची, सगळे केस पुढे वळवून चिमणीच्या घरट्यासारखे गुंफलेले, मोत्यासारखे शुभ्र चमकणारे दात, पण तिचा पोषाख मात्र चिनीच..."

एकदम त्याच्या समाधीचा भंग झाला. बाहेर कुणी तरी मोठ्याने म्हणालं, "नाही नाही! पंचवीस कॅटीच* आहे तें!"

तो पुरुषी आवाज होता. तो आवाज ऐकून त्याने स्वतःला नकळतच खिडकींतून बाहेर पाहिलं. खिडकीला लावलेल्या पडद्यांतून येणारे सूर्याचे किरण त्याचे डोळे दिपवूं लागले व त्याचबरोबर लाकडाच्या मोळ्या आपटल्याचा आवाज कानांत शिरला.

"पंचवीस कॅटी होय? पण कशाच्या?".. बरं तें असो. आपल्या या सुखी जोडप्यांतले दोघेहि सुसंस्कृत, कलेचे भोक्ते, रसिक कलावंत आहेत. पण सुखांत वाढल्यामुळे त्यांना रशियन कादंबऱ्या आवडत नाहीत. कारण बहुतेक रशियन कादंबऱ्यांत खालच्या वर्गाचं दुःखी जीवनच रंगवलेलं असतं. तेव्हा या सुखी कुटुंबाला त्या आवडूं नयेत हें स्वाभाविकच असणार...'पंचवीस कॅटी'! कशाच्या बरं? अं! जाऊं द्या!... पण रशियन कादंबऱ्या आवडत नाहीत तर हीं दोघं वाचतात तरी कोणतीं पुस्तकं? बायरनच्या कविता? कीट्स? नाही नाही, त्यांच्या काव्यांत सुद्धा बंडखोरीचे विचार आहेत, तेव्हा ते नकोच! मग काय बरं? अरेच्या! सापडलं! त्या दोघांनाहि ऑस्कार वाईल्डचं 'अॅन आयडिअल हजबंड' हें पुस्तक फार आवडत असलं पाहिजे. मी स्वतः तें वाचलेलं नाही, पण सगळे बडे बडे प्राध्यापक त्या पुस्तकाची एवढी स्तुति करतात, तेव्हा या सुसंस्कृत

---

* कॅटी—चिनी माप

पतिपत्नीला तें आवडणारच. दोघांच्याहि दोन स्वतंत्र प्रती सुद्धा हव्यातच—"

स्वतःच्या पोटांत भुकेने कल्लोळ माजवल्याची त्याला एकदम जाणीव झाली. त्याने लेखणी खाली ठेवली व अक्षावर पृथ्वीचा गोळा ठेवलेला असावा त्याप्रमाणे दोन्ही हातांमध्ये मस्तक दाबून धरलं.

त्याने मेंदूला पुनः चालना दिली "...त्या दोघांचीहि जेवणाची वेळ झाली आहे. ते 'लंच'साठी टेबलाभोवती बसले आहेत. टेबलावर शुभ्र चादरीचें आच्छादन आहे अन् आचारी डिशेस आणून मांडीत आहे. भोजन कोणत्या पद्धतीचं बरं? हो, चिनी पद्धतीचंच...'पंचवीस कॅंटी'! पण कशाच्या? हं! सोडा नांव!...पण चिनी पद्धतीचं भोजन कां? बरोबरच आहे, पाश्चिमात्य लोकसुद्धा म्हणतात की चिनी आहार फार चांगला! म्हणून ते चिनी आहारच घेतात. हं, हा पहिला पदार्थ! पण पहिला पदार्थ काय असावा?.."

"हें सर्पण..."

या आवाजाने तो दचकला व त्याने मागे वळून पाहिलें. तो काय? त्याच्या बाजूला त्याच्या कथेतली सुखी नायिका नव्हे तर त्याचीच पत्नी उभी होती. व तिची केविलवाणी, म्लान नजर त्याच्या चेहऱ्यावर खिळलेली होती.

'काय काम आहे?' त्याने जरा चिडूनच विचारलं. त्याच्या कामांत व्यत्यय आणल्यामुळे त्याला राग आला होता.

"नाही, घरांतलं सर्पण सगळं संपलं म्हणून मी आणखी मोळ्या घेतल्याहेत. गेल्या खेपेला दहा कॅंटीला दोनशे चाळीस नाण्यांना दिलंन् त्यानं, पण आज तो दोनशे साठ म्हणतोय! पण मी दोनशें पन्नासला ठरवलं तर?"

"बरं, बरं! दोनशें पन्नासला ठरव जा!"

"पण त्याच्या तोलण्यांतहि मला गडबड वाटतेय. तो म्हणतो तें सगळं मिळून साडेचोवीस कॅंटी आहे. पण समजा, मी साडेतेवीसचेच पैसे दिले तर?

"बरं, ठीक! साडेतेवीस कॅंटीचं धर जा!

"मग पांचा पांचे पंचवीस न् तिना पांचे पंधरा"

"हो, बरोबर! पांचा पांचे पंचवीस न् तिना पांचे पंधरा—बरोबर! जा!"

तो मनांतल्या मनांत पाढे मोजून हिशेब करूं लागला. पण पुरा हिशेब जमेना म्हणून त्याने लेखणी उचलून 'सुखी कुटुंब' शीर्षक लिहिलेल्या कागदावरच आकडे मांडायला सुरुवात केली. थोडा वेळ हिशेब केल्यावर पत्नीकडे पाहून त्याने सांगितलं,

"हं जमला हिशेब! पांचशें ऐंशी—"

"इतके का? मग माझ्याजवळचे पैसे कमी पडताहेत. ऐंशीनव्वद नाणीं आणखी हवींत मला—"

त्याने टेबलाचा खण उघडला. आंत होती ती सगळी रकम काढून तिने पुढे केलेल्या हातावर ठेवली. चांगलीं दोनतीनशें नाणीं होतीं तीं, पण त्याने मोजण्याचे कष्ट घेतलेच नाहीत. पत्नी बाहेर गेली. तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहून त्याने पुनः टेबलाकडे नजर वळवली. त्याच्या डोक्यांत सर्पणाची लाकडंच गर्दी करीत होतीं, न् मेंदू हिशेबांत अडकला होता. पांचा पांचे पंचवीस न्—

त्याने एक सुस्कारा टाकला. जणूं काय त्या सुस्काऱ्याबरोबरच सर्पण नि हिशेबाचे आकडेहि तो डोक्यांतून बाहेर काढून टाकीत होता!

क्षणभराने ते विचार डोक्यांतून निघून जाऊन त्याला हलकं वाटूं लागलं अन् तो पुनः कथेचे धागे जुळवूं लागला.

"मग भोजनांतला पहिला पदार्थ कोणता बरं असेल? उं! कांही का असेना! नेहमीपेक्षा कांही निराळा असला म्हणजे झालं! तळलेलं मांस न् खेकडा घ्यावा की मासे? नको, पण हा तर अगदी सामान्य माणसांचा आहार झाला! हां, त्यापेक्षा 'सर्प–व्याघ्रभक्ष्या'ची प्लेटच ते खाताहेत असं दाखवलं तर! पण या प्लेटमध्ये खरोखरी असतं तरी काय? कांही लोक म्हणतात, त्यांत साप अन् मांजरीचं मांस असतं अन् कॅंटनमधले श्रीमंत लोक मेजवानीच्या वेळचं पक्वान्न म्हणून तें आवडीनं खातात. पण मी तर किआंग्सु शहरच्या एका हॉटेलांतल्या ताज्या पदार्थांच्या यादींत तें नांव वाचलं आहे, अन् किआंग्सुचे लोक कांही साप न् मांजराचं मांस खाणं शक्य नाही, तेव्हा

त्या पदार्थाचं नांव कांही असलं तरी तो बेंडूक अन् ईल माशाचाच बनलेला असला पाहिजे. आता आपल्या कथेंतलं हें आधुनिक जोडपं चीनच्या कुठल्या भागांतलं आहे असं मानावं ? पण त्याचं विशेष कांही नाही. कुठल्याहि भागांतलं असलं तरी त्यांनी हा पदार्थ खाल्ला म्हणून कुठं बिघडलं ? तेवढयानं कांही तें सुखी कुटुंब नाही असं ठरत नाही ! तेव्हा पहिली डिश ! हें तर ठरलंच. म्हणजे आचाऱ्याने या 'सर्प-व्याघ्रभक्ष्या'च्या प्लेट्स आणून ठेवल्या की पतिपत्नी दोघंहि आपापल्या चॉपस्टिक्स उचलतात. एकमेकांकडे पाहून मधुर स्मित करतात अन् कुठल्या तरी युरोपीय —समजा फ्रेंच—भाषेंत म्हणतात.

"काय, माझ्या लाडक्या ! सुंदर पदार्थ आहे, नाही ?"

"तर प्रिये ! करूं या सुरवात !"

"असं म्हणून तीं दोघे अगदी बरोबर चॉपस्टिक्स उचलतात व एकदमच सर्प—छे छे ! सर्पाचं मांस म्हणजे कसंसंच वाटतं नाही ? तेव्हा ईल माशाचाच म्हणावं !—तर काय, दोघेहि ईल माशाच्या मांसाचा पहिला घास घेतात ! म्हणजे तें 'सर्पव्याघ्र-भक्ष्य' नांवालाच साप न् वाघाच्या मांसाचं असतं, त्यांत वस्तुतः बेंडुक न् ईल माशाच असतो हें तर आता अगदी नक्की झालं. हं,. तर मग ते दोघे बरोबरच एकएक घास, तोहि अगदी सारख्या आकाराचा उचलतात अन् बरोबरच तोंडांत घालतात. पांचा पांचे पंचवीस —अरेच्या ! मध्येच ही हिशेबाची भानगड कशाला ? बरं जाऊं दे ! तर काय की ती दोघं तो घास—"

त्याचं चित्त कथेवर एकाग्र होणं अशक्य झालं. त्याच्या मागे अशा कांही हालचाली अन् आवाज चालू होते की त्याचं चित्त विचलित न होणंच अशक्य होतं. तरी त्याने निग्रहाने मागे वळून पाहाण्याचं टाळलं अन् तो आपल्या कथेची गुंफण करण्यांत व्यग्र होण्याचा यत्न करूं लागला.

"कुठवर आलों होतों वरं मी ? हं, ते दोघं एकदमच घास-छे छे ! हें फारच कृत्रिम झालं ! प्रत्यक्ष व्यवहारांत कुणीहि पतिपत्नी असं वागणार नाहीत. मग कसं दाखवावं वरं—छे छे ! हा सुंदर विषय असाच फुकट जाणारसं दिसतंय—मग असं केलं तर ? हे पतिपत्नी परदेशांतून शिकून आलेले न दाखवतां चीनमध्येच उच्च शिक्षण घेतलेले दाखवलं तर ! त्याला काय हरकत आहे ? चांगले पदवीधर, सुसंस्कृत दाखवलं म्हणजे झालं !...त्यांतला पति हा लेखक दाखवावा. अन् पत्नीसुद्धा—पण नको, ती फक्त साहित्याची आवड असलेली रसिक स्त्री दाखवावी—किंवा असं केलं तर ? पत्नीला बनवावं कवयित्री, अन् पति दाखवावा काव्याची आवड असलेला रसिक, न् शिवाय स्त्रीजातीविषयी आदर बाळगणारा, समान हक्कांचा पुरस्कर्ता, किंवा—"

पण आता त्याला आणखी निग्रह करणं अशक्य होतं. त्याच्या भोवतालच्या हालचालीचं प्रमाण इतकं वाढलं होतं की त्याला मागे वळून पाहाणं प्राप्त होतं.

आणि पहातों तो काय ? शेजारच्या पुस्तकाच्या कपाटाच्याच बाजूला एक कोबीचा ढीग रचला गेला होता. तोहि कसा विलक्षण ! खाली तीन, त्यावर दोन, अन् अगदी वर एक ! थेट इंग्रजी ए (A) च्या आकाराचा ढीग बनला होता तो !

त्याची नजर त्या 'ए' अक्षराच्या आकारावर स्थिर झाली. त्याच्या सर्वांगांतून झिणझिण्या निघूं लागल्या. कानशिलं एकदम गरम झाल्यासारखीं वाटूं लागलं. "ओह् !" असा उद्गार काढून त्याने एक सुस्कारा टाकला. पाठीच्या कण्यांत कांही तरी खुपल्यासारखं वाटूं लागलं होतं. त्या खुपण्यापासून मुक्तता मिळविण्यासाठी त्याने एक दीर्घ श्वास घेतला व तो पुनः कथारचनेकडे वळला.

"या सुखी कुटुंबाचं घर कसं असेल वरं ? अर्थात् त्यांत भरपूर खोल्या असणारच. तिथे कोबी अन् असले जिन्नस ठेवण्यासाठी एक कोठाराची निराळी खोली असायलाच हवी. पतीची खोली अर्थात्च स्वतंत्र, कोठाराच्या खोलीपासून दूर असणार. त्या खोलींत पुस्तकांनी भरलेलीं कपाटं असणार, अन् तिथे कोबीचे गड्डे ठेवले जाणं शक्य नाही. त्या पुस्तकांच्या कपाटांत चिनी भाषेंतील पुस्तकांबरोबरच इतर भाषांतलीं पुस्तकंहि असणार. त्यांत 'आयडिअल-हजबंड' अर्थात् असणारच. अन् एक नाही तर चांगल्या

दोन प्रती! दोघांना दोन निराळ्या प्रती हव्याच! नंतर झोपण्याची खोली अर्थातच निराळी. तिथे सुरेखशी तांब्याचा पलंग--किंवा एक नंबरच्या जेलच्या कैद्यांनी बनविलेला लाकडी पलंगहि साधाच पण फार सुंदर असतो म्हणतात, तोहि असला तरी चालेल. मात्र तिथे स्वच्छता कमालीची असली पाहिजे--"

या विचारासरशीं त्याने अभावितपणे त्याच खोलींत असलेल्या स्वतःच्या खाटेकडे पाहिलें. त्या खाटेखाली ठेवलेलं सर्पण संपून फक्त कचरा शिल्लक होता अन् त्यांतच सणाच्या दोरीचा एक तुकडा पडला होता. तो थेट एखाद्या मरून पडलेल्या सापाच्या वेटोळ्यासारखा दिसत होता.

"साडेतेवीस कॅटो--" सर्पणाच्या मोळ्या एकामागून एक खाटेखाली येऊन पडत होत्या, असा भास होऊन त्याचं डोकं भणभणूं लागलं. तो उठला अन् त्याने दार बंद करण्याचं ठरवलं. पण दाराला हात लावतांच त्याला वाटलं, हें बरं नव्हे! दार लावून घेण्याऐवजी त्याने वर गुंडाळून ठेवलेला पडदा खाली सोडला, त्याची धूळ त्याच्या सर्वांगावर उडाली. पण त्याने विचार केला, अगदीच दार पक्कं बंद करून घेऊन स्वतःला आंत कोंडून घेण्यापेक्षा हें बरं! दार सताड उघडं ठेवल्यासारखंहि होत नाही अन् एकांतहि मिळेल. हे कन्फ्युशिअसच्या 'सुवर्णमध्या'च्या तत्त्वाला अनुसरूनच होतं की! असा विचार करून तो कथानकाचा धागा पुन: जुळवूं लागला.

"तर काय, की पतीच्या अभ्यासिकेचं दार नेहमी बंद असतं. कुणालाहि आंत जायचं असेल तर प्रथम टकटक करून त्याची परवानगी विचारली पाहिजे. हो, सगळं कसं अगदी पद्धतशीर असायला हवं! आता समजा, तो आंत बसला आहे अन् त्याच्या पत्नीलाच साहित्याबद्दल बोलायला आंत जायचं आहे, तर तिने सुद्धा एकदम आंत न शिरतां दारावर टकटक् केलंच पाहिजे--अन् एक गोष्ट मात्र निश्चित, की तिने त्या खोलींत जातांना कोळशाचं लोढणं बरोबर नेतां कामा नये--तिने अगदी यथावत् पद्धतीने-तेंहि फ्रेंच भाषेंत-विचारलं पाहिजे, 'मी आंत येऊं शकतें ना?' पण अशा वेळीं पतीला काव्यशास्त्रविनोदाच्या चर्चेला वेळ नसला तर? पण ती दारावर टकटक् करीत असतांना तिच्याकडे दुर्लक्ष करून कसं चालेल? मग काय बरं करील तो? हो, पण अशा वेळीं कसं वागावं हें बहुधा 'आयडिअल हजबंड' मध्ये दिलेलं असेल. ती खरोखरच उत्कृष्ट कादंबरी असली पाहिजे यांत संशय नाही. मला या कथेचा जो मोबदला मिळेल त्यांतून या पुस्तकाची एक प्रत विकत घ्यायचीच--ठरलं!"

धप्!

त्या आवाजाने तो दचकला. तो आवाज त्याच्या चांगल्या ओळखीचा होता. त्याची पत्नी तीन वर्षांच्या मुलीला धपाटे देत असली पाहिजे हें उघड होतं.

जणूं काय तो रपाटा आपल्याच पाठीवर बसत आहे अशा कल्पनेनं पाठीवर हात दाबून धरीत तो विचार करूं लागला, 'सुखी कुटुंबांत मुलं झालीं तरी तीं लग्नानंतर लगेच व्हायला नकोत--"

मुलीच्या रडण्याचे सुर त्याच्या कानांत घुमत होते.

"किंवा मुलं अजिबातच नसलीं तर! अन् घराची सुद्धा भानगड नकोच. आपलं मर्जेत एखाद्या हॉटेलांत राहावं अन् महिन्याला ठराविक पैसे देऊन मोकळं व्हावं! वस्, राजाराणीचा संसार! मुलांचं लचांड नको अन् घर आवरण्याचीहि कटकट नको!"

बाहेर मुलीच्या रडण्याचा आवाज मोठा होत होता. तो उठला व पडदा सारून बाहेर जाऊं लागला. जातां जातां तो विचार करूं लागला, "कार्ल मार्क्सने त्याचा 'कॅपिटल' ग्रंथ लिहिला तो आसपास मुला-बाळांची गडबड चालू असतांनाच लिहिला असं म्हणतात. मार्क्स खरोखरच फार महान् व थोर पुरुष असला पाहिजे--"

तो बाहेर आला, तसा घासलेट तेलाचा वास त्याच्या नाकांत शिरला. त्याची तीन वर्षांची कन्या दाराच्या बाजूलाच पालथी पडली होती. बापाला पाहा-तांच ती अधिकच मोठ्याने गळा काढून रडूं लागली.

"उगी उगी, बाळ! रडूं नकों! शहाणी माझी बाळ ती!" तिला समजावण्याचा यत्न करीत त्याने तिला उचलून घेतलं. त्याने बाजूला पाहिलं तर त्याची पत्नी दाराच्या पलिकडेच कमरेवर हात ठेवून रागा-रागाने त्याच्याकडे पहात होती.

.ता तुम्ही येऊन ओरडा माझ्यावर ! काभोत त्या प.. तर राहिलीच बाजूला पण वर त्रास वाढवून ..वा मात्र ! अन् आजच या मेल्या दिव्यांतलं तेलहि सांडलं ! आता रात्रीं दिवा कसा लागणार--"

"नको बेटा ! रडूं नको ! पुरे आता !" पत्नीच्या सरबत्तीकडे दुर्लक्ष करीत तो कन्येला आंत घेऊन जाऊन तिला गप्प करण्याचा प्रयत्न करूं लागला. एक खुर्ची ओढून तिच्यावर बसत त्याने कन्येला मांडीवर बसवलं व तो तिला पुनः समजावूं लागला, "अग तूं शहाणी ना ? मग रडतेस कशाला ? थांब आता आपण अडगुलं मडगुलं करूं या !"

तो हात पुढे करून ते स्वतःच्या चेहऱ्याभोवतीं ओवाळून घेऊं लागला.

"आहा ! बाबा !" कन्येचं रडं थांबून ती हसूं लागली.

तो तिला खेळवूं लागला व ती एकीकडे हसत असतां अजून तिच्या डोळ्यांत चमकणाऱ्या अश्रूंकडे पाहूं लागला. तिच्याकडे पहातां पहातां त्याच्या मनांत विचार आला, "किती गोड चेहरा आहे नाही हिचा ? अगदी थेट हिच्यां आईसारखा ! पांच वर्षांपूर्वी ती अगदी अश्शीच मोहक दिसायची ! लालचुटुक ओठ सुद्धा असेच ! फक्त हिचे लहान आहेत एवढाच फरक!"

त्याचं मन क्षणभर भूतकाळांत शिरलं. तोहि असाच एक हिवाळ्यांतला दिवस होता. किती प्रसन्न ! कुठल्याहि अडचणींना न जुमानतां आपण तिच्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याचा निर्धार तिच्याजवळ व्यक्त केला, तेव्हा ती अगदी अशी या कन्येसारखीच हसत त्याच्याकडे पाहात राहिली होती, अन् तिच्या नेत्रांत असेच अश्रूंचे मोक्तिकबिंदु चमकत होते.

त्या आठवणीने त्याला धुंद झाल्यासारखें वाटलें व तो स्वतःशींच उद्गारला, "किती गोड दिसतात हे ओठ, नाही !"

तेवढ्यांत दाराचा पडदा बाजूच्या खिळ्याला अडकला व सर्पणाच्या मोळ्या आंत टाकल्याचा धाड् धाड् आवाज झाला.

तो एकदम भानावर आला. त्याने समोर पाहिलं तों त्याच्या कन्येच्या नेत्रांत, अजूनहि अश्रु चमकत होते व तिच्या लालचुटुक ओठांच्या पाकळ्या विलग झालेल्या दिसत होत्या.

"हूं, ओठ--" असे उद्गार काढीत तो बाजूला आंत पटकल्या जाणाऱ्या सर्पणाकडे पाहूं लागला.

"आता तेंच ! पांचा पांचे पंचवीस, नवे नवें एक्यांशी, तोच हिशेब—अन् दोन खिन्न नजरेने पाहाणारे नेत्र—" त्याने समोरच्या टेबलावरून हिरव्या रेघा आखलेला कागद उचलला, त्यावर लिहिलेल्या कथेच्या शीर्षकाकडे अन् खाली केलेल्या आंकडेमोडीकडे नजर टाकली व मग तो कागद चुरगळून त्याचा बोळा करून टाकला. पण लगेच कन्येकडे नजर जातांच त्याने तो बोळा उलगडला व त्या कागदाने तिचे डोळे व नाक पुसलें. तिला खाली ठेवीत तो म्हणाला, "जा ! शहाणी ना तूं ? मग आता जा अन् खेळ पाहूं !" तिला खाली उतरवीत असतांनाच त्याने हातांतल्या कागदाचा पुनः बोळा करून तो रद्दीच्या टोपलींत भिरकावला.

पण मग त्याचं त्यालाच कन्येला असं रवाना केल्याबद्दल वाईट वाटलं व एकेक पाय टाकीत कष्टाने दूर जाणाऱ्या तिच्या आकृतीकडे तो पाहूं लागला.

त्याच्या कानांत सर्पणाच्या मोळ्यांचा धाड्धाड् आवाज शिरत होता, तिकडे दुर्लक्ष करून तो पुनः कथासूत्रावर चित्त एकाग्र करण्याचा प्रयत्न करूं लागला. त्याने डोळे झाकून घेतले व त्या खोलींतून मन काढून घेऊन तें त्याच्या कथेंतल्या सुखी जोडप्याच्या सुखी संसारांत रमविण्याचा तो प्रयत्न करूं लागला.

त्याच्या डोळ्यांपुढे एक फुलांचा ताटवा नाचूं लागला. गोल, चपटी, काळ्या ठिपक्यांची व मधे शेंदरी देठं असलेली फुलं डाव्या डोळ्याच्या डाव्या कोपरापासून उजव्या डोळ्याकडे तरंगूं लागलीं. त्या पाठोपाठच हिरव्या गार रंगाचीं फुलं समोर आलीं, त्यांचीं देठं गडद हिरव्या रंगाचीं होतीं. आणि त्या फुलांच्या पाठोपाठच कोबीचे गड्डे दिसूं लागले. एकामागून एक सहा कोबीचे गड्डे भराभर एकावर एक रचले गेले. खाली तीन, मधे दोन अन् वर एक-त्या आकृतीचा आकार थेट इंग्रजी 'ए' अक्षरासारखा होता व त्याच्या बंद डोळ्यांसमोर नाचणारी ती आकृतीसारखी मोठी होत होत अजस्र आकार धारण करीत होती !

' आला क्षण गेला क्षण. ...! '

— प्रा. भ. प्र. मोहरीर.

मी केशवसुतांची ' घड्याळ ' ही कविता शिकवीत होतो. ' परोपदेशे पांडित्या' सारखी स्वस्त वस्तु दुसरी कोणतीहि नसेल आणि त्यांतहि जीवनानुभवाविषयीं तुम्ही बोलूं लागला म्हणजे कर्तेपणाची अधिकारवाणीहि तुमच्या भाषेंतून स्फुरूं लागते. काळाचें अनंत परिणाम आणि त्यांत गवसलेला एक चोरटा क्षण ! तो सुवर्ण क्षण अचानक गवसला की युगायुगाची दीर्घ तपश्चर्या फळाला येते आणि गमावला कीं ललाटीचें नष्टचर्यं कृतांताप्रमाणे आ वासून उभें राहतें. केवळ एकच क्षण ! अमृतसिद्धीचा योग किंवा अशनिपानाचा भयंकर भोग ! मानवाच्या पराक्रमाला शह देण्याकरितां काळाने क्षणाचा व्यूह रचलेला आहे.आणि काळाच्या या अज्ञातवासांतून घड्याळानेच माणसाची थोडीबहुत सुटका केलेली आहे.

' घड्याळ ' या कवितेंतून केशवसुतांनी आपल्याला काळाचें तत्वज्ञान शिकविलें आहे. गाडी स्टेशन सोडून गेल्यानंतर, तेथे पोचलेला प्रवासी, हात चोळीत स्वस्थ बसतो. परीक्षेच्या निकाल पत्रकांत आपलें नांव न दिसल्यामुळे हवालदील झालेला बापुडा विद्यार्थी पुढील वर्षाच्या परीक्षेकडे दृष्टिक्षेप करतो. एकपक्षीय निकाल लागल्यामुळे कोर्टांत अनुपस्थित राहिलेला कज्जेदार वेगळा तोडगा निघेल काय म्हणून आपल्या वकिलाकडे धाव घेतो. हे सर्व क्षणकालाचे बळी आहेत, या चुकलेल्या कोकरांना मार्गदर्शन करतां यावें म्हणून कवींनी काव्याचीं भारुडें प्रसविलीं आहेत व विचारवंतांनी नव्या तत्त्वज्ञानाच्या मलमपट्या या दुखणाइतांकरितां तयार केलेल्या आहेत. काळासारखें दुसरें औषध नाही आणि या औषधासारखी दुसरी कालमात्रा नाही. टेकडीवरून झपाट्याने खाली उतरणाऱ्या माणसापेक्षांहि काल अधिक जलद गतीने धांवत असतो हें सांगणाऱ्या उपदेशकाला काळाचा विसर पडलेला नसतो. क्षणाने व कणाने विद्या न् अर्थ यांचें संपादन करू लागलो तर पंडित आणि कुबेर व्हायला वेळ लागू नये. पण हें समीकरण इतकें साधें कां आहे ? व्यवहाराला पूर्ण अर्थाने लागू पडणार नाही तोच ठोकताळा. मला वाटतें सुभाषितें व सूक्ती हीं प्रचंड अर्धसत्येंच होत.

माझ्या माहितीच्या कांही व्यक्ती आहेत. जळत्या मशालीसारख्या त्यांच्या जीवितांत सुव्यवस्था नाही पद्धतशीरपणा नाही. त्यांचें जीवन व आचरण शिस्तशीर नाही तरी ते हवेहवेसे वाटतात. त्यांचीं मनें मंद फुलवातीसारखीं नसतात तर धगधगणाऱ्या

धुनीसारखीं असतात, त्यांचे डोळे रात्रीच्या जाग्रणामुळे तारवटलेले दिसतील, चेहऱ्यावर मंद निस्तेजपणा दिसेल, कपडे थोडेफार मळखोर व सुरकुतलेले दिसू लागतील पण त्यांच्या चालण्याबोलण्यांतील अखंड जीवनाभिलाषा व जीवनविकास नेत्रदीपक असतो. काळाचा विचार कसल्याहि फूटपट्टीने न करतां त्यांवर मात करणारें त्यांचें उद्दीपक व्यक्तिमत्व पाहून सारीं तत्वज्ञानें निर्जीव व दुबळीं वाटू लागतात, या व्यक्तींच्या जीवितांत कसलाहि हिशेबीपणा नाही. आढळलीच तर व्यवहार मूल्यांची एकसारखी धरसोड. याला काय नांव द्यावें ? आदर्शाचे कोणते संकेत यांनी गिरविले आहेत ? मोठेपणाची कोणती मळलेली चाकोरी यांनी चोखाळली आहे ? केवढी ही भयंकर आदर्शच्युति आणि तरीहि यांचें व्यतिमत्त्व केवढें महान् आहे ?

आपल्या पुस्तकांतून जीवितांचें घाऊक तत्त्वज्ञान वोकाळलेलें आहे. मूल्यें आणि नीतिमूल्यें यांची सांगड घातली गेलेली आहे. जीवनाच्या प्रत्येकक्षेत्रांत नीतिमूल्यांचा प्रवेश झालेला आहे. सौजन्य, सदभिरूचि व सदाचार यांचा पाठपुरावा केलेला आढळतो, पण कोणतेंहि तत्त्वज्ञान सवंग झालें म्हणजे तें उथळ व शालेय होतें. या रीतीने 'घेई झोपा तो नर मेला.' ही आपली समजूत प्रत्यक्ष कृतीने सुद्धां दूर होणें असंभव आहे. कालगतीच्या भ्रामक समजुतीमुळे आपण काळाची आणि क्षणाची सारखी वास्तपुस्त करीत असतो. आणि ती करण्यांतच आपला अमोल काळ आणि वेळ जातो. कांही उथळ तत्त्वज्ञानाचा आणि उथळ विचारसरणीचा आपल्या मनावर होणारा परिणाम वज्रलेप असतो. तो दूर करण्याकरितां नव्या तत्त्वज्ञानाची व विचारसरणीची पदोपदीं गरज भासू लागते. एक तत्त्वज्ञान दृढमूल झाल्यानंतर त्याला विरोधी तत्त्वज्ञान रचावें लागतें याचें कारणहि एकच आहे. तें म्हणजे आजचा समाज व आजचा मानव हा क्षणपूजक बनत आहे. क्षणाक्षणाला त्याची क्षणपूजा वाढत आहे. व तिचें एक कोरें करकरीत तत्त्वज्ञान निर्माण करून तो तें उरापोटाशीं बाळगत आहे.

आपण शाश्वत मूल्यांचा विचार न करतां क्षणमूल्यांचा विचार करू लागलो आहोत हा आपल्या संस्कृतीचा महान दोष आहे. चांगल्या वाईटाची व्याख्या बदलू पाहत आहे. ज्याने त्याने क्षणाची उपासना चालविली आहे. त्यामुळे मनुष्य हा क्षणाचा गुलाम होऊं पहात आहे. घड्याळाच्या कांट्यांकडे त्याचें सदोदित लक्ष आहे. प्लॅटफॉर्मवर, ऑफिसांत, कॉलेजांत, क्रीडांगणावर, सभास्थानावर, प्रवाशाचीं, वरिष्ठ कनिष्ठाची, कारकुनाची, शिक्षक-अध्यापकाची क्षण-जागृति आढळांत येते. एवढेंच नव्हें तर डॉक्टराची रोग्याची तपासणी व परिचारिकेची परिचर्या ही देखील घड्याळाच्या काट्यांसोबत चाललेली असते. एका डॉक्टरचें उदाहरण मला आठवतें त्यांचा धंद्याचा लौकिक मोठा. पण दक्तशीरपणा व नियमितपणा हे त्यांचे दोन सद्‌गुण दुर्गुण ठरलेले आहेत. एका रोग्याची सेवा शुश्रूशा करीत असतांना ठरल्या वेळेपेक्षां अधिक वेळ न देण्याचा त्यांचा शिरस्ता मोठा बाधक ठरला आहे. रोग्याची परीक्षा व्हायला स्थळ कालाचें बंधन थोडें शिथिल करावयाला नको कां ? वेळेची गुलामी म्हणतात ती

हीच ! आजचा क्षणपूजक मानव हा कालच्या क्षण विसरणाऱ्या मानवापेक्षां प्रत्येक बाबतींत खुजा व लहानगा आहे.

क्षणामुळेच मानवी समाजाचें अतोनात नुकसान झालेलें आहे. क्षणाचें क्षणभंगुर व क्षणिक तत्त्वज्ञान बोकाळूं लागलें आहे. चिरंतनाच्या विशाल, व्यापक व समावेशक सृष्टिवर क्षणांचें अधिराज्य चालू झालें आहे. 'वेळ मारून कशी नेतां येईल' या गोष्टीकडे सर्वांचें लक्ष लागलें आहे. 'उद्या' चा विचार सोडून त्याने 'आजच्या' यशावर डोळे रोखलेले आहेत. त्यामुळे आजचा मानव आणि त्याचा समाज पोषाखी बनत आहे. खऱ्या चांगुलपणाऐवजी दिखाऊ चांगुलपणा 'चंट' पणाने जग भाळूं लागलेलें आहे. आपल्या आजुबाजूच्या वातावरणावरच नव्हें तर जागतिक वातावरणावरहि त्याचे पडसाद उमटले आहेत. निर्भेळ सद्‌गुणा ऐवजी सद्‌गुण–दुर्गुणाचा मेळ घडवून त्याला सद्‌गुण असें समजण्यांत येऊं लागलें आहे. गाढता, सखोलता व सूक्ष्मता ही हळुहळू मागे पडूं लागली आहे. आजच्या समाजांत टिळक आगरकर, डॉ. केतकर किंवा 'बी' या व्यक्ती दिसेनाशा झाल्या आहेत. जुन्या मानवाला क्षणकालाचें भान नव्हतें. अंगीकृत कार्यांत त्याला कालाचाच नव्हे तर स्वतःचाहि विसर पडला होता. खऱ्या अर्थाची विद्वता कवित्त्व, राजकारणपटूत्व किंवा सुजनता आज हरविली आहे. मोहान्ध करणारी काळाची झापड आमच्या डोळ्यांवर आहे. काळाच्या चंचलतेने चिरंतन गुणांना गवसणी घातली आहे. साऱ्या जगांत, देशादेशांतून, गांवागांवांतून व घराघरांतून लहानमोठीं अराजकें भासमान होऊं लागलीं आहेत. तीं नष्ट करण्याकरितां परिषदा, मंडळें, बैठकी भरूं लागल्या आहेत. नव्यानव्या योजना व ठराव पसार होऊं लागले आहेत. पण रोगच जेथे कळला नाही तेथे औषध कोणतें लागू पडणार ?

निद्रिस्त मनुष्याला झोपेंतून जागें करतां येतें, पण जागृताला जागें कसें करावें हें कळत नाही हेंच खरें ! ....

नवें किंचित

जीभ अन् तलवार

जागची
यत्किंचित्हि
न हालतां
जगास
वश करून
प्रसंगी
राज्य करिते
ती.......!

अन्

बाहेर
पडल्याशिवाय
जिचें
अस्तित्व
नी
चमक
भासत नाही
ती— !

— राम पाथरकर

'तेथे कर माझे जुळती'

— राम वैद्य

दर्यापुरांतील रसिक वर्तमानपत्र वाचकांच्या नजरेंतून 'वामनराव' ही व्यक्ति सुटणे तर शक्यच नाही पण आठवड्यांतून एकदा कां होइना वर्तमानपत्र चाळणारे असे जे जे असतील त्यांच्याहि स्मरणांतून ते जाणें अशक्य आहे. पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षण शक्तीमुळेंच कीं काय उंची खुंटलेली, डोक्यावर मूळचा आकार पूर्णपणें सोडून देऊन नवीनच वेडावाकडा आकार प्राप्त झालेली टोपी घातलेली, मळकट व जाडेंभरडें धोतर चालतांना पावलांखाली येऊन अधिक मळकट होऊ नये म्हणून जेमतेम गुडघ्यांखालीं उतरेल अशा बेताने नेसून वर एका गुंडीने 'बंद' केलेला जीर्ण शर्ट परिधान केलेली, 'वाढत्या (!) अंगाचा वासनांतला जुनापुराणा काळा गरम कोट पांघरलेली, पायांत छिन्नविछिन्न रबरी वाहाणा सरकवलेली आणि वर्तमानपत्रांचा गठ्ठा काखोटीस मारलेली अशी ही व्यक्ति पाहिली म्हणजे, 'मूर्ति ठेंगणी आणि बावळीशी' ह्या कोणत्याशा कवीच्या उक्तीची आठवण होते !

आठवड्यांतून किंवा कित्येकदा पंधरवाड्यांतून एकदांच वामनरावांच्या चेहऱ्यावर नावठी 'मस्तरावैद्याच्या' हातून 'शस्त्रक्रिया' होत असावी असें अनुमान त्यांच्या चेहऱ्याकडे पाहतांच सहजच काढता येतें. त्यांतच नस ओढण्याच्या त्यांच्या संवयीची माहितीहि एकाच दृष्टिक्षेपांत होते, कारण अर्धी नस नाकांत आणि अर्धी वरच्या ओठावरील मिशांना अडकलेली असते ! वर्तमानपत्रांचा गठ्ठा सावरतांना, त्यांची विभागणी करतांना अथवा जेवणाचे वेळीं वामनरावांकडे पाहिल्यास त्यांचा उजवा हात निकामी असल्याचें सहज ध्यानांत येतें आणि त्याचा ते ज्यास्तींत जास्त उपयोग करून घेतात.

वामनराव म्हणजे केवळ एक व्यक्ति असें वास्तविक म्हणता येणार नाही. त्यांचें रूपांतर संस्थेंत झाले आहे, कारण वामनराव म्हणजे वर्तमानपत्रें असें समीकरण झालें आहे ! एकेकाची काम करण्याची हातोटी कशी असते पहा ! केवळ वरवर वाचाव्या आणि विसराव्यात अशा दैनंदिन बातम्या ज्या वर्तमानपत्रांत असतात त्या वर्तमानपत्राचें वाटप वामनराव अविस्मरणीय पद्धतीने करतात ! दर्यापुरांत वामनरावांना वगळून वर्तमानपत्राचा विचार करणेंच शक्य नाही !

कौटुंबिक जीवनांत अत्यंत अयशस्वी ठरलेले वामनराव वास्तविक खरोखरीच आदराला पात्र आहेत. पाऊस असो, उन्ह असो कीं कडाक्याची थंडी असो वर्षाचे तीनशे

अनुक्रमणिका

पासष्ट दिवस दर्यापूरकरांना 'बातम्या' पुरविणारी ही व्यक्ति निर्मळ चारित्र्यामुळे चिमखड्या बालकांपासून तों वयोवृद्ध सज्जनांपर्यंत सर्वांनाच प्रिय आहे. ज्या ज्या ठिकाणीं ते वर्तमानपत्रें टाकण्यास जातात त्या त्या प्रत्येक घरांतील दोन ते पांच वर्षांच्या आंतील मुलें हात पुढे करून त्यांच्याशीं लगट करण्यास पुढे सरसावतात, त्यावेळची वामनरावांची व त्या चिमण्यांची मोठी हृदयस्पर्शी, मौज पाहावयास मिळते. वामनराव एक हात खिशांत घालून ठेवतात आणि दुसऱ्या हाताने जवळ येण्यास बिचकत असलेल्या मुलांच्या खोड्या काढीत असतात. शेवटीं खिशांतला हात पुढे आलेल्या हातावर पडून खाऊची अदलाबदल झाली कीं खेळ संपला !

सुखाची जाणीव अभावानेच होत असतांनाहि जीवन किती सुंदरतेने जगता येतें याचें वामनराव हें एक चालतें बोलतें उदाहरण आहे. आपल्या उभ्या हयातींत जेमतेम जीवनाच्या गरजा भागविण्यापुरतीच त्यांची आर्थिक बाजू असली तरी ते कोणाची कवडीहि देणें लागत नाहीत. गरीब असो वा श्रीमंत असो वामनरावांना सर्व सारखेच. ते सर्वांनाच मान देतात पण हेवा मात्र कोणाचाहि करीत नाहीत. उलटपक्षी त्यांच्या बद्दल कोणी कांहीहि बोलो ते त्याकडे कान अक्षरशः 'बहिरे' करतात !

परिस्थिति सर्वतोपरी दावा साधण्यास कमर कसून उभी असली तरीहि त्यांच्या मनांतला आनंद आणि चेहऱ्यावरचें हास्य मावळत नाही. अनेक उणीवा असतांनाहि मानवी दुबळेपणाच्या परिघाबाहेर ते आहेत. मिश्कल आणि नम्र स्वभावाचे वामनराव म्हणजे उन्हाळयांतील पहाटेच्या थंडगार वाऱ्याची शरीराला सुखविणारी झुळुकच ! असामान्य असें कांहीहि जवळ नसतांना त्यांनी दर्यापूर येथील जनतेच्या अन्तःकरणांत कायमचें स्थान कोणताहि प्रयत्न न करता मिळविलें आहे. स्टेशनवर दररोज सकाळच्या गाडीवर वर्तमानपत्राकरितां बरेच लोक जातात. त्यावेळीं निरनिराळया अनेक वर्तमानपत्रांचा पसारा अंवती भंवती मांडून बसलेले वामनराव हें दृश्य सर्वपरिचित झालें आहे. वर्तमानपत्राची त्याच्या मनासारखी मांडणी होण्यापूर्वीच कोणी त्यांना वर्तमानपत्राकरितां निकड लावल्यास मात्र ते चिडतात, पण त्यांचें तें चिडणें कोणी मनावर घेत नाही, कारण त्यांच्या कर्तव्यनिष्ठेला मान देण्यास दर्यापूरचे लोक शिकले आहेत. स्टेशनवर गाडीच्या वेळीं चाललेल्या गलबल्यांत ते डब्यांतील प्रवाशांना वर्तमानपत्रें कशीं विकतात हो खरोखरच मोठी नवलाची गोष्ट आहे. कारण त्याचा आवाज इतका मंद आणि क्षीण आहे कीं त्यात कांहीतरी दैवी गुण असल्याखेरीज तो उतरूंच्या कानापर्यंत पोहोचणेंच अशक्य वाटतें.

विरोधी परिस्थितीशीं टक्कर देत स्वकर्तव्य चोखपणें, एखाद्या कर्मयोग्याप्रमाणे बजावणाऱ्या वामनरावांना पाहून, 'तेथे कर माझे जुळती' ह्या उक्तीची आठवण झाल्याशिवाय कशी राहील !

अनुक्रमणिका

माझी ' ही '—

— बांके बनोरे

" अहो ! वाचलांत का हा लेख ! किती छान आहे ! " शेवटचंच वाक्य ठळकपणें कानांत गेल्यामुळे, दारावर बहुतेक पांचवारी साडीवाला आला असावा या शंकेमुळे चर होते सर्वबळ एकवटून मी कूस कळवितो....आणि पहातो तों....माझ्या शेजेजवळ (तिच्या) कुंकवाची दासी.......

" अहो असं काय बघता एकटक, वाचा की तो लेख ? "

" नाही, म्हटलं ' झनकझनक पायल बाजे ' हा चित्रपट आपल्या घरांत कसा आला ? "

'इश्श'चा एक फिल्मी मुरका मारल्या जातो (याबेळेस मात्र मी घायाळ होत नाही बरं !). तो निघून जाते नि मी निर्देशित लेख वाचण्याच्या भरीस पडतो.

आणि आर्किमिडीसच्या " युरेका " सारखा एक सृजनशाली भावोन्मेष माझ्या मनो–घंघाळांतून बाहेर पडतो ...खरोखरच, महाराष्ट्र सारस्वताच्या अंगाला सारखी टोंचत असलेली उणीव या नवाट वाङमयप्रकाराचा जो एक पायंडा पडू पाहत आहे त्याने भरून निघण्यासारखी आहे.... या उपक्रमाचं नांव पतीने आपल्या पत्नीचा परिचयात्मक लेख लिहिणे.–दस्तुर खुद्द मवरोबा मेहमी अनुल्लेखानंच तिची बोळवण करीत असल्याचे अनेक संसाराचे दाखले मजजवळ आहेत. काय म्हणे तर आर्यपतीला हें शोभत नाहीं. पाश्चत्य सभ्यतेला ते मानवत असेल पण आमची जीभ नाही उलणार. तिच्या श्रेष्ठतेची पब्लिकशिट्टी वाजवण्यासाठी.... जी साऱ्या सृष्टीची आदिमाया तिच्याविषयीं असा अनुदार दृष्टिकोण... मी सांगतो यांतली मेख. हा नुसता पुरुषी उद्दामपणा आहे अस म्हणता का ? चूक....पुरुषांच्या न्यूनगंड आहे हा न्यूनगंड—जरा भारदस्त शब्द वापरू कां—Inferiority Complex बरं हा. बरचढ स्त्री पुरुषांना आवडत नाही हेंच कारण.

पण या वृत्तीचा जाहिर निषेध व्हायला हवा. काळ बदलत आहे हे लक्षांत ठेवा. नवरा जर बायकोला पायातली वहाण म्हणून समजू लागला तर नवऱ्याला तिने " जापानी जूता " (४२० नं. चा वितरक–राजकपूर, भेटा अगर लिहा) कां मानू नये ?........इत्यादि.

बघा असं होतं सात्विक संतापाच्या भरांत डोक्यांत टोपी न घालता व्यासपीठावर चढल्यासारखं करतोय्.

बरं तर मुद्यालाच हात घातलेला बरा. मी माझ्या 'मंडळीच्या' थोरवीची एक रुपरेषा आपणापुढे मांडणार आहे. प्रस्तुत लेखाची " वैचारिक" बैठक स्त्रियांवर होणाऱ्या अन्याया विषयांच्या पोट तिडीकेंत आहे, "भावनात्मक एकतानते"च्या

दृक्कोनांतून पाहिल्यास मनांत मळमळणाऱ्या कृतज्ञतेच्या भावबंधाचा तो " विलोभनीय शेखरीभूत प्रसव " आहे एवढं सांगितलं म्हणजे कुणाला खुटकायला नको (शेवटची शब्दत्रयी श्री ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या 'चिपळूणकर: काल आणि कर्तृत्व' या पुस्तकाच्या एका परिच्छेदांतून उचलली आहे— धन्यवाद.)

आता कांही जण मला खवचटपणे विचारतील (तो विशा देशपांडे म्हणालाच ना) अहो तुमची ' मंडळी ' अशी कोण मोठी सामाजिका लागून गेली की तुम्ही तिचे गुण जुळाऱ्यांकडून वदवून घेऊ इच्छिता !' या कांट्याला काय तिची थोरवी कळणार म्हणा ! प्रसिद्धीच्या मुजगावण्याला अजुनहि भुलतात ना लोक ते असं. प्रसिद्धिविन्मुखतेविषयी मुळी ती प्रसिद्ध आहे. आणि तसंच जर म्हणायचं तर आमच्या ९'। १०' च्या दोन खोल्यांमध्यें तिच्या व्यतिरिक्त सिद्ध आणि प्रसिद्ध व्यक्ति कोणतीहि आढळणार नाही. आरच्या आळींत देखील तिचं नांव उच्चारल्या जातं (उदा. म्युनिसिपालिटीच्या नळावर.) अहो बाहेरच्या जगांत " काय घेऊन बसलांत ? रेडिओंतील वनिता विश्वाच्या धाटणीवरच आमच्याकडे वनितासमाज भरत असतो. ह्या सभेची चेअरवुमन हीच असते हें काय सांगायला हवं ! तुम्ही तिच्या कर्तृत्वाविषयी वाळवट शंका घेतां ना म्हणून मी सांगितलं. अशाच एका अर्धसाप्ताहिक सभेत तिच्या वाणीचं नि करणीचं कौतुक करून एका वनितेन आमच्या 'ही' ला युनोचं अध्यक्षस्थान देण्यांत यावं " अशा आशयाचा एक तोंडी ठराव केला होता. त्यावेळेस ही विनयशाली (' विनय ' नांवाच्या अपत्यामुळे जिला शोभा आली आहे अशी जी ती) काय उद्गारली असेल ! आज काळच्या लेडी इंदिरा काकू प्रमाणें तिची छाती फुगली म्हणतां का ? (असल्या कृत्रिम फुगाऱ्यांबद्दल तर वेळोवेळी तीच तीव्र नापसंती व्यक्त करीत आली आहे) छे ! त्या गृहिणीचे अमूल्य शब्द माझ्या कानांला अजुन गुंगी आणत आहे " मिस सुपसांडे ! आय मो. यु. नो. (असं आंग्लभाषापरिचयांतील पहिल्या पाठांतील वाक्य बोलून व न कळत श्लेष साधून) तिथे जायची काय बरं आवश्यकता ? आणि हे बघा आधी विनोबा (मूल) नंतर युनोबा " टाळ्यांच्या कडकडाटांत (प्राधान्याने विनूच्या रडण्यामुळे) ठराव मागे घेण्यांत आला (मला हायस वाटलं !) काय ह्या साध्वीची नम्रता—तनाने, मनाने, धनाने, तात्पर्य, की ती मोठी आहे—फार मोठी आहे. तिच्या मोठेपणाचे जे कण माझ्या प्रत्येक श्वासाच्या क्षणांत सामावले आहे, त्याची जाणीव इतरे जनांना व्हावी म्हणून हा अल्पसा······

वस्तुत: ज्या स्त्रीनं मला एवढं 'बनवलं' (प्राकृत अर्थाने नाही—' मेड ' या अर्थाने) माझा हात आपल्या एका हातांत ओढून, या संसार कांताराच्या रक्षेसाठी दुसऱ्या हाताने कुंपण बांधलं (आमच्या व्यतिरिक्त अन्य प्राणियांना मज्जाव असावा म्हणून), तिच्या गुणाढ्यतेचं या चारदोन पानी पत्रावळींतून साकल्यानें व यथार्थानें रसग्रहण करणें अशक्यच आहे. शितावरून भाताची परीक्षा ह्या सनातन न्यायाप्रमाणे इथे फक्त कांही शितेंच दाखविण्यांत येतील. (सविस्तर चरित्राकरता लिहा— " माझी मंडळी " मी कृत—प्रकाशनाच्या वाटेवर पृष्ठ संख्या—अगणित—सोनेरी बांधणी, कागद—रॉयल ऑक्टॅव्हो – टाईप—महाभारत खंड १ बाल्य खंड २—वार्धक्य (अपूर्ण)—टीप— तारुण्याचा खंड त्याच्या काल-संकोचामुळे म्हणा किंवा सत्यापलाप टाळण्यास्तव वगळला आहे. मुख्यतः तो काळ परस्परान्तर्भावी (overlapping) असल्यामुळें कधी खंड १ व कधी खंड २ मध्ये विभागला आहे. ······

माझ्या लाडिक मैनचें नांव सौ. मंदोदरी घोरपडे (जन्मनांव–धुर्पती) आहे म्हणे–पण त्याच्याशीं आपल्याला कर्तव्य नाही. कारण ती माझ्याच कर्तव्याला राशीला बसल्यामुळे तिची स्वतःची अशी वेगळी राशी काढायची जरूरी नाही! 'मंदोदरी' हा समास जिच्यामुळे आपलं मन दोन दऱ्यांमध्ये सांपडतं अशी जी ती असा करावा (कांही माझ्या उल्लू मित्रांनी मंद आहे उदर (कोठा) जिचं अशी फोड माझ्या तोंडावर फेकली होती–ती सर्वस्वी चूक आहे. वाचकाने लक्ष देऊ नये!) आडनांवाशी साध्वीचा कांही विषेशण–विशेश्य असा संबंध नाही तें सर्वस्वी माझे आहे. (मला घोरत पडण्याची व उशीरा उशीरा उठण्याची संवय असल्यामुळं तें नांव पूर्वीपासून चालत आले आहे. शेषशायी विष्णू क्षीरसागरांत चार महिने घोरत पडल्यानंतर त्याला जागवण्यासाठी लक्ष्मीने "अहो! घोरपडे" हेंच दिव्य संबोधन उच्चारलं असा एक प्रवाद आमच्या आडनांव–विषयीं प्रचलित आहे.) "एका भार्या सुंदरी वा दरी वा" या न्यायानं मी तिला प्रेमाने "दरी" म्हणूनच हाका मारतो. कारण एकदा तिला मी चूकून मंदा म्हटलं तर तो फणकारली "मंद पुरुष असतात बाया नाही!) ब्राह्म मुहूर्तावर मात्र मी तिचा" मं–दो–द–री असा पूर्णोच्चार करीत असतो—हेतु हा की पतिव्रता पंचकन्येचे प्रातःस्मरण करून पदरी पुण्य गाठावं व दुसरे तिने आपल्या रडत असलेल्या अपत्याकडे डोळे उघडून पाहावे.

दरीचा जन्म वत्सगुल्म (आधुनिक 'वाशीम') खिस्तोत्तर कालांत २० व्या शतकाच्या पूर्वार्धांत झाला. तिची जन्म तारीख निश्चित नाही. लग्नाची जन्मतारीख आणि व्यावहारिक जन्मदिन यामधील वाढते अंतर नाहीसे व्हावे या सद्हेतूने प्रेरित होऊन तिचे आणि माझे जन्मदाते यांच्यामधल्या उच्चस्तरीय मुलाखतीत बरेच मतभेद गाजले होते. ते कांही पैसे देऊन मिटवण्यांत आले.

माहीतरी दरीच घराणंच ऐतिहासिक. त्यामुळे जन्म दिवसाविषयीं एकमत होणं अशक्यच [शिवाजी महाराजांच्या जन्माविषयी नाही का असा गोंधळ!] आता तुम्ही विचाराल तिच्या घराण्याच्या ऐतिहासिकतेविषयीं मला कसं समजलं? तर तिनेच "वत्सगुल्म" या शहराची व्युत्पत्ति (वत्सांचे जे गुल्म) सांगितली होती. त्या शहराचें हें मूळ नांव पडायला कारण तिचे पूर्वजच त्याच्याकडे म्हणे इतकी गायीवसरं खच्चून भरली होती की मैलचे मैल माणसांच्या वस्तीचा पत्ताच नव्हता. पुढील संशोधनासाठी नागपूरचे कांही प्रख्यात संस्कृतज्ञ तिथे याचा सुगावा लागतांच गेले म्हणतात. असतु ती माझ्या जीवनांत आली नसती तर....तर काय मी या पूर्णावस्थेला पोहोचलोच नसतो. लग्नाच्या दुसऱ्याच दिवशीं मी कारकून नि (भावी) पिता झालो. याला म्हणावं पायगुण. हे मानाचं पान मिळालं असतं का मला तिच्या शिवाय!

दरी श्रीमंती वातावरणांत मुळची वाढलेली नि शिकलेली पण अंगी ताठा मुळीच नाही. (जो कांही मानेमध्ये लहानपणी वारा वाधल्यामुळे आहे तेवढाच!). माझी दरी काटकसरी नसती (इंटरला असतांना तिने अर्थशास्त्रांतील एंगल्सचा लॉ वाचला होता) तर या फाटक्या नारायणाच्या संसाराचा हिरोशिमा झाल्याशिवाय राहिला असता का? दरीची मितव्ययताच मुळी शास्त्रीय, मौलिक नि सर्वकंष आपल्या वाकृतांचे सैद्धान्तिक विवरण तिने कित्येकदा माझ्या मह डोक्यापुढे केलें आहे. त्याबद्दल मी खरोखरच घोर अंधारांत आहे हे कबूल. दरी पार्मर

डाळींत दोन दिवसाला पुरणारं वरण करते आणि तेही व्हिटॅमिनमुक्त. पहिल्या दिवशी वरणावरचं पाणीच घ्यावं असा तिचा आग्रह असतो. कारण त्यांत 'क' सत्वांचं आधिक्य असतं. अर्थातच शुष्कीभवन क्रियेमुळे डाळीचे जे शुद्ध मूलभूत दाणे खाली उरतात (जे शिजवले असतांना त्यांतील सात्वांश नष्ट होण्याची भीति असते) ते आम्हा दुसऱ्या दिवशी कामी पडतात. दरीच्या उपदेशाप्रमाणे आम्ही स्नानार्थदेखील सनलाईट " वापरतो. कारण त्याने कपडे 'उजले व सफेद' धुतलें जातात (या विरुद्ध सिद्ध करणाऱ्यास १०,००० चें बक्षिस) हेंच नुसते व्यवहारिक धोरण नाही तर त्यामागे असणारी पारमार्थिक बैठक तिच्याच शब्दांत सांगतो मी हं....माझ्या पदरचं कांहीच नाहीं त्यांत हो. काय बुवा... " शरीर म्हणजे वस्त्रच. श्री. कृष्ण म्हणतातच नां " वासांसि जीर्णानि यथा विहाय " वगैरे आणि सनलाईटने कपडे धुतलें जातात म्हणून तीच आपण वापरावी ? काटकसरीच्या तत्त्वावर पाहिल्यास श्रमाची बचत हा एक आणखी फायदा. अंगाला साबण लावतांनाच विन्याच्या वा सुमीच्या अंगावर जे कपडे असतात त्यांनाहि एकाच फटकाऱ्यांत साबू लावल्या जातो म्हणजे कपडे धुणे व अंघोळ या दोन्ही क्रिया समन्वयात्मक पद्धतीने होतांत (सध्याच युगहि समन्वयाचंच आहे नां ?) अर्थात् या दोन्ही क्रिया माझ्या बाबतींत मला स्वतःलाच कराव्या लागतात बरं ? अर्थात या ठिकाणी हे सांगायलाच नकोच असा फूरसतीचा वेळ दरी कलेच्या सृजनांत घालविते. आता एक प्रश्न उद्भवतो की दुसरा साबण वापरण्यांत दरीचा विरोध कां ? आहे यालाहि तिने सडेतोड उत्तर दिलें आहे. तिचा विरोध " सांस्कृतिक वैचारिकतेंतून निर्माण झाला आहे.

विनू ज्यावेळस आईला म्हणतो " आई, मला सनलाईट दे ना ? " तेव्हा त्याची ही हांक आत्म्यांची जणूं चिरंतन हांक असते. " लाईट मोअर, लाईट, दुरितांचे तिमिर जावो, विश्व लाईट पाहो, वगैरे अंधारातून प्रकाशाकडे ने असं सांगणाऱ्या औपनिषदिक मूल्यांचे संस्कार अजाणता त्याच्या मनावर पडत असतात. इमाम, लक्स, रेक्सोना गोदरेज संडल इत्यादि कर्कश व घाणेरडी नांवें मुलांच्या कानांवर आदळल्यास त्यांच्या मानसिक पिंडास अक्षय इजा होते (नांवात काय आहे ? असं म्हणणाऱ्या शेक्सपिअरने अजून याविषयीं दूरगामी विचार करावा) माझा एक उनाड मित्र म्हणतो की ही सारी जाहिरातबाजी आहे बाबा ! तिचा चुलत भाऊ सनलाईट साबणांचा एजंट आहे बरं. पण हे सारं झूट आहे. त्याला दरीविषयीं मत्सर वाटतो हेंच खरं कारण. तिचा काटकसरीपणा हा असा एकांगी नाही तो सर्वस्पर्शी आहे.

माहेरी जायचं म्हटलं तरी ती कशी हिशेबीपणा दाखविते. (सध्या देखील ती 'गवती विधवा' च " Grass window " आहे.... काहो दचकलांतना.... म्हणजे माहेरीच गेली आहे ती. ब्रिटीश आमदानींत गोरे लष्करी अधिकारी उन्हाळयांत आपल्या बायकांना गवताळ प्रदेशांत पाठवित होते व त्या तात्कालिक वियोगाला Grass window म्हणून संबोधीत तसा मी चांगला धडधाकट आहे !!).

"काय ग ! उठल्या सुटल्या माहेरी जातेस याचा अर्थ काय ? असा एकदा मी किंचाळलो असतांना तिने आपल्या फॉरेन पॉलिसीच–म्हणजे " पंचशील "च किती सुशील समर्थन केलें होतं नेहरूनं क्रुश्चेव्हचा हात आपल्या हातात ज्या सहजतेन घेतला होता त्याच सहजतेन....

" तुम्हालां किनई कसं कळत नाही. अहो

मी माहेरी गेली की तेवढाच विनूच्या यमीच्या दुधाचा खर्च नाही का कमी होत? पुढच्या महिन्यांत तुम्ही आपल्या करता घर-वापरासाठी एकादी धोतरजोडी घ्या. त्यांत पुनश्च मी कांही लोकांसारखी नवर-बुद्धि नाही हेहि कळतं. मला काय मेलीला जाण्यायेण्याची तिकीट असली की झालं. आता नाही म्हणायला आईकडे जायचं म्हणजे अशा वाईट साडींत काय जायचं त्यांत आपलाच नाही का कमीपणा? म्हणून मी एक साधीच शहापुरी घेऊन येते म्हटलं···आणि हो तुम्हीहि चला ना गडे बरोबर म्हणजे आपल्याला बरी खर्चच नको ५-६ दिवस करायला."

हा तिचा युक्तिवाद आणि खर्च वाचविण्याची चातिकी खुबी बिनतोड नाही कां! पण याच्यावरहि तो थेरडा जनुभाऊ खिकाळला होता···'अरे तुझ्या डोक्यांत काय कांदे भरले आहेत का? मूर्खा, तुम्हां दोघांच्या नि कार्ट्यांच्या गती-परतीची तिकीटं आणि पातळ-पुरीचा खर्च हें सारें जाऊन तुझ्या दुधाचे (जे तुझ्या विन्यांन मागेच पिण्याच सोडलं आहे—किती टक्के वाचतात···सांग बरं मला?"

मी तात्काळ जनुभाऊची संगत तोडली. "न केवलं यो महताऽपभाषते श्रृणोति तस्मादपि यः स पापभाक्" या कालिदासीय उक्तीला अनुसरून थोर माणसांची निंदा ऐकण्याचंहि पाप करणार नाही ही मनोमन शपथ घेतली. त्याचं बायकोशी सूत नसावं म्हणून तो असे अनर्गल प्रलाप काढत असावा. फ्राईडने काय खोटं सांगितलं? हमखास त्याच्या सुप्तमनांत गंड उद्भवला आहे....

जनुभाऊ, तूं कोणाबद्दल बरळतो आहेस हें! दरीबद्दल तिच्या निःसीम (वा "वासीम") भक्तीला का तूं रुपये आणे पैनी भागणार? प्रमदांच्या प्रीतीचं पंचराशिक मांडणाऱ्या पुरुषांना धिक्कार असो. तूं म्हणतच असशील "गृहिणी सचिव. सखी" हा अजाने (अगदी मूळ शब्दार्थाने!) केलेला प्रलाप आहे······पण लक्षांत ठेव माझ्या दरीला हें वर्णन अगदी फिट्ट बसतं................

सोशिकपणा हे दरीच दुसरं नांव. तिला तुम्ही बाभळीच्या झाडावर चढवा किंवा हरबऱ्याच्या झाडावरून खाली ओढा ती सहन करील. सरकलेला पदर डोळसपणाने जिथल्या तिथे ठेवील. खरचटलेलं नि रक्ताळलेलं अंग लोकांसमोर दाखवून हमदर्दी भाकण्याची तिला संवयच नाही. तो करुण-रम्य प्रसंग डोळ्यासमोर उभं राहिला की अजून अंग कसं शहारतं·······

दरीला सकाळपासून वेदना सुरु होत्या. मध्येंच किंचाळायची मला कांही कळेना. मी सरकारी दवाखान्यांत गेलो, माझ्या तिला वाचवा वाचवा हो म्हणून डॉक्टराचे पाय धरले पण····ती डॉक्टर···राक्षसी असतात. झालं···लग्न करत नाहीत. मेल्या एवढ्या मोठ्या घोड्या होतांत तरी····कानांतला स्टेथोस्कोप कानांतच ठेऊन तिने मला दटावल्यानं केलं—! Oh! dont be fussy, they are simple labours मला वाटलं डॉक्टरनं आपल्या घरच्या लेबरर्स-म्हणजे मजुर लोकांना उद्देशून म्हटलं असेल······ पण तसं कांही नव्हतं, मी आशाळली मुद्रा करून म्हणालो··· "मी वाटेल ते लेबर करायला तयार आहे. डॉक्टर, मी तिच्या उशाजवळ बसेन, आईस बॅग डोक्यावर ठेवीन. पण तिचं हे दुखणं थांबवा तिच्याकडे पाहून मला अन्न देखील जात नाही. कसेंबसें दोनचार घास आंत ढकलून आलो डॉक्टर! माझ्या या करुणोत्कट उद्गाराचा तिच्यावर परिणाम झाला असावा निदान त्या शरीरसंरक्षण नर्सेसवर तर खासच झाला असेल

या भावनेने मी तिकडे सहेतुक दृक्षेप केला.····

पण त्या कचकड्या दोन बाय तीनचा एक मलमली तुकडा तोंडाला लावून दांत विचकत होत्या. काय हे··· पेशंट आसन्नमरण स्थितींत असतांना यांना असं हसायला येतं! वाटलं त्यांच्या त्या २" इंच लांब वेणीचं ते २ फूट त्रिज्येचं डॅकेट ओढून त्यांच्याच टाळक्यांत हाणावं··· (नंतर मला कळलं की लेबर्स म्हणजे प्रसवपूर्व वेदना हें देखील डॉक्टरीचा ब्रॅश कट् म्हणजे संक्षिप्त अभ्यासक्रम शिकणाऱ्या माझ्या चुलत मेव्हणीने सांगितलें··· नाही तरी थोडी शिष्टच आहे ती.···)

तर काय म्हणत होतो मी····हो दरीच्या कळा···· ह्या चंद्रकलेसारख्या वाढत होत्या. आता मात्र डाक्टर थोडी गंभीर झाली. पूर्वेकडन मिस गायतोंडे आल्या; पश्चिमेकडनं डॉ. राजू···· पहिली म्हणाली ही फॅरसप्सची केस आहे दुसरी म्हणाली···डॅम इट, इट इज डेफिनिटली सिसेरीयन."

"चला ओ. टीं त न्या" फर्मान सुटलं. मनांत आलं या तिला स्ट्रेजरवरच न नेता ओटींत कशा नेतील. पण सुदैवाने तिला स्ट्रेचर-वरच चढविण्यांत आलं···· मला हें दृश्य कधीच आवडत नाही. मी देवाची प्रार्थना करूं लागलो नवस बोललो. स्वतःलाहि बोललो. पुन: जन्मांत असं कधी होऊं देणार नाही असा कानाला खडा लावला. ती स्ट्रेचरवरून जाऊ लागली. पाठीमागून नर्सेसचा घोळका··· बाजूने माझी ती बुटकी चुलत मेव्हणी नि त्या अॅप्रन घात-लेल्या, ओढलेल्या चेहऱ्याच्या तिच्या धांगड मैत्रिणी··· समोर दोन म्हशीसारख्या डॉक्टरणी.

"अहो मिस्टर,तुम्ही कशाला ओटींत येता?" मला या गौडबंगालाचा अर्थच कळेना मी तर आपला चांगला कडेकडेने चाललो होतो. तिची ओटी बिटी त्यांना भरायची असेल म्हणून···· शिकल्या तरी त्या हिंदु स्त्रियांच ना!

"अहो बाबुराव! ओटींत नका ना येऊ" आता ती माझी मेव्हणी माझ्या दंडाला ओढीत म्हणाली. हा माझा उपमर्द होता. मी संतापलो नि खवचटपणे म्हणालो "पण तिने मला सारी परिस्थिति समजाऊन दिली व ओ. टी म्हणजे ऑपरेशन थिएटर असं स्पष्टावलं····आणि मी चुंबितच दाराबाहेर उभा राहिलो तृतीय जागतिक युद्ध झाल्याशिवाय मला या जगांत पत्नीशिवाय अन्य प्रेमाचं निधान नाहीच अगदी चर्चिल सारखंच आहे माझं···दरीवर भयंकरच प्यार (न करून कसं चालेल?) तिचंहि माझ्यावर आहे. उगाच कां ती ऑफिसच्या वेळेला माझ्या सदऱ्याची बटनं उघडी असली तर बसवून देते····अर्थात् त्यावेळेस चुकून माझा खिसा उलटा होतो याला ती काय करणार!

ती जर आज गोव्याच्या सत्याग्रहांत सामील झाली असती तर माझे हाल माझ्या मोल करणीनें देखील खाल्ले नसते. माझ्या स्वार्थासाठी आपल्या ध्येयावर गोवऱ्या ठेवल्या. धन्य त्या माऊलीची. त्या दुधाळ रात्रीचा आक्रोश···

"दरी, मागं फिर. अजूनहि वेळ आहे"··· अरेच्चा ही तर दरी. परतली दिसतेय् माहेर हून....ये ये....सारं ठीक आहे नां...बघ तुझ्या साठी जीव कसा तळमळायचा जसा चहासाठी पावाचा तुकडा...."चला चहाटळ कुठले"...!

मित्र हो! काय झोपलांत....बरं बरं नाही म्हटलं "ही"चा परिचय लेख अजून अपूर्णच आहे....पुढच्या खेपेला ती माहेरी जाईल तेव्हा पूर्ण करीन म्हणतो. साहित्य, संगीत, नृत्य, भरतकाम, वीणकाम इत्यादि कलेविषयींचे तिचे

मौलिक नि उद्बोधनप्रद विचार शेवटी सांगायचे राहिले. थोडासा सूत्रपात करून ठेवतो. संगीत-विषयीच तिचं संशोधन क्रांतिकारीच म्हणायला हवं. आलापबाजी करतांना काही गायक ढंगदार-पणे परत समेवर येण्यांत आवाजाचे कसब मान-तात हीच समजूत मुळी मूलतः चूक आहे... कारण दरी म्हणते. संगीत ही ब्रह्मानंदाची स्थिति समेवर न येता तार सप्तकावरील अतीत 'सा' वर थांबण्यांत रागाचा परमोच्च बिंदू असतो आणि तिथे याला निर्विकल्प समाधि लागली त्याला चित्स्वरूपाचा आनंद प्राप्त होतो यांतू-नच तिने एक आध्यात्मिक निष्कर्ष काढला आहे तो म्हणजे हें ब्रह्मांड ॐ कारुरुपं नसून "आ" कारात्मक आहे. अस्थायी-अंतरा, मंद्र–तार हें सारं द्वैत त्या एकमेवाद्वितीयं "आ" मध्ये विलीन व्हायला हवं...दरी, माझ्यासारख्या पाम-राला हे गूढ ज्ञानामृत काय पाजते ? किती मोठी आहेस ग तूं....आज मला तुझ्या सदोदित "आ" वासण्याच्या पाठीमागील प्रक्रिया स्पष्ट झाली....

" अहो....चहा झालाय् म्हटलं....काय आका-शांतले तारे मोजणं चाललं वाटतं...मेळा ओर-डून ओरडून घसा फुटला....!

....वाचकहो....नाही, आता जायलाच हवं....

..... जोडा !

कोटया करण्याचा हव्यास असलेला एक वक्ता भाषण करत होता. 'जोडा' शब्दावर कोटी करण्याची त्याला लहर आली. एक गोष्ट तो सांगू लागला.

" एका जोडयाच्या दुकानांत कांहीं मुली पाहून एक तरूण आंत शिरला. मुलींकडे पाहून डोळे मिचकावत तो म्हणाला— 'एक उत्कृष्ट 'जोडा' द्या ! '—परन्तु जोडा मिळण्याऐवजी त्याला चपला मिळाल्या ! '....आणि तो पाहतो तों त्या मुली दुकानाबाहेर जातांना त्याला दिसल्या आणि स्वतःच्या पोषाखास 'विजोड' असा चेहरा करून तो बाहेर पडला ! "

स्त्री पेक्षकांत पोट दुखेपर्यंत हंशा फुटला !........

........पुरूष प्रेक्षक मात्र शान्त होते ! वक्ता विनयाने पुढे म्हणाला " कां ? अजोड वाटली कां कोटी ? "

........स्टेजवर जोडे येऊन पडतात !! पण हाय"! त्यांत एकहि चप्पल नसते...! हा मामला मात्र तो कोठेहि बोलत नाही.! —

अशोक व्यवहारे, अमरावती.

अनुक्रमणिका

उंटाचीं पिलं !

माणिकचंद्र कानेड.

१. टिकाकारांना हद्दपार केलं तर—

कलावंत आणि रसिक यांत हा टिकोजी म्हणजे 'बीचमे मेरा चांद भाई!' 'जे न देखे कवि ते देखे टिकोजी' कलाकाराला स्वप्नांतहि दिसणार नाही. असं सौंदर्य (!) किंवा त्याच्या ध्यानींमनींहि नसणारे दोष या पायाळू टीकाकाराला दिसतात. प्रसंगी तो भाटाप्रमाणे स्तुतिस्तोत्र गाईल तर कित्येकदा बोटांनी फसाफसा ओरबाडून संशोधनीय ठेवा नखावर मारणाऱ्या मर्कटाप्रमाणे कलाकृतीच्या चिंधड्या करून ठेवील. कधी तो एखादी कलाकृति असमान्य आहे म्हणून तिला डोक्यावर घेऊन नाचील आणि त्या कलावंताचा गौरव असा करील, त्याला असा चढवील की 'ऐसे आता होणे नाही' असंच आपण मानावं. तर कधीं स्वतःच शिमगाभूषण होऊन कलाकाराच्या नांवानें पांचजन्य करील. The absence of humility in critics is something wonderful' असं म्हणायची पाळी आपल्यावर यावी. आणि कांहिवेळा तर गमंत अशी की आमचा 'टीकाराम' डमरू प्रमाणें दोन्ही बाजूंनी आवाज करतो. 'खरं सांगायचं म्हणजे म्हटलं तर असं आणि म्हटलं तर तसंहि आणि नाहीच कांही तर शेवटी कलाकाराचे 'महान गुण आणि महान दोष' दर्शवून हात झटकून पुन्हा मोकळे. अगदी 'मेरा चुरन बना है आला जिसमे डाला थंडा गरम मसाला'-- ' Hot and cold in the same breath ' असा चुरनवाला ! सापाची मादी म्हणे अंडी घालत जाते आणि वापस परततांना तीच खाऊन टाकते, तसं सुरवातीला मंपक विधानं करायची आणि नंतर त्यावर बोळ फिरवावयाचा असा कांहीसा प्रकार 'टीकाबाई' करते. म्हणूनच टीकाकाराला जेवढं नेमकं समजलं नाही तेवढंच रसिकांनी लक्षांत ठेवायला हवं.

फारच थोड्या मांडवलावर (बुद्धीच्या !) आपणाला टीकाकार म्हणून मान्यता मिळूं शकते. संस्कृत साहित्यशास्त्रांतील चार दोन, उतारे, इंग्रजी टिकाशास्त्रांतील मधून मधून पेरायला अवतरणें आणि कांहीतरी गहन आपण सांगत आहोत (असतो तो जावई शोधच) हें भासविण्यासाठी स्वतःघडविलेले दुर्बोध शब्द बस्स, एवढ्या मांडवलावर कोणत्याहि कलाकृतीचें परीक्षण -- समीक्षण—परिचय परामर्ष—रसग्रहण-- रसावलोकन--मूल्यमापन इत्यादि बऱ्याचशा गोष्टी तुम्हाला करता येतील. शेखमिऱ्याचा डोलारा आणि पर्वतीच्या पायऱ्या यांचा संबंध जोडण्याची कल्पकता हवी. सौंदर्यवाद ,स्वच्छंदतावाद, प्रतीकवाद, प्रगतिवाद, वास्तववाद (म्हणजे काय नक्की माहीतं नकोच) वगैरे वादांची नांवें पाठ असावीत. ग्राम्यता आणि अश्लीलता ही घाण संशोधण्याचें घ्राणेंद्रिय तीक्ष्ण असावें आणि नेहमीच शेवटी 'असं केलं असतं तर अधिक बरं झालं असतं' असं पांडित्य असावं. कारण उपदेशा इतकी सवंग आणि दुसऱ्याला देण्याइतकी सोपी दुसरी कोणतीच गोष्ट नसते. आपली विद्वत्ताच दर्शविणें असल्यास आपलं वाचन दांडगं आहे आणि तुलनात्मक धार आपल्या विवेचनाला आहे असें भासविणें असल्यास 'अमुक नायिका तमुक नायिकेच्या तोंडाव-

अनुक्रमणिका

ळ्याची मासते, 'हें वचन या विचेनांची आठवण करून देतें' अशी शिष्टाई (कांही त्याला चोंबडेपणा म्हणतात) करण्याची हौस असावी. मग लोकांनी तुम्हाला 'लोकां सांगे ब्रम्हज्ञान' 'नाचता येइना अंगण वाकडे' असं म्हणून अर्ध्या हळकुंडाने पिवळे झाल्याबद्दल तुमची कुचेष्टा केलीतरी डरूनका आपला हट्टाग्रह कायम ठेवा. वादाकरिता वाद करा आणि पैशाला शंभर शिव्या मोजण्याची कुवत ठेवा म्हणजे तुमच्या वाटेला सहसा कोणी जाणार नाही. अशा मर्दुमकी गाजविणाऱ्या टिकाकारांना हद्दपार केलं तर– ! काय होईल असं आपणाला वाटेल. 'जो टिकाकारावरी विश्वासला त्याचा कार्यभाग बुडाला' असंहि प्रतिपादन करण्यात येईल. तरीहि टिकाकारांना हद्दपार केलंत तर काय होईल याची केवळ कल्पना केलीत तरी तुम्हाला आपली चूक कळून येईल.

आम्हाला (टिकोजींना) वगळा गतप्रभ झणी होतीलकी मासिकें" एकतर मासिकांत आजकाल एखादातरी टीका लेख हवाच त्याविना मासिकाला मारदस्तपणा येत नाही की दर्जाहि प्राप्त होत नाही. शिवाय टीकालेख म्हणजे जाहीरातीचं एक प्रमुख साधन. आतापावेतों कलाकार आणि टीकाकार भिन्न मानला जाई. कला कशाशीं खातात हें ज्याला कळत नाही. कलाकृति निर्माण करणे तर दूरच राहिले जो कलाकृति निर्माण करूं शकत नाही आणि अट्टाहासाने केलीच तर ती भिकार होते तो टीकाकार होतो. पण आताशा एकच व्यक्ति कलाकार आणि टीकाकार असा डबल रोल करते. आपण 'कांहीतरी' लिहायचं आणि त्याच्या समर्थनार्थ टीका लिहून साहित्यशास्त्रांत 'दुरूस्त्या' सुचवायच्या. माझी कलाकृति दुर्बोध आणि अश्लील आहे म्हणता काय! मग "दुर्बोधता आणि अश्लीलता हेंच आजच्या वाङमयाचें लक्षण आहे– वैशिष्ट्य आहे'. कारण! 'माझी कलाकृति पाहा' काय म्हणता "माझ्या कथेंत विकृत मनाचें दर्शन आढळतें!" "फ्राईड वाचा" असा हुकमे हुकुम जवाब दिला जातो. म्हणून आता टीकाकारांना हद्दपार केल तर कलाकारांची जातहि नष्ट होईल. आणि मग आपल्या जीवनातून कला आणि हास्यहि हद्दपार होतील. म्हणून सांगतो. A hen is only an eggs way of making another egg."

टीकाकार गेले– की भाषेचें सामर्थ्यहि हरपेल म्हणून समजावे. टिकाकारांनी नवीन जोरकस अर्थवाही (दुर्बोध!) शद्बांची मोलाची भर भाषेंत टाकली आहे. 'सृजनशील आविष्कारात्मक अभिव्यक्ति' 'प्रगमनशील पृथगात्मतेतून अनंताच्या पलिकडे महानिर्वाण करणारी अस्मिता'. कळत नाही असं म्हणाल तर तुमचं अज्ञान दिसेल. टीकेची भाषा ही अशीच असते. 'सत्यं शिवं सुंदरम्' 'Truth is beauty' पण सत्य हें सुंदर असतंच असं नाही. सौंदर्य पवित्र असेलच अशी हमी नाही. आणि पवित्र सत्यच असेल असा भरवसा तर नाहिच नाही. सुंदर गणिका पवित्र मानायची. शेंदूर फासलेला दगड हा दगडच आहे हें दिसत असूनहि त्याला देव म्हणून सत्यालाप करायचा, की घाणीने बरबटलेलें जविन सत्य आहे म्हणून सुंदर मानायचे ? असे आणि यागत अनेक मंतक शद्ब आज टीकाशास्त्रांत रूढ होताहेत. त्यामुळे आपली किती करमणूक होते. गडकऱ्यांचा गोकूळ भाषेंत जोर येण्याकरिता सर्रास कोर्टातील भाषा वापरतो. कैफियत, फैसला जाचमुचलका, हुकुमनामा, पंचनामा. तसाच माझा एक मित्रहि टीकासाहित्यातील निवडक शद्ब (अर्थ न कळता) ठोकून देत असतो.

'अनुभूतीच्या प्रक्रीयेतून प्रत्ययाला येणारा सृजनात्मक भावनेची प्रगल्भता, मन: कल्पाच्या जाणीवेच्या नेणीवेतून अविष्कृत होणारी प्रतिमा सौंदर्याच्या प्रस्फुरणांनी शिवशिवणारी वस्तुनिष्ठ निर्माणक्षमता येथे समाजाभिमुख झाली आहे." तुम्ही त्याची कींव कराल पण त्यानें हें सर्व शब्द टीकाशास्त्रातून वेचले आहेत आणि वरील शब्दांचा नेमका अर्थ किती टीकाकारांना माहीत असेल याबद्दल तो बराच सांशक आहे. टीकाकारांना हद्दपार केलंत तर या आनंदाला, या भाषाप्रभुत्वाला आपण मुकणार की नाही बोला.

टीकावाङमयांत आजकाल पैसे मिळविण्याचं हुकमी साधन म्हणून शाळाकॉलेजांना नेमलेल्या पुस्तकांवरील मार्गदर्शनात्मक टिपणें आणि रसोद्ग्राही समीक्षणें लिहिली जात आहे. कस्तुरी समवेत भृंगांचा थवाहि तोलून देणारा देतो, आणि घेणाराहि मुकाट घेतो हें वैभवाचे लक्षण मानले जात असेल तर न समजता टीका लिहणारा लिहितो. अभ्यासू विद्यार्थी डोळे मिटून घेतो हेंहि समृद्धीचें (दिवाळखोरीचें!) लक्षण कां मानू नये. माझ्या मित्राने 'फुलांची ओंजळ' या काव्यसंग्रहाकरितां रसोद्ग्राही विवेचन लिहिलें आहे. गंमत म्हणून त्यांतील कांही भयंकर उतारे पहा.

१) 'केशवसुताच्या काव्याहून हें काव्य अगदी भिन्न-अगदी अस्पर्श होते, असे मुळीच नाही.'

२) 'य...तिच्या निळया सारणीतून मोत्याचे पाणी वाहत होतें [कमळा]

३) 'अतिप्रसंग-असला तरी लैंगिकता नाही. तारुण्याच्या उन्मादाचें चित्रण असलें तरी लिंगाकर्षण नाही.' (म्हणजे नेमके काय!)

आहे की नाही करमणूक ?

राव चिडू नका. हसा. नाहीच कांही तर टीका ग्रंथांना झोप येण्याकरिता रामबाण उपाय म्हणून वापरा. अर्थशून्य, डोक्यावरून जाणारें विवेचन वाचून तुम्ही जडमूढ व्हायला हो काय उशीर !

स्त्री जातीवर खुशाल विश्वास ठेवा. घोड्यावरील शीलालेख अगर जगांतील कोणतीहि गोष्ट खरी माना पण टिकोजीवर विश्वास ठेवूं नका. 'लंगडं ते लंगडं अन् गांवदरी चरेना' म्हणून त्याला हिणवा. एकपरी लंगडा असून दुसऱ्याला शिकावणारा ठकबा म्हणा त्याला. पण त्याला हद्दपार करून या आनंदाच्या घबडाला मुकू नका.

कल्पना म्हणून ठीक पण महंमद तुघलका-प्रमाणें टीकाकाराच्या कल्पना थोड्या काळापुढे असल्या म्हणून त्याला काय एकदम हद्दपार करायचं ?

२ फ्रॉईड जन्माला आलाच नसता तर....

'नातरी आता सर्व चुकाचें पत्र घेईजे' असें आश्वासन फ्रॉईडसाहेबाने ललित साहित्यिकांना दिलेलें आहे. कल्पनेंत जग, स्वप्न, मनोराज्य करा, हाच तुमच्या ललित वाङमयाचा कच्चा माल होय. ते कांहीच्या बाही असेना का. त्याच्या समर्थनासाठी फ्रॉईड देवासारखा उभा आहे

"यदायदस्य अधर्मस्य तम तिष्ठानि लेखक"— फ्राईडचे ग्रंथ म्हणजे बायबल म्हणून वापरा की दुनियेंत मग "मन अशुद्ध तुझं गोष्ट हाये पृथ्वी मोलाची—तूं चाल पुढं तुला रे गड्या भीति कशाची अन् पर्वाही कुनाची' ! काय छाती आहे कुणाची की तुमच्या कलाकृतीला कोणी अवास्तव म्हणेल –अश्लील म्हणेल !

"विकृति अश्लीलता आणि दुर्बोधता हींच आजच्या युगाची वैशिष्ट्यें!" कुणी आक्षेप घेतला तर त्याला फ्रॉईडची पारायणें करायला सांगा. त्याच्या डोक्यांतील भूत नाहीसं होईल.

नवकवि, नवकथालेखक यांची किती सोय केली आहे फ्रॉईडने याची तुम्हाला कल्पना नसेल म्हणून तुम्ही म्हणताय फ्रॉईड जन्माला आलाच नसता तर ! -- त्याच्या संप्रदायांतील या ' वारकऱ्यांना ' विचारा बरं !

' माणसाचं मन म्हणजे गोठलेला समुद्र ' वरवर तुमच मन कितीहि शुद्ध दाखवा तळाशीं किती पापं आहेत याचा तुम्हाला उलगडा नाही व्हायचा. Unconscious सुप्त Subcon—scious मनातील नेणीवेला जाणीवपूर्वक प्रगट करणें हा बाणा नवकवींचा असतो. आमच्या मनातला 'जिप्सी' धुक्यांत आम्ही कोरीत बसतो. गुपित मनांतील थरथरणारे' 'वर्गमुळांत उणे एक' असलेल्या या सुप्त शक्तीला आविष्कृत करणें हाच नवकवींचा धर्म आहे. "Genuinepoetr y can communicate before it is understood' ही अबोध मनाची आंदोलनं आहेत. मुक्तिबोध, करंदीकरांची कविता वाचा. अबोधमनाच्या विकृत व्यापारासंबंधी गाडगीळांचा कथांतून असंख्य पुरावे काढता येतील. फ्रॉईडच्या Ego आणि तुम्हाला कळला नाही त्याची स्वप्नमीमांसा, चुकांचे मानसशास्त्र, (errors) आणि कल्पना--साहचर्याची चर्चा (Association of ideas) इत्यादि कळलं नाही तो काय माणूस आहे! असा मनुष्य लेखक तर नाहीच नाही. मानसिक प्रक्रि - यांच्या विश्लेषणाची (Analysis) सूक्ष्मता आजच्या ललित साहित्यांत दिसते. प्रेमाची प्रवृत्ति (Instinct) सहज असून सर्वजात आहे.स्ववंश--वृद्धि आणि स्ववंशरक्षण या मूत्र लैंगिक(Sexual) प्रवृत्तींतुनच जगनिर्मिति आणि त्याचा विकास झाला आहे.

फ्रॉईड म्हणतो सहजप्रवृत्ति दाबल्या (repression) तर विकृति निर्माण होते. आजच्या ललित साहित्याला प्रेमाशिवाय विषय नाही.' 'काव्य स्त्रैण आहे' असे टीकाकार म्हणतात त्यांना माहीत असायला हवं हें. प्रो. फडके मानसशास्त्रतज्ञ आहेत आणि रेग्यांसारख्या अनेकांचा फ्राईडच्या लैंगिकमीमांसेचा खूप सखोल अभ्यास आहे.

रेग्यांचं 'मस्ती पुराण' आणि गाडगीळांचा 'उंट आणि लवक' त्याविना कळायचा नाही.

महाशय जगांत येतांना तुम्ही तसेंच आलांत नंतर तुम्हाला कपडे घालण्यांत आले. वास्तवतेकडे सत्याकडे जायचं असेल तर 'निसर्गाच्या हांकेला' ओ द्या. कृत्रिम सर्व झूट आहे. 'सूर्य मारतो टांग-' अशा सारखं वास्तव वर्णन असावं. हें सर्व नकळता तुम्ही म्हणता फ्राईडचा जन्म झाला नसता तर-- नव्या युगाचा उद्गाता निर्माण झाला नसता तर आज नव्यायुगाचे गीत कवींना स्फुरलें नसते आणि कथाकारांनी ते निवेदन केलें नसते. टीकाकारांना त्याचे विश्लेशणीहि शक्य झाले नसते आणि तरीहि ओरड आहे "आजचं वाङमय पलायनवादी आहे. कल्पनारम्य--स्वप्नाळू आहे. प्रतीकात्मक आहे म्हणून दुर्बोध आहे."

माणसाला जगायचं असलेल्यां यंत्रयुगातील वैषम्यांतहि समाधान मिळवायचं असेल तर स्वप्नाविना काय गति आहे बरं ! फडक्यांचं प्रतिमा-साधन वाचा आणि ललितकलेचा जन्म कशासाठी झाला ते समजून घ्या ! ज्या वास्तवजगांत कल्पनाहि करणं पाप आहे. किंबहुना तसं कांहीं केलं तर मलताच 'प्रसाद' मिळेल. त्या सर्व सुखांचा वाटा स्वप्नांतच माणसाला मिळतो तें कळायला विश्लेषणाची आवश्यकता असते.त्यांतील गर्भितार्थ कळायला फ्रॉईडचेंच डोळे हवेत.

' शब्दे वीण संवादिजे पण इंद्रिया जाणता नेणता नाही' भोगिजे' फ्रॉईड जन्मालाच आला नसता तर हें स्वप्नांतसुद्धा कल्पणें शक्य नाही. आत्याबाईला मिशा असत्या तर ! आता काकालाच मिशा नाहीत तेव्हां त्यांनाच आत्या--बाई म्हणावं काय हा प्रश्न आहे. म्हणून म्हणतो ती कल्पना सुद्धा नको.

सामाजिक श्रुतिनाटय

वैराचं विष !

जेलर—ही एका मानी मताच्या मर्द मराठयाची कहाणी आहे. आणि ती तुम्हाला एका जेलरकडून ऐकायला मिळत आहे ! माझ्या तीस वर्षांच्या कारकिर्दीत माझ्या हाताखालून अनेक कैदी गेले, पण तो एकच कैदी असा होता की ज्याची आठवण जीवांत जीव असेपर्यंत मी विसरूं शकणार नाही. त्या कैद्याचं नांव दत्ताजी शिंदे !

[मतारीचे करुणगंभीर स्वर विषण्ण शांततेच्या पार्श्वभूमीवर लय छेडीत आहेत. त्या स्वरापेक्षाहि हृदय पिटवून टाकणारा असा दत्ताजी शिंद्याचा विषण्ण आणि विव्हळ आवाज कुठल्या तरी खोल विहिरीच्या तळापासून आल्यासारखा वाटतो. ते अभंग म्हणत आहेत.]

दत्ताजी —सदा माझे डोळा, जडो तुझी मूर्ति
रखुमाईच्या पति सोयरिया
गोड तुझें रूप, गोड तुझें नाम
देई मज प्रेम सर्व काळ
विठू माउलीये हाचि—

(वर कर्रर्ऽऽ असा आवाज होतो.)

दत्ताजी—(थांबून) कोण आहे ? (थांबून) कोण जेलरसाहेब ?

जेलर—होय मीच ! या अंधार कोठडीच्या गडद अंधारांतहि तूं मला बरोबर ओळखलंस दत्ताजी !

दत्ताजी—(विषण्णपणानं हसून) गेल्या पंधरा दिवसांत या अंधाराची मला चांगलीच सवय झाली आहे, जेलरसाहेब......

जेलर—हं ! ते पंधरा दिवस संपले. आता फक्त एकच दिवस राहिला आहे. तुझ्या फाशीचा दिवस उद्याच आहे हें माहीत आहे ना तुला दत्ताजी ?

दत्ताजी—(शांत आवाजांत) होय साहेब ! मी उद्याच्याच दिवसाची वाट पाहात आहे. आपण त्या गोष्टीची आठवण देण्यासाठी इथपर्यंत येण्याची तसदी निष्कारण घेतलीत साहेब !

जेलर—मी तुला केवळ आठवण देण्यासाठी आलों नाही दत्ताजी ! मला तुझ्याशीं कांही बोलायचं आहे. आजपर्यंत या कोठडींत फाशीचे अनेक कैदी येऊन गेले. पण तुझ्यासारखा एक प्रतिष्ठित आणि घरंदाज माणूस आज पहिल्याप्रथमच येतो आहे. दत्ताजी, तुझ्या खटल्याची हकीकत मला कळली आणि मला अतिशय आश्चर्य वाटलं. कोर्टांत तूं आपला गुन्हा तावडतोब कबूल केलास. फाशीची शिक्षा आपल्या तोंडानं मागून घेतलीस. आणि पुढें कांही एक बोलण्याचं नाकारलंस. वकीलांनी कित्येक प्रश्न विचारले, पण तूं एकाचंहि उत्तर दिलं नाहीस आणि अखेर तुझी फाशीची शिक्षा जाहीर झाली. तरी देखील तुझ्या तोंडून एक शब्दहि बाहेर पडला नाही. हें झालं. पण दत्ताजी, तूं हा खून कां करावास ? तुझ्यासारख्या एका विचारी आणि समंजस माणसानं खुनासारखं एक भयंकर कृत्य काय म्हणून करावं हें मात्र मला अजूनहि समजलेलं नाही.

दत्ताजी—(थरारत्या आवाजांत एक एक शब्द उच्चारीत) मी खून कां केला ? माझ्या हातून खुनासारखं एक भयंकर कृत्य कां घडलं ? जेलसाहेब, हा प्रश्न कोर्टांत मला साऱ्या लोकांनी विचारला. पण मी त्याचं उत्तर देऊं शकलों नाही. मला उत्तर देण्याची इच्छा नव्हती आणि अजूनहि नाही. पण आज माझ्या आयुष्याचा शेवटचा दिवस आहे. आज मला ही हकीगत कुणाला तरी सांगितलीच पाहिजे. ही हकीकत न सांगतां जर मी फाशी गेलों तर जग म्हणेल की दत्ताजी शिंदे पापी होता. उलटया काळजाचा राक्षस होता.

पण साहेब, माझ्या कुलस्वामिनीची शपथ घेऊन सांगतों की मी पापी नाही. उलटया काळजाचा नर

खासच नाही. माझ्या हातून खून झाला याचं कारण मी त्यावेळीं शुद्धीवर नव्हतों. मला विषाची बाधा झाली होती जेलरसाहेब.

जेलर—विषाची बाधा ? म्हणजे तूं सांगतोस तरी काय, दत्ताजी ?

दत्ताजी—(सुस्कारा सोडून) तें सारं पहिल्या-पासून सांगायला पाहिजे साहेब. (क्षणभर थांबतो) माझ्या हातून असलं भयंकर कृत्य होईल याची मला दोन महिन्यांपूर्वी कल्पना देखील नव्हती.—दोन महिन्यांपूर्वी.

दत्ताजी--(घाईघाईनें प्रवेश करीत) कौसल्या, ए कौसल्या, अग तुझा स्वयंपाक झाला की नाही अजून ?

कौशल्या--(लटक्या रागानं) हें काय धनी. असं नांव घेऊन हाक मारणं बरं दिसतं वाटतं या वयांत ?

दत्ताजी--ह्या वयांत ? (मोठ्याने हसून) म्हणजे मला काय पन्नास पंचावन्न वर्षांचा म्हातारा समजलीस की काय तूं ? अग, अजून पस्तिशी देखील उलटली नाही माझी आणि तुला देखील एक मूल झालं नाही, तोंच एवढं वैराग्य आलं वाटतं ?

कौसल्या—तसं नाही. पण हाक मारण्याला तरी कांही सुमार ? किती मोठ्याने हाक मारायचं तें !

दत्ताजी—राहूं दे ग ! घरांत ऐकायला तरी कोण आहे तुझ्या अन् माझ्याशिवाय ? जाई तर गेली असेल बाहेर खेळायला. बरं तें राहूं दे. मला आधी वाढ पाहूं. दहाच्या मोटारने मला कऱ्हाडला जायचंय !

कौसल्या--कऱ्हाडला ? आज कसलं काम काढलंय ?

दत्ताजी--काम नवीन कसलं असायचं ? आज कोर्टाची तारीख आहे ना ?

कौसल्या--पुरे झाल्या बाई त्या कोर्ट अन् कचेऱ्या ! या कोर्टाच्या पायीं आजपर्यंत हजारो रुपयांची धूळधाण करून घेतलीत. अजून तो तुमचा नाद कसा सुटत नाही कोण जाणें ?

दत्ताजी--हा नाद नाही कौसल्या–हा आपल्या घराण्याच्या अब्रूचा प्रश्न आहे. आपलं आणि जाधवांचं वैर गेल्या नऊ पिढ्यांपासून चालत आलेलं आहे. आज इतक्या वर्षांचा पीळ आहे तो ! तो काय सहजासहजीं उकलणार आहे ? सुंभ जळला तरी त्याचा पीळ जळत नाही कौसल्या...

कौसल्या—पण मी म्हणतें, जें झालं तें गेलं. आपल्या पूर्वजांनी जें करायला नको तें केलं. पण तीच चूक आपण पुढे काय म्हणून चालवावयाची ? रघुनाथ-राव जाधवांशी वैरभाव धरण्याइतका त्यांनी आपला गुन्हा तरी काय केलाय ?

दत्ताजी—कौसल्या, हें पुरुषाचं राजकारण आहे. तें तुला कधीच कळायचं नाही. रघुनाथ जाधवानं काय केलं हा आजचा प्रश्न नाही. पण त्याच्या वाडवडिलांनी जें करून ठेवलं त्याचा जाब त्यानं दिलाच पाहिजे ! त्यांनी जें केलं तें यानं निस्तरलं पाहिजे.

कौसल्या—पण धनी, हें असलं प्राणघेऊं वैर चालायचं तरी किती दिवस ?

दत्ताजी—किती दिवस ? (खेदाने हसून) किती वर्षं तें विचार कौसल्या ! कदाचित् जगाच्या अंता-पर्यंत देखील चालेल. कदाचित् आमच्या दोघांपैकी कुणाचा तरी खून झाला तर आमच्याबरोबर तेंहि संपेल.

कौसल्या--(ओरडून) धनी ! असलं कांहीतरी अभद्र बोलूं नये गडे.

दत्ताजी—ह्यांत अभद्र काय आहे कौसल्या ? घराण्याच्या इभ्रतीसाठी आजपर्यंत आमच्या कित्येक पूर्वजांचे बळी पडले आहेत. त्यांत आणखी एकाची भर पडली म्हणून बिघडलं कुठं ?

कौशल्या--मी तुमच्या पायां पडतें ! तुमच्यापुढे पदर पसरतें, पण तुम्ही कृपा करून हे विचार आपल्या मनांतून काढून टाका. असल्या भयंकर कल्पना मनांत देखील आणूं नका.

दत्ताजी—(हसून) कौसल्या, किती वेडी आहेस तूं ! अग मनांतून काढून टाकायला विचार आणि कल्पना म्हणजे काय मेंढरांचा कळप आहे ? जोपर्यंत आमचे मेंदू शाबूत आहेत तोपर्यंत वैराचे विचार आम-च्या डोक्यांतून जाणं कधीहि शक्य नाही. काटा फार खोलवर रुतला तर त्याच्या आजूबाजूची जागा सडूं लागते आणि मग तिथं विष तयार होतं कौसल्या ! हें

विष गेल्या नऊ पिढ्यांपासून आम्ही अंतःकरणांत बाळगीत आलों आहोंत. आणि तुला विषाबद्दल एक गोष्ट माहीत नाही. तें जितकं जुनं होत जातं तितका त्याचा जहालपणा वाढत जातो.

कौसल्या—पुरे बाई. असलं कांही बोलूं लागलांत म्हणजे माझ्या काळजाचा थरकाप होतो.

दत्ताजी—(हसून) हं भित्री कुठली ! असले उद्‌गार शिंद्यांच्या तोंडीं शोभत नाहीत.

कौसल्या—न शोभोत बिचारे ! तुम्हा पुरुषांच्या इतकं आमचं काळीज कठोर नसतं. म्हणूनच जग सुरळीतपणानं चाललेलं आहे. नाहीतर यापूर्वीच जगाची धूळधाण झाली असती. धनी, मला अजूनहि असंच वाटतं की शिंद्यांच्या आणि जाधवांच्या घराण्यांत समेट झाला तर--

दत्ताजी--(एकदम) मूर्खासारखं कांहीतरी बडबडूं नकोस. आमच्यांत समेट होणं कधीहि शक्य नाही. आज वर्षानुवर्षे आम्ही या वैराची जोपासना केली तें काय एक होण्यासाठी ? अस्सल जातकुळीचा मराठा मोडेल पण वाकणार नाही, हें तूं लक्षांत ठेव कौसल्या.

कौसल्या--पुरे झालं तें ! ताट वाढून ठेवलंय तिकडे लक्ष तरी आहे कां तुमचं ! हं करा सुरवात.

दत्ताजी--(शांत होत) बरं जाऊं दे ! तूं पण हा विषय पुन्हा काढूं नकोस. अग पण तूं माझं एकट्याचं ताट वाढलंस ? जाई कुठे आहे ? तिला सोडून मी एकटाच कसा जेवूं ?

कौसल्या—ती गेली आहे खेळायला जाधवांच्याकडे (एकदम दचकून) नाही नाही !

दत्ताजी—(ओरडून) काय म्हणालीस ? (एकदम पुढचं ताट फेकून देतो.) बोलाव ! आधी बोलाव त्या कार्टीला. तिला बजावून सांगितलं तरी पुन्हा का गेली ती तिकडे ?

कौसल्या—(असहायतेनं) मी किती तरी सांगितलं तिला. पण ती माझं ऐकतच नाही, त्याला मी तरी काय करूं ?

दत्ताजी—(संतापानं) तुझं ऐकत नाही तर तूं

किंचित्—काव्य

सत्यासत्य !

जगीं आम्ही मानूं
सत्य, जें दिसे नेत्राला;
असत्य तें आम्ही मानूं
न दिसे जें नेत्राला;
असत्य परलोक नव्हे का
आक्रमिता या व्याख्येला ?
दृश्य जगाला अवहेलुनि
परि
परलोकाची इच्छा कां ?

—भास्कर लांबे

तिची आई झालीस तरी कशाला ? आण आधी बोलावून तिला.

कौसल्या—(घाबरून) आणतें. पण...पण तुम्ही असे संतापूं नका. (दारापाशीं जाऊन हाक मारते) जाई ! जाई !

[जाई (वय सुमारें दहा) 'ओ' देऊन धावतच येते. आंत येऊन विचारते "काय आई ?"]

दत्ताजी—(संतापानं ओरडून) जाई, कुठं गेली होतीस ?

जाई—(घाबरून) मी-मी रघुनाथकाकांच्याकडे गेले होतें !

दत्ताजी--(ओरडून) रघुनाथकाका ? तुला किती वेळां सांगितलं की तो तुझा काका नाही, सात जन्माचा वैरी आहे तो.

कौसल्या--पण हें तिला लेकराला काय कळणार ?

दत्ताजी--तूं मधे बोलूं नकोस ! तुझ्या लाडाचा परिणाम आहे हा. जाई, तुला बजावून ठेवतों, तूं जर पुन्हा जाधवांच्या घरीं गेलीस तर तुझा वेदम फोडून काढीन, तुझं हाड अन् हाड वेगळं केल्याखेरीज राहणार नाही लक्षांत ठेव.

कौसल्या—हें काय मेलं अघोरी संतापणं ! पुढचं ताटदेखील उधळून दिलंत तें. शुभअशुभाचा थोडा तरी विचार करावा माणसानं.

दत्ताजी—(एकदम् शांत होत) कौसल्या ! मला क्षमा कर. संतापानं अंतःकरणांत पेट घेतला म्हणजे मला कशाचंहि भान रहात नाही. अगदी वेड्यासारखं होऊन जातं मला. आण तें ताट इकडे जाई. ये बाळ, तूं पण जेवतेस ना ? माझ्याबरोबर ?

जाई—पण बाबा, तुम्ही रागावलांत ना माझ्यावर ?

दत्ताजी—(हसण्याचा प्रयत्न करीत) वेडी कुठली ! तुझा बाबा तुझ्यावर कधी कायमचा रागावेल कां पोरी ? जाई, तूं मला फार फार आवडतेस. पण तूं असं वेड्यासारखं केलंस की मग माझ्या रागाला सुमार रहात नाही. तूं काय वाटेल तें केलंस तरी चालेल, पण पुन्हा जाधवांच्या घरांत पाऊल ठेवायचं नाही. समजलं ना ?

जाई—होय बाबा. मी पुन्हा कधीहि जाणार नाही तिकडे. त्यांच्या सर्जानं कितीहि बोलावलं तरी देखील मी जाणार नाही. पण बाबा, मग तर तुम्ही माझ्यावर रागावणार नाही ना ?

दत्ताजी—(हसून) वेडी पोर ! तुला रागवण्यांत मला सुख होतं असं कां वाटतं तुला जाई ? अग मी संतापून बोलतों त्याच वेळीं माझ्याहि काळजावर चाबकाचे फटकारे बसत असतात. चल ये. बैस इथं. हं चल आटप. कौसल्या लवकर वाढ आम्हाला. मोटारीची वेळ होत आली.

[द्रुत पार्श्वसंगीत]

दत्ताजी—(निवेदनाच्या स्वरांत) कऱ्हाडच्या कोर्टांतला त्या दिवशींचा आमचा खटला मोठा जिकीरीचा होता. या खटल्याचा निकाल ज्याच्या विरुद्ध जाईल त्याच्या सर्वस्वाचं वाटोळं होणार होतं. मी कौसल्येला त्याची कल्पना दिली नव्हती. माझी उरली सुरली जमीन गहाण टाकून मी वकीलासाठी आणि कोर्टासाठीं पैसा उभा केला आणि माझ्या आयुष्याच्या जुगारांतला शेवटचा डाव खेळण्याचं ठरवलं. (कांही क्षण थांबून) त्या दिवशीं मोटारींत माझी आणि रघुनाथ जाधवाची गाठ पडली. मला पहातांच हेटाळणीच्या स्वरांत मला उद्देशून आपल्या साथीदारांना तो म्हणाला...

रघुनाथ—(छद्मीपणानं हसून) काय रे येशाबा, आजपर्यंत एवढ्या वेळां कंवरडं गेलं पण शिंदेसरकारची दोन हात करण्याची खुमखुमी मात्र अजूनहि जिरली नाही अं !

दत्ताजी—(निवेदनाच्या स्वरांत) मला त्याचं बोलणं सहन झालं नाही. मीहि पण तितक्याच जोरानं उत्तर दिलं—मनगटांत जोर आहे तोंपर्यंत लढत रहाणं हें शिंद्यांचं ब्रीद आहे समजलांत ?

रघुनाथ—(उपहासाने) अस्सं ! आणि मनगटांत बांगड्या भरल्या गेल्यानंतर मग फक्त तोंडांतच जोर राहील असं दिसतंय ! (तो आणि त्याचे साथीदार मोठ्याने हसतात.) बाकी शिंद्यांचं ब्रीद हें मात्र खरं हं ! अहो, उगीच कां कोणी घरंदारं गहाण टाकून वकीलाची अन् कोर्टाची धन करील ?

दत्ताजी—(त्वेषानें) नुसती घरंदारंच गहाण टाकलीं आहेत मी ! गावच्या पाटलाकडे बायको गहाण टाकली नाही.

रघुनाथ—(ओरडून) दत्ताजी ! जरा तोंड संभाळून बोला.

दत्ताजी—आणि रघुनाथराव, तुम्ही पण जरा जिभेला लगाम घालून ठेवा. चार साथीदार बरोबर असले म्हणजे नायकिणीदेखील जीभ सोडून बोलतात. खरे मर्द असाल तर एकटे मैदानांत उतरा, मग या दत्ताजी शिंद्याच्या मनगटाचा हिसका पहायला मिळेल.

रघुनाथ—ठीक आहे. आज कोर्टात काय होतंय् तें दिसेलच. निकाल लागला म्हणजे मग मात्र तोंड लपवून बसूं नका म्हणजे झालं. (कुत्सितपणानं हसतो.)

दत्ताजी—निवेदनाच्या स्वरांत रघुनाथ जाधव कशाच्या जोरावर बोलत होता हें मला माहीत होतं. पैशाच्या जोरावर त्यानं सगळ्या खटल्याची उभारणी केली होती. त्याच्या जोरावरच त्याच्या तोंडून अशी उद्दामपणाची भाषा बाहेर पडत होती. (शांत आवाजांत) आणि अखेर त्याच्याच जोरावर त्याने खटला जिंकला ! मला हार खावी लागली. खटल्याचा निकाल ऐकला

त्या वेळीं माझ्या डोळ्यासमोर अंधारी आली. मी टाकलेल्या जुगाराचं दान उलटं पडलं होतं. त्यांत मी माझं सर्वस्व गमावून बसलों. पुरता भिकारी झालों. आता रघुनाथ जाधव मला डिवचण्याची संधि कधीहि सोडणार नाही याची मला कल्पना होती. आणि तसंच झालं. संध्याकाळीं त्याची आणि माझी पुन्हा गाठ पडली.

रघुनाथ जाधव—(कुत्सितपणानं हसून आपल्या साथीदारास) बाकी येशावा, शिंद्यांच्या मनगटांतलं पाणी पाहिलंस ना? आता उद्या सावकारानं दारांत बेलीफ आणून उभा केला आणि मनगटांत वेडचा पडल्या म्हणजे त्या पाण्याला असें कांही तेज येईल कीं विचारूं नकोस. (मोठ्यानें हंसत) अरे येशावा, त्या शूरळाला म्हणावं असे कितीतरी शिंदे मी टाचेखाली चिरडून टाकले आहेत, समजलास?

दत्ताजी—(निवेदन) संतापानं माझ्या अंगाची लाही लाही झाली. रघुनाथच्या नरडीचा घोट घ्यावा असं मला वाटूं लागलं. पण मी एकटाच होतों त्यामुळे मला कांहीहि करतां आलं नाही. मनांतल्या मनांत संताप दाबून टाकीत मी गप्प राहिलों. दुसरा दिवस उजाडला. माझ्या बेअब्रूची वार्ता साऱ्या गावांत पसरली. मला बाहेर तोंड काढणं अशक्य झालं. रघुनाथ जाधव एवढ्यावरच थांबला नाही. त्यानं सावकाराला चिथावून माझ्या घरावर जप्ती आणण्याचं कारस्थान केलं. दारांत बेलीफ येऊन उभा राहिला आणि भांडीकुंडीं बाहेर काढलीं जाऊं लागलीं. त्या वेळीं कौसल्या आश्चर्यानें वेडी झाली. तिनं धावरून विचारलं…

कौसल्या—धनी–धनी. हें सारं काय चाललंय्? आपल्या घरांतलं सारं सामान कुठे नेत आहेत हे लोक?

दत्ताजी—(दुःखानें) कौसल्या, या घरावरची आणि या सामानावरची आपली मालकी आता संपली.

कौशल्या—(ओरडून) मालकी संपली? तें काय म्हणून? नाही…नाही! मी माझं सामान जाऊं देणार नाही. धनी, तुम्ही शुद्धीवर आहांत कां? हें सारं उघड्या डोळ्यानं पहात राहिलांत तुम्ही? तुम्हाला झालं तरी काय?

दत्ताजी—(खिन्नपणें) कौसल्या, मला कांहीही झालं नाही. जें काय होणार होतं तें यापूर्वीच होऊन गेलं. आता हें सारं शांतपणें पहात बसण्याखेरीज आपल्या हातांत कांहीच राहिलं नाही कौसल्या.

कौसल्या—(दीनपणानें) पण ही जप्ती कशासाठी आली आपल्यावर?

दत्ताजी—गेल्या तीस वर्षांत खटल्यासाठीं काढलेलं कर्ज माझ्या हातून आता फिटणं शक्य नाही म्हणून! कौसल्या, हें सारं मी तुझ्यापासून लपवून ठेवलं होतं–पण तें आज सांगण्याची वेळ आली. (शांत आवाजांत) चल! ऊठ! जाई कुठं गेली असेल तिला बोलावून आण. या सामानाचा लिलाव होण्यापूर्वीच आपण इथून जाऊं या.

कौसल्या—(हुंदके देत) चला जाऊं या. अरेरे! परमेश्वरा! हा कसला दिवस दाखवलास तूं आज?

दत्ताजी—(निवेदन) आणि अंगावरच्या वस्त्रानिशीं आम्ही घराच्या बाहेर पडलों. गावांत आमच्या नात्याचं कुणीच नव्हतं आणि जिवाभावाचं तर कोणीच नव्हतं. कारण सारा गाव रघुनाथ जाधवाचा होता. त्याच्या पैशाचा मिंधा होता. गावच्या मारुतीच्या देवळाच्या आडोशाला आम्ही जाऊन बसलों. त्या वेळीं माझ्या लक्षांत आलं कीं जाई कालपासून उपाशी आहे.

जाई—आई, मला भूक लागली. कांही तरी खायला दे ना ग आई.

कौसल्या—देते हं. थोडा वेळ दम धर. आज आपण इथेंच स्वयंपाक करूं हं.

(तिला हुंदका आवरत नाही.)

जाई—आई तूं रडतेस?

कौसल्या—(बळेंच हसून) कोण मी? वेडी कां आहेस तूं जाई!

जाई—पण आई इथें स्वयंपाक करायला भांडीं कुठे आहेत गऽ?

कौसल्या—आणूं हं बाळ आपण सारं. आता सांगतें मी त्यांना. तूं जरा बाहेर जाऊन खेळत बस बरं. ती जाते. दत्ताजीला तुम्ही माझं ऐकणार कां?

दत्ताजी—काय म्हणतेस?

कौसल्या—आताच्या आता नांदगावला दादाच्याकडे जा. त्याच्या कानावर ही सर्व हकीकत घाला आणि—

दत्ताजी— ओरडून नाही कौसल्या, मी येथे उपाशी मरेन पण कुणाच्या दारांत पाऊल ठेवणार नाही. प्राण गेला जरी मी दुसऱ्यापुढे पदर पसरणार नाही.

कौसल्या—मी तुमच्यासाठी म्हणत नाही. या लेकरासाठी म्हणतें. आणि तुम्ही दादाला उपकार म्हणून पैसे मागूं नका, कर्जाऊ पैसे मागा. आपण त्याचं कर्ज पुन्हा केव्हा तरी फेडून टाकूं. (काकुळतीनं) तुम्ही माझं ऐका. निदान आपल्या जाईसाठी तरी माझं ऐका.

दत्ताजी— (शांतपणानं) ठीक आहे. मी त्याच्या-कडून कर्ज म्हणून पैसे आणतों. पण नांदगांवहून यायला मला उद्याची दुपार होईल. आजची सारी रात्र काय तूं एकटीच या देवळांत काढणार ?

कौसल्या—नाहीं. माझ्या सोबतीला इथला म्हातारा पुजारी आहे. तुम्ही माझी काळजी करूं नका धनी. शिंद्यांच्या सुनेकडे वाकड्या नजरेनं पहाण्याची कुणाचीहि छाती नाही. तुम्ही ताबडतोब निघा आणि आणि गेल्या पावलीं परत या. मी डोळ्यांत प्राण आणून तुमची वाट बघत बसतें.

दत्ताजी--ठीक आहे ! मी निघतों. पण कौसल्या एक लक्षांत ठेव, मी येईपर्यंत कसा तरी दम काढ. पण कुणाच्यापुढे दीनपणानं हात पसरूं नकोस. समजलीस ?

कौसल्या—तसं जन्मांतरीं होणार नाही धनी. आजपर्यंत ज्या हातानं दान केलं ते हात भिकेसाठी पुढं होणं कधी तरी शक्य आहे का ? माझ्यावर विश्वास ठेवा. तुम्ही जा. जाऊन या लवकर.

दत्ताजी (निवेदनाच्या स्वरांत) उपाशीं पोटीं चौदा कोसांची वाट तुडवीत मी नांदगांवला जायला निघालों. अंगातलं सारं बळ एकवटून मी भराभर वाट कापीत होतों. मला जाऊन ताबडतोब परत यायला पाहिजे होतं. जाईचा भुकेला केविलवाणा चेहरा माझ्यासमोर होता. कौसल्या देवळांत एकटीच आहे याची जाणीव मला टोचत होती. जीवापाड श्रम करून मी नांदगांवपर्यंत मजल मारली आणि तिथे जाऊन पोहोचलों त्या वेळीं मला कळलं की कौसल्येचा भाऊ बायकामुलांसह वऱ्हाडच्या जत्रेला गेला आहे. आणि आणि अजून दोन दिवसांपर्यंत परतण्याची शक्यता नव्हती. (कांही क्षण थांबून) हताश अंतःकरणानं आणि खचलेल्या पावलानं मी पुन्हां गांवची वाट चालण्यास सुरुवात केली. चौदा कोसांची भयानक वाटचाल करून मी गावाजवळ येऊन पोहोचलों. त्यावेळेस सूर्य माथ्या-वरून कलला होता. मी वेशींत पाऊल टाकलं तोंच समोरून कौसल्या धावत आली—

कौसल्या—(धावत येत धांपा टाकीत) धनी, धनी, एक तास झाला. जाईचा पत्ता नाही. माझा डोळा लागला तेवढ्यांत पोर कुठं गेली कुणास ठाऊक ? सारखी 'भूक, भूक' करत होती. तिला आधी शोधून आणा. तिच्या जिवाला कांहीतरी धोका आहे. कांही तरी धोका आहे धनी.

[भीषण पार्श्वसंगीताला सुरवात होते.]

दत्ताजी—(निवेदन) कौसल्येच्या त्या वाक्यानं माझ्या काळजांत आगीचा डोंब उसळला. मी धावतच रघुनाथ जाधवाच्या घराकडे गेलों. रघुनाथ दारांतच उभा होता. मला पहातांच तो हेटाळणीच्या स्वरांत म्हणाला--

रघुनाथ—या शिंदे सरकार ! आज काय नवीन हुकूम आणलांत बोला !

दत्ताजी--(धांपा टाकीत) रघुनाथ ! माझी पोरगी कुठे आहे ? (ओरडून) माझी जाई कुठे आहे रघुनाथ ?

रघुनाथ--(उपरोधानं) हो, हो जरा सबुरीनं घ्या मालक. एवढी काय गडबड आहे ?

दत्ताजी—माझ्या सहनशक्तीचा अंत पाहूं नकोस. रघुनाथ, माझी जाई कुठे आहे तें सांग आधी.

रघुनाथ--(उपहासानं) तुमची पोरगी पाहिजे आहे काय तुम्हाला ? (एकदम दार उघडल्याचा आवाज होतो) ही घ्या तुमची पोरगी.

दत्ताजी--(निवेदन) त्यानं दार उघडलं. माझ्या डोळ्यावर माझा विश्वास बसेना. जाई त्याच्या दारांत शिळ्या भाकरीचे तुकडे खात बसली होती.

रघुनाथ—(उपरोधानं हसून) म्हटलं ऐन दुप-रच्या वेळीं भिकाऱ्याची पोर दारांत आली. त्यांतून पुन्हा दोन दिवसांची उपाशी. तिला उपाशी कसं वरं जाऊं द्यावं. अहो, भिकाऱ्याची झाली म्हणून काय झालं ? (मोठ्याने हसतो) [रघुनाथ मोठमो-

अनुक्रमणिका

ठयाने हसू लागतो. पार्श्वसंगीताची तीव्रता वाढत जाते. त्याच्या पार्श्वभूमीवर पांच सहा जणांचे हास्याचे आवाज मोठयामोठयाने ऐकूं येऊं लागतात.. "भिकाऱ्याची पोर"—"भिकाऱ्याची पोर" या शब्दागणिक हास्याचे स्फोट आणि संगीताची भयानकता वाढत जाते—दत्ताजी "जाई !" म्हणून ओरडतो. जाई एक मोठी किंकाळी फोडते आणि त्या पाठोपाठ धावत येणाऱ्या कौसल्येचा हृदयभेदक टाहो ऐकूं येतो. "धनी–धनी, हें तुम्ही काय केलंत !" आणि सारे आवाज एकदम् बंद होतात.]

दत्ताजी—(निवेदन) कांही वेळानंतर माझ्या लक्षांत आलं की त्वेषाच्या भरांत मी माझ्या लाडक्या जाईचा गळा दाबून प्राण घेतला होता. (सद्गदित स्वरांत) दोन दिवस भुकेलं असलेलं माझं चिमणं पांखरूं तडफडत तडफडत प्राण सोडून गेलं होतं. माझ्या अंगठयाचीं नखं तिचा कंठ फोडून आंत शिरलीं आणि त्यामुळे वाहाणाऱ्या रक्ताने तिच्या पदरांत असलेले भाकरीचे तुकडे माखले होते. जवळच कौसल्या बेशुद्ध होऊन पडली होती. जेलरसाहेब, त्या प्रसंगाला दोन महिने होऊन गेले. पण मला तो प्रसंग आज या क्षणी माझ्या समोर घडत असल्यासारखा वाटतो आहे. (थरथरत्या आवाजांत) या अंधार कोठडीच्या काळोखांत कानाकोपऱ्यांत त्या प्रसंगाची सारीं भुतं मला माझ्या नजरेसमोर दिसूं लागतात. [पुन्हा भीषण पार्श्वसंगीताला सुरुवात होते.] (विव्हलतेने) मी डोळे मिटून घेतले. कान गच्च दाबून धरले तरीहि ते आवाज माझा पिच्छा सोडत नाहीत. माझा सारखा पाठलाग करीत रहातात. सारखा पाठलाग करीत राहतात ! [भीषण आणि वेगमान संगीताच्या पार्श्वभूमीवर त्याला एक एक वाक्य ऐकूं येऊं लागतं.]

जाई—बाबा, तुम्ही माझ्यावर रागावलांत ? माझ्यावर रागावलांत तुम्ही ?

दत्ताजी—नाही ग पोरी, तुझा बाबा कधी तरी तुझ्यावर मनापासून रागावेल का ?

कौसल्या—(ताटाचा आवाज) धनी पुढलं ताट उधळून दिलंत. शुभाशुभाचा थोडा तरी विचार करावा माणसानं.

जाधव—त्याला म्हणावं, असे कितीतरी शिंदे मी टांचेखाली चिरडून काढले आहेत, उद्या दारांत बेलीफ येऊन उभा राहिला म्हणजे दिसेलच मनगटांतलं पाणी.

दत्ताजी—(ओरडून) रघुनाथ, तोंड सांभाळून बोल. खरा मर्द असशील तर मैदानांत एकटा उतर. मग दाखवतों तुला शिंद्याच्या मनगटांतील हिसका !

कौसल्या—धनी, हें-हें सारं काय चाललं आहे ? आपल्या घरांतलं सामान कुठे नेत आहेत हे लोक ? नाही. मी त्यांना आपलं सामान नेऊं देणार नाही. नेऊं देणार नाही. धनी, तुम्ही शुद्धीवर आहांत कां ?

जाई—आई, मला भूक लागली. कांहीतरी खायला दे ना आई ! आई, तूं रडतेस ? पण इथे स्वयंपाक करायला भांडीं कुठं आहेत ग आई ?

रघुनाथ—अहो, उगीच कां कोणी घरदार गहाण टाकून, वकीलाचं अन् कोर्टाचं धन करील ? (हसतो)

दत्ताजी—ठीक आहे. जातों मी. पण कौसल्या एक लक्षांत ठेव. मी येईपर्यंत कुणाच्याहि पुढं दीनपणानं हात पसरूं नकोस. समजलीस ?

जाई—आई, मला भूक लागली ग. मला भूक लागली ग आई ! आई, आतां उपाशी मरत्यें ग. मला चक्कर येते आहे. आई—आई—

दत्ताजी—(धापा टाकीत) रघुनाथ, माझी पोरगी कुठे आहे ? (ओरडून) माझी जाई कुठे आहे रघुनाथ ?

रघुनाथ (हंसून) म्हटलं भिकाऱ्याची पोर ऐन् दुपारच्या वेळीं दारांत आली. तिला उपाशी कसं जाऊं द्यावं (मोठयानें हसूं लागतो.) भिकाऱ्याची पोर ! भिकाऱ्याची पोर !!

दत्ताजी—(ओरडून) जाई ! (जाई किंकाळी फोडते.)

कौसल्या—(टाहो फोडून) धनी, धनी हें तुम्हीं काय केलंत !

पत्रव्यवहार

स. न. वि. वि.

वि. सा. संमेलनाचा गेला वृत्तांत छापून झाल्यावर त्यांत एकदोन गोष्टींचा उल्लेख राहून गेला आहे. हें लक्षांत आलें. विशेषतः श्री. दे. गो. लांडगे यांच्या परिश्रमाने जें ऐतिहासिक वस्तूंचें प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें, त्याचा उल्लेख माझ्या आणि संघाच्या अधिकृत अशा वृत्तांतांत झाला नाही. तरी खालील मजकूर आपण येत्या 'युगवाणी'च्या अंकांत प्रकाशित करावा ही प्रार्थना ! उल्लेख गळला याचा खेद वाटतो.

गोंदिया साहित्य संमेलनाचें एक आणखी वैशिष्टय म्हणजे नागपूर संशोधन मंडळातर्फे भरविण्यांत आलेलें ऐतिहासिक प्रदर्शन हें होय. खरें म्हटलें तर 'भवभूती'वरील परिसंवादाच्या वर्णनाच्या वेळींच हा उल्लेख करणें भाग होतें. कारण परिसंवाद संपतांच प्रदर्शन प्रेक्षकांसाठी खुलें करण्यांत आलें होतें. तेथील ऐतिहासिक वस्तूंची विशेष माहिती जिज्ञासूंना पुरविण्यासाठी श्री. लांडगे व प्रि. मिराशी स्वतः बद्धपरिकर झाले होते ! त्या प्रदर्शनांत जुनीं नाणीं, जुने हस्तलिखित काव्यादि ग्रंथ, कांही शस्त्रें आणि पत्रव्यवहार इत्यादि नित्याचीच सामुग्री होती. पण या प्रदर्शनाला खरें मोल आलें तें श्री. दे. गो. लांडगे यांच्या महत् प्रयासाने उपलब्ध झालेल्या नागपूरच्या श्री. साल्पेकर यांच्या संग्रहीं असलेल्या 'ज्ञानेश्वरी'च्या हस्तलिखित पोथीमुळे. प्रस्तुत ग्रंथाच्या पानापानावरील शास्त्रशुद्ध व रंगरमणीय चित्रकला, प्रत्यक्ष सुवर्णाच्या रंगाने केलेलें ग्रंथलेखन आणि अन्य सजावट या दृष्टीने ही पोथी उपलब्ध मराठी हस्तलिखितांत अद्वितीयच ठरावी ! ग्रंथलेखकाचा साक्षेप व ज्ञानेश्वरीवरील प्रगाढ भक्ति यांचा सुंदर समन्वय झाल्याचें ह्या पोथीवरून स्पष्ट झालें ! पोथी पाहून अक्षरशः डोळ्यांचें पारणें फिटलें ! दुसरी नमूद करण्याजोगी वस्तु म्हणजे नागपूरचे राजे मुधोजीराव भोसले यांचे नांव खोदलेली तलवार !—

सांस्कृतिक कार्यक्रमाचे वेळीं नागपूरचे श्री. पुरुषोत्तम कुळकर्णी यांच्या 'मेघा' या काव्यसंग्रहाचें प्रकाशन झाल्याचा उल्लेखहि असाच नजरचुकीने राहून गेला. श्री. कुळकर्णी व श्री. लांडगे या प्रमादाची क्षमा करतील ही आशा.

—वसंत वऱ्हाडपांडे

(पान ५५ वरून)

दत्ताजी—(निवेदन) जेलरसाहेब, मी हें काय केलं !–मी हें काय केलं ! माझ्या भुकेल्या चिमण्या पांखराचा गळा दाबून प्राण घेतला. या हातानं–या हातानं ! जाई ! जाई ! (मोठ्याने ओरडून) जाईऽऽ! (खाली पडतो. सारे आवाज एकदम् बंद होतात.)

जेलर—दत्ताजी शिंदे एखाद्या जुनाट वृक्षासारखा धाडकन् खाली कोसळून पडला. मी खाली वाकून पाहिलं तों त्याचा प्राण निघून गेला होता. भावनांचा ताण असह्य झाल्यामुळे त्याची हृदयक्रिया बंद पडून त्याला विलक्षण रीतीनं मृत्यू आला. फाशीच्या शिक्षेची अंमलबजावणी करण्याची त्यानं वेळच येऊं दिली नाही. पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या वैराच्या विषाचा शेवटचा घुटका त्यानं गिळला आणि रिकामा पेला आपल्यापुढें फेकून देऊन तो कायमचा चालता झाला.

(हैद्राबाद रेडिओच्या सौजन्याने)

गद्यकाव्य

आत्मा

—सुरेश म. डोळके

सन्ध्यासुन्दरी पायांतले घुंगुरवाळे वाजवीत आली.
दिवसाचा कोलाहल शांतीच्या पांघरुणांत दडत होता.
निशेनं साऱ्या सृष्टीला आपल्या कुशींत घेतलं.
आणि सर्वांवर हलक्या हातानं काळया चन्द्रकलेची
चादर ओढली.
तिनं मेघांचीं वस्त्रं परिधान केलीं होतीं.
डोईं चंद्राचा मुकुट
पायीं निर्झरांचें पैंजण
हातीं चंदेरी गुलालाची उवळण.
अनन्त नेत्रांनी—
जीवनाच्या सखोलतेचा.
आत्म्याच्या सखोलतेचा.
ठाव घेत होती ती.

× × ×

दिवसभर
अहंकाराचीं वस्त्रं घालून
बुद्धीच्या दिमाखांत
अस्मितेच्या परिवारानं वेढलेला
आणि अभिलाषा व महत्त्वाकांक्षा यांच्या आभरणांनी
गुदमरून गेलेला
माझा आत्मा
घाता विसावला आहे.
जिथं द्रष्टयाला दिव्यदर्शन होतं
जिथं तत्त्वचिंतकाला अन्तःस्फूर्ति होते
जिथं कवीचं हृदय जागं होतं
आणि जिथं आत्म्यालाहि स्वतःचं स्वरूप कळतं—
तिथं— निशेच्या कुशींत
जीवनाचं रत्न आत्म्यावरून ओवाळून टाकावं
जीवनाचा नैवेद्य त्याला समर्पण करावा
जीवन-वीणेची तार तुटेपर्यंत आत्म्याच्या समाधाना-
करिताच ती वाजवीत राहावं असं मला फार
फार वाटतं.
पण वस्त्र-भूषणं मीलनाला अडथळा करितात.
दिवसाचा कोलाहल आत्म्याच्या संगीताला प्रतिबंध
करतो.

× × ×

आत्म्याच्या कोशांत ईश्वरानं आनंद भरला
आणि स्वतःचं अस्तित्व साकार केलं.
त्यानं त्याला वसन्त-वाऱ्याचा सुगन्ध, पुनवेची
प्रसन्नता, अमृताचं माधुर्य आणि सन्ध्याकालीन
मेघांचं सौंदर्य दिलं.
चिरंजीवित्वाचा प्रकाश दिला.
आणि 'प्रकाशा'चं दर्शन व्हावं
म्हणून अहन्तेचा अन्धारहि दिला.
चैतन्याचा शोध घेणारी दिव्य दृष्टि—
आणि तिला कुण्ठित करणारीं अभिलाषांचीं
आवरणं दिलीं.
प्रेम
–आणि प्रीतीच्या पहिल्या निःश्वासाबरोबर पळून
जाणारं समाधान दिलं.
प्रेमाच्या अभिसाराकरिता तळमळणारी भावना
–आणि तिला हद्दपार करणारी तृष्णा दिली.
परम-आत्म्याशीं मीलन
–आणि 'मीलना'ची छाया असलेलं जीवन दिलं.
अनन्तत्व
–आणि अनन्ताचा साक्षात्कार घडवून आणणारा
मृत्यूहि दिला.
त्यानं त्याला अमरत्वाचा एक प्यालाहि नजर केला
आणि सांगितलं, 'जोंपर्यंत तुझा आत्मा स्वतःला
पाहूं शकणार नाही, तोंपर्यंत तूं हा प्याला
ओठांना लावूं नकोस.'

× × ×

अनुक्रमणिका

दिवसाच्या प्रकाशानं
पृथ्वीच्या सिंहासनावर
आत्म्याला राज्याभिषेक केला.
अहन्तेचा राजदंड हातांत देऊन
स्थल आणि काळ यांच्या बन्धनांत
त्याला जखडून ठेवलं.
प्रकाशाच्या नजरेखाली—
आत्मा आपल्या राज्याचीं बन्धनं कशीं ओलांडील ?—

× × ×

रागिणीचे सूर
शान्त झालेल्या वीणेवर विसावतात
तसाच दिवसाचा दिमाखहि आता निस्तब्धतेंत दडला आहे.
जीवन आणि मृत्यु हे जुळे भाऊ कुठंतरी खेळायला गेले आहेत
अहंकाराचा साजशृंगार बाजूला पडला आहे
आणि अन्धारांतच प्रकाशाचा साक्षात्कार घडविणारी निशा
अनन्त नेत्रांनी—
जीवनाच्या सखोलतेचा
आत्म्याच्या अनन्ततेचा
ठाव घेत आहे.

वाघ मारणारी अबला

इ. स. १६१७. राजमहाल—

"हुजूर, शेजारच्या रानांत चार क्रूर वाघ धुमाकूळ घालीत असल्याची वार्ता आहे."

"अस्सं ? तर मग आज रात्रीं मी शिकारीला जाणार ! हत्ती तयार ठेवा."

हुजऱ्या गेला. क्षणभरानें इकडे चिकाचा पडदा सळसळला—

"बादशहा सलामत, ही तुमची दासीहि येणार तुमच्यासोबत !..."

"नाही नूर, तूं स्त्री आहेस ! अबला आहेस !... प्रिये, वाघांच्या सामन्यांत तूं मला सोबत करणं इष्ट नाही !"

पण हट्टी नूरनें जहांगीरचें कांही एक ऐकलें नाही. त्याच्यासह तीहि शिकारीला गेली.

वाघांची चाहूल लागताच नूरजहान जहांगीरला म्हणाली—

"आपण परवानगी दिली तर मी स्वतः बंदुकीनं या चारी वाघांची शिकार करीन म्हणत्ये !..."

जहांगीरच्या चेहऱ्यावर खट्याळ हास्य विलसलें. त्यानें मान डोलावून तिला आपला रुकार कळवला.

एका गोळीनें एक—असे दोन वाघ आधी; आणि नंतरच्या चार गोळ्यांनी आणखी दोन वाघ अशा चौघांना तिनें यमसदनास पाठविलें.

हत्तीवर आरूढ होऊन व हौदांत बसून गोळ्या झाडाव्यात; त्यांतील एकहि वाघ जाऊं नये आणि चार श्वापदांपैकी कोणासहि निसटण्यास वाव मिळूं नये—अशी शिकार तोपर्यंत कोणीहि पाहिली नव्हती.

त्यांतून एका अबलेनें ही शिकार केली होती !...

या अचूक कुशल नेमबाजीबद्दल पारितोषिक म्हणून जहांगीर बादशहानें आपल्या लाडक्या नूरजहानला एक लाख रुपये किंमतीचें हिऱ्याचें कंकण सादर केलें.

अशी ही वाघ मारणारी अबला...

'घनश्याम'ची कैफियत (भावबंधन) ?

द. रा. गोमकाळे

प्रिय धुंडिराज काका

यांस—

माझं नांव घनश्याम. 'भावबंधनां'तील आपल्या पहिल्या भेटींतच तें मी आपल्याला सांगितलं होतं. १९१८ सालीं गोविंदाग्रजांनी आपल्याबरोबर सर्व जगाशीं माझा परिचय करून दिला. एकाचा चेहरा दिसला की तिसऱ्याचाच इतिहास आपल्याला आठवतो असं आपण मला सांगितलं होतं, म्हणून मुद्दाम मी प्रथमच आपलं नांव सांगून टाकलं.

१९१८ सालापासूनच्या काळांत आपल्या 'भावबंधनां'त जो घनश्याम चित्रित झाला आहे त्या माझ्या स्वभावचित्राच्या निमित्तानं असंख्य टीकाकारांनी गोविंदाग्रजांवर असंख्य टीका केल्या आहेत.

स्वतःसंबंधी बोलतांना 'यावज्जीवहि काय मी न न कळलें आप्तांप्रती नीटसें' असं गोविंदाग्रजांनी म्हटलं आहे. वास्तविक गोविंदाग्रजांना माझी चांगली ओळख होती. मी कोण आहे, माझा स्वभाव कसा आहे याची त्यांना पूर्ण जाणीव होती. व ती जाणीव ठेऊनच त्यांनी मला रंगभूमीवर प्रगट केलं. म्हणूनच माझं स्वभावचित्र रंगवितांना घनश्याम या सामान्य माणसाचा अतिमानुष घनश्याम का झाला हें जगाला आधी कारणासह दाखवूनच माझं पुढचं चित्र त्यांनी रंगविलं व मला पुनः माणसांत आणून सोडलं. असं असतांहि माझ्या निमित्तानं गोविंदाग्रजांवर व गोविंदाग्रजांच्या निमित्तानं माझ्यावर जो टीकाकारांनी गहजब करून सोडला आहे तें पाहून 'यावज्जीवहि काय मी न कळलें कोणाप्रती नीटसें' असं मलादेखील वाटूं लागलं आहे. गोविंदाग्रजांच्या कोणत्याहि टीकाकारानं सहृदयतेनं, आत्मौपम्य बुद्धीनं माझ्याकडे पाहिलेलं नाही असं मला मोठ्या दुःखानं म्हणावं लागतं. या सर्व टीकाकारांत मोठमोठे धुरंधर साहित्यिक आहेत, पदवीधर विद्वान आहेत, फार थोर लोक आहेत. त्यांच्या मानानं आजच्या सामाजिक विश्वांत मी प्रतिष्ठेनं पुष्कळच कमी भरेन. पण या टीकाकारांप्रमाणं मलाहि भावना आहेत, रागद्वेष आहे, स्वाभिमान आहे, आपल्याविरुद्ध चारदोन वाकडे शब्द कुणी बोलतांच या लोकांचा जसा तोल सुटतो तसाच राग, लोभ, द्वेष, मत्सर, वैर या विकारांच्या आहारीं मीहि जाणारा आहे.

आपल्याला आश्चर्य वाटेल, या टीकाकारांपैकी बहुसंख्य लोकांनी मला दुष्ट, पापी, चांडाळ ठरविलं आहे. एका टीकाकारानं मला बिनबुडाचा म्हटलं आहे. दुसऱ्यानं उलट्या काळजाचा म्हटलं आहे. एका टीकाकारानं मला 'कमलाकराची कार्बन कॉपी' असं ठरविलं. माझ्या स्वभावचित्रणांत Motivation नाही —कार्यकारणभाव नाही, अतःहि आक्षेप घेतला आहे. ज्या कारणासाठी मी सूडप्रेरित झालों तें कारण क्षुल्लक होतं असं त्यांचं म्हणणं आहे. माझ्या स्वभावचित्राचं दाखविलेलं पर्यवसान नाटकी आहे—नाट्यपूर्ण नाही, असंभाव्य आहे असं एका सहृदय टीकाकारानंहि म्हटलं आहे. एकानें मला सिनिक म्हटलं आहे. एक ना दोन, अनेक प्रकारांनी माझं चित्र म्हणजे एका अत्यंत दुष्ट, अव्यवहारी, मूर्ख माणसाचं चित्र आहे असं त्यांचं म्हणणं आहे.

याला कांही टीकाकार अपवादहि आहेत. त्यांना माझं परिवर्तन स्वाभाविक वाटतं. माझ्या सूडप्रेरणेला भरपूर, निदान समजण्यासारखं कांही कारण होतं व त्यामुळं माझा साहजिकच तोल सुटला असंहि त्यांना वाटतं. परंतु या पक्षाची संख्या अपवादवजाच आहे

बाण जिथून सुटतो तिथं त्याची खूण देखील राहत नाही. परंतु तो जिथं लागतो तिथं मात्र रक्ताचं थाळं साचतं, असह्य वेदना होतात. अगदी तशा वेदना या सर्व टीकांचे तीक्ष्ण बाण हृदयावर झेलतांना मला होतात. अत्यंत दुःख होतं. तें दुःख जिव्हाळयानं मला सांगतां येईल असं मला जगांत कोणीच नाही. तें दुःख आपल्यावर प्रेम असणाऱ्या कुणाजवळ तरी व्यक्त केल्याशिवाय सुसह्य होऊं शकत नाही असं मिल्टन देखील म्हणतो. अशा परिस्थितींत ज्याच्या निरपेक्ष दयेनं मला पुनः मनुष्यत्व दिलं त्या आपल्यासारख्या उदार अंतःकरणाच्या पुरुषाजवळ नाही, तर मग कुणाजवळ मी माझं अंतःकरण मोकळं करूं? माझ्या मनांतल्या व्यथा, आत्यंतिक दुःखं (आपल्याला आवडेल तर या माझ्या निवेदनाला आपण वाटल्यास कैफियत म्हणा) दुसऱ्या कुणाजवळ व्यक्त करण्याची माझी इच्छा नाही. आणि खरं म्हटलं तर दुर्दैवानं मला जिव्हाळयाचं दुसरं तिसरं कुणी नाहीहि. आपण विश्वास ठेवा, भावबंधनांत गोविंदाग्रजांनी माझं जें चित्र आपल्याला ज्ञात केलं आहे त्या मर्यादेबाहेर मी एक इंच देखील जाणार नाही. त्या मर्यादेंत राहूनहि मर्चंट ऑफ व्हेनिस मधील शायलॉकच्या बाबतींत He was more sinned against than sinning असं जें म्हटलं आहे, तेंच माझ्याहि बाबतींत खरं कसं आहे, मला अपराधी ठरविणारेच खरोखर कसे अपराधी आहेत, कसे चुकले आहेत, हें मी आपल्याला दाखवून देणार आहे.

मी एक सामान्य माणूस आहे. थोडाफार बुद्धिमानहि आहे. जीवनांत प्रेमळ मातापित्याच्या, आप्तांच्या सहवासाला मीं लहानपणापासूनच मुकलों आहें. पोरकेपणांत मी आपली जीवित यात्रा केवळ स्वतःच्या बळावर कशीबशी चालवीत होतों. स्वसामर्थ्यावर, आपण आपलं स्वतंत्र जिणं जगूं शकूं असा आत्मविश्वास मला येतांच आपल्या जीवनांत सुखदुःखांत साथ देणारी सहचरी आपल्याला असावी अशी साहजिकच मला इच्छा झाली. आणि सांपत्तिक दृष्टया माझ्या बरोबरीनं असणाऱ्या आपल्यासारख्या सुहृदाशीं बोलणं केल्यास माझी इच्छा पूर्ण होईल असं साहजिकच मला वाटलं. आपली सुकन्या मालती मला अनुरूप आहे असं वाटल्यावरून मी आपल्याजवळ याचना केली. आपल्या उदार स्वभावामुळे साहजिकच त्यांत आपल्याला कांही गैर दिसलं नाही. आपण मला आपल्या घरीं नेलं—परंतु दुर्दैवानं तिथं माझ्यासाठी ईश्वरानं कांही वेगळंच ठरविलं होतं असं दिसतं.

मी गरीब असलों तरी स्वतःच्या पायावर उभं राहण्याचं सामर्थ्य माझ्यांत होतं. आपल्या मुलीच्या पाणिग्रहणाची मी अपेक्षा बाळगिली यांत अनुचित अथवा चुकीचं असं कांहीच नव्हतं, याबद्दल मला आजहि खात्री आहे. मी मालतीला मागणी घातली यांत कुणाचाहि अपमान करण्याचा माझा हेतु नव्हता. आपले आणि घनेश्वरपंतांच्या घराचे घनिष्ठ संबंध होते, तरीहि मी घनेश्वरपंतांचा मुनीम होतों म्हणून मी आपल्या कन्येला मागणी घालण्यांत घनेश्वरपंतांचा अगर स्वभावानं उर्मट असणाऱ्या लतिकाताईचा कोणताच अपमान नव्हता. माझी मागणी स्वीकारली गेलीच पाहिजे असा माझा आग्रहहि नव्हता व ती सौजन्यानं नाकारतांहि आली असती—परंतु नेमकं व्हायला नको तेंच झालं—मालतीताईंना मी मागणी घातली यांत लतिकाताईंना त्यांचा उगीच अपमान झाल्यासारखं वाटलं. केवळ आपल्या अन्नावर वाढलेल्या, परावलंबी, निष्क्रिय प्रभाकरपंतांनी लतिकाताईंना उर्मटपणानं साथ दिली, मिळकतीचीं टाचणं, वंशवृक्षांच्या फांद्या, कुंडल्यांचीं पानं, सद्गुणांची खानेसुमारी विचारल्या गेली. एवढेंच नाही, तर माझं शिक्षण, घरदार, आईवडिलांचं ठावठिकाणं विचारलं जाऊन मालतीताईंच्या लग्नांत 'नवरदेव म्हणून नव्हे तर त्यांच्या लग्नाच्या सामानाची यादी तयार करण्याकरिता' हाजर राहा म्हणून बजावण्यांत आलं! माझी मालतीताईंना मागणी म्हणजे खुद्द लतिकाताईंना मागणी घालण्यासारखं आहे असं मला सांगण्यांत आलं आणि तेंहि अत्यंत उर्मटपणानं, कोणाचाहि स्वाभिमान दुखविला जाईल अशा बेजबाबदारपणानं. त्याच वेळीं माझ्या सहनशक्तीचा तोल सुटला होता. पण संयमानं, कष्टानं तो मी आवरला.

परंतु तो पूर्णत्वानं मला आवरतां आला नाही. माझा स्वाभिमान दुखावला गेला—हृदयाला दारुण व्यथा झाली. अपमानाचं शल्य सोसणं असह्य झालं.

आयुष्यांत आधीच कोणीहि मला सुखानं घास भरविला नव्हता. प्रत्येक माणसाच्या हृदयांत देवपणाचे व राक्षसीपणाचे दोन कप्पे असतात. मनुष्य अकारण, उर्मटपणानं, बेजबाबदारपणानं, दुसऱ्याकडून दुखावला गेला की त्याच्यांतील राक्षसी मन जागं होत असतं, याचा अनुभव प्रत्येकाला आहेच. या माझ्या पोळलेल्या मनाला शांत करणारं मला कोणीच नव्हतं आणि त्याचमुळे माझ्या झालेल्या अपमानाचा सूड घेण्याची वृद्धि स्वाभाविकच बळकट झाली—आणि यापुढं माझ्या निष्प्रेम जीवाला निरपेक्ष दयेनं देवलोकांत आणणाऱ्या उदारधीचा अनुभव येईपर्यंत माझ्यांतील देवपण लोपलं.

माझी ही मनाची अवस्था सांगितली म्हणून त्यावर आपला विश्वास बसत नसेल. परंतु आपला मालतीताईंच्या शब्दावर तर विश्वास आहे ना? माझ्या अंतःकरणांतील यातना त्यांना पुरतेपणीं समजल्या म्हणूनच त्यांनी लतिकाताईंना स्पष्ट सांगितलं "कैक जीवांचा आणि दोन भरल्या घरांचा असा सर्वस्वी सत्यानाश करायला घनश्याम इतक्या त्वेषानं कां बरं झटत आहेत? लतिकाताई, घनश्याम मला पाहायला आले त्या दिवशीं तूं आणि प्रभाकरदादा त्यांना सारखं टाकून बोलत होतां. किती तुटून पडून तुम्ही दोघं घनश्यामाच्या काळजाला घर पाडीत होतां. त्या परक्या माणसानं असा तुमचा काय अपराध केला होता बरं? आपलेपणामुळं तुमची मालती तुम्हांला अधिक असेल, पण सामान्य स्थितींतल्या घनश्यामानं सामान्य स्थितींतल्या मालतीला पाहायला यावं यांत असं अघटित तें काय होतं!" अपमानाच्या दारुण व्यथेनं मी देहभान विसरलों होतों अशा वेळींहि मी माझ्या त्या मानसिक अवस्थेंत जगाशीं तसा कां वागतों याचं कारण लतिकेला सांगितलं होतं. "स्वार्थनिरपेक्ष, हेतुशून्य दयेचा एक शब्द मला कुणी दिला असता तर मी त्याचा सात जन्माचा ऋणी होऊन बसलों असतों. घनश्यामाला अजून कुठे अशी दिव्य दया दिसली नाही." ही माझी जगापुढं तक्रार होती. मी माझं सारं जीवन एकाकी अशा अवस्थेंत निष्प्रेम सहानुभूतिशून्य जगांत खरडत व्यतीत केलं होतं. स्वार्थी प्रेमावर माझा विश्वास नव्हता ही माझी पश्चात् वृद्धि आहे, असं टीकाकार म्हणतात. वास्तविक ही पश्चात्‌वृद्धि असलीच तर ती माझी नव्हे, गोविंदाग्रजांची. असा कोणता आधी प्रसंग आला होता ज्या वेळीं माझी ही करुण कहाणी जगापुढे सांगण्याला मला अथवा गोविंदाग्रजांना अवसर होता! कारण होतं? प्रसंग आला त्या वेळीं तें माझ्या जीवनांतील शल्य सहजपणें बाहेर पडलं.

माझ्या यातना मालतीबाईंनाच केवळ कळल्या असं नाही. माझं अंतःकरण पडताळून पाहण्याचा एका टीकाकारानं प्रामाणिक प्रयत्न केला आहे व लतिका प्रभाकरांनी मला निष्कारण दुखविल्यामुळं प्रेक्षकांची सहानुभूति माझ्या बाजूनं राहते हें त्यानं मान्य केलं आहे. आणि हें एकदा मान्य केल्यावर माझ्या सूडभाव-

नेला क्षुल्लक कारण होतं असं म्हणणाऱ्या दुसऱ्या टीकाकाराला परस्परच उत्तर मिळतं—याच टीकाकारानं माझ्या जीवितांत घडून आलेलं पर्यवसान आपल्या स्वार्थनिरपेक्ष हेतुशून्य दयेमुळं कसं स्वाभाविक आहे हेंहि दाखवून दिलं आहे. त्यामुळं माझ्या जीवितांतील पर्यवसान अघटित आहे, अस्वाभाविक आहे असं म्हणणाऱ्या बहुतांश टीकाकारांना एका त्रयस्थानं परस्पर समर्थक असं उत्तर दिलं आहे, असं नाही का आपल्याला वाटत ?

आपल्या घरीं घडून आलेल्या त्या प्रसंगानं माझं काळीज चरावरा चिरलं गेलं आणि पुढचा घनश्याम सामान्य मनःस्थितींतील घनश्याम राहिलाच नाही. नव्हे राहूं शकला नाही. या गोष्टीवर आता तरी आपला विश्वास वसेल ना ? अपमानाचं शल्य सारखं वोचत राहिलं आणि सूड सूड याच कल्पनेनं त्याचं पुढचं जीवित व्यतीत झालं. 'लतिकेसाठी मालती आणि मालतीसाठी धुंडीराज अशी ही दावण बांधावीच लागणार' असा मी निर्धार केला. पण तो करतांनाहि आपल्या प्रेमळ मनाला मला दुखवावं लागेल, याचं दुःखहि त्या परिस्थितींत देखील मला जाणवलं. परंतु सूडाच्या भावनेपुढं तो माझ्या मनाचा नाजूक धर्म मागें सरला. परंतु शेवटीं माझ्या मनाच्या नैसर्गिक धर्मामुळंच आपल्या निरपेक्ष दयेचं माझ्या आयुष्यांतील निर्वाणीच्या प्रसंगीं दर्शन घडतांच मी गोगलगाय बनलों आणि पुनः मनुष्यत्व मला प्राप्त झालं. सूडप्रेरित मनःस्थितींत असतांना माझ्या तोंडून निघालेल्या कांहीं उद्गारावरून मला हाडाचा दुष्ट, पापी ठरविण्याचा निर्धार टीकाकारांनी केलेला दिसतो. त्यांना मला एवढंच सांगावसं वाटतं की कोणताहि मनुष्य स्वभावतः दुष्ट नसतो. परिस्थिति, अनुभव व प्रसंग त्याला तसा बनवीत असतात. फरक इतकाच की त्याचा परिणाम कांहींच्या बाबतींत पराकोटीला जात असतो व अशा अवस्थेंतील त्यांची भाषा, क्रिया ही त्याची सामान्य अवस्था व स्वभाव नव्हे.

सूडाच्या भावनेच्या आहारीं असतांना मी अनेक कारस्थानें केलीं, हें खरं आहे. त्यावेळीं मी अत्यंत निर्दय झालों हीहि गोष्ट खरी आहे. कदाचित् कांहीं बाबतींत माझ्या हातून अतिरेकहि झाला असेल. पण यांत आश्चर्य वाटण्यासारखं अथवा निसर्गापेक्षा वेगळं असं काय आहे ? विवेकाचीं बंधनं सुटलीं म्हणजे मनुष्यापुढे परिणामाचा विचार तरी कधी असतो कां ? या सर्व भावबंधनांत मी आपण होऊन कुणाला दुखविलं का ? ज्यांनी मला निर्दयपणानं दुखविलं त्यांच्यावरच माझा रोष होता आणि त्यांच्या विरुद्धच मी काय जें केलं तें केलं. यांत अस्वाभाविक असं काय आहे ?

एका टीकाकारानं मला 'कमलाकराची कार्बन कॉपी' म्हटलं आहे हें मी मागं सांगितलंच आहे. भावबंधनांतील माझं चित्र खलनायकाचं बनविलं आहे हें मला अमान्य करतां येणार नाही. परंतु माझ्या स्वभावचित्रणांत Motivation नाही हें मला पटत नाही. वर्तमानपत्रांत आपल्याविषयी चारदोन अनादराचे शब्द आले असतां परस्परांत जन्मभर वैरभाव राखणाऱ्या टीकाकारांच्या तोंडीं तरी ही टीका शोभत नाही. मी आतापर्यंत माझं निवदन केलं आहे त्यांत ज्या कारणांसाठी मी सूडप्रेरित झालों तें क्षुल्लक होतं असं मनुष्यस्वभावाचं ज्ञान असणारा कोणीहि म्हणायला धजेल असं वाटत नाही. व तसं तें एका सुबुद्ध टीकाकारालाहि वाटलं नाही हें मी आधी सांगितलंच आहे. विवेकाचीं बंधनं सुटलीं म्हणजेच मनुष्य अविचारी बनतो. सामान्य स्थितींत दुष्ट मनुष्यहि दुष्ट दिसत नाही. कोणाचाहि प्राण घेण्याचा चुकूनहि माझ्या मनांत विचार आला नाही. सूडाची भावना ज्या माणसाविषयी असते त्या दुसऱ्या माणसाला सूड उगवूं पाहणाऱ्या माणसाच्या कृतीमुळं दुःखच होणार. त्यांत अस्वाभाविक काय आहे ? दुष्ट माणसांतहि परिवर्तन होऊं शकतें याला वाल्मिकीचं केवढं मोठं उदाहरण आहे ? मग ज्यांच्या उदार-प्रेमळ हृदयासंबंधी मला आधीपासूनच आदर आहे अशा आपल्यासारख्या प्रेमळ माणसानं माझ्यावर केलेली निरपेक्ष दया पाहून मी गोगलगाय बनलों यांत अघटित किंवा अशक्य काय आहे ? माझ्यावर असलेला प्रसंग व याप्रसंगीं आपण दाखविलेली निरपेक्ष दया या गोष्टी

सहृदयतेनं विचारांत घेणाराला माझं स्वभावपरिवर्तन अस्वाभाविक निश्चित वाटणार नाही.

माझा स्वाभिमान डिवचला जाण्यापूर्वी माझ्या हातून घडलेल्या दुष्ट आचरणाचा एक तरी उल्लेख कुठं आढळतो का ? मग असं नसतांहि माझ्या डिवच-लेल्या मनःस्थितींत विवेक सुटून माझ्या हातून सूड उगविण्यासाठी ज्या गोष्टी घडल्या त्यावरून मी कोणी राक्षस हृदयाचा मनुष्य आहे असं अनुमान काढण्यांत टीकाकारांनी आपली न्यायबुद्धि सोडली असं आपल्याला खास वाटेल. जग ज्याला चांगलं समजतं अशा कोणत्याहि स्वाभिमानी माणसाचा निष्कारण अपमान झाला तर तो काय ज्यानं आपला अपमान केला त्या माणसावर आणखी प्रेम करतो ? आपल्या अपमानाचा सूड घेण्याची त्याची साहजिक प्रवृत्ति नसते का ? स्वतःच्या अपमानाचा बदला तो काढत नाही का ? मनुष्य-स्वभावाचं आकलन गणिती सिद्धांताप्रमाणं करतां येतं असं समजणं हा या टीकाकारांचा वेडा अहंकार आहे. तें आजपर्यंत कोणालाच साधलं नाही आणि साधणार नाही.

